मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.
**दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स**
भ्रमणध्वनी - ८६५५१९४४५२, ८५९१६६२६१६,९८६७३०८०६३

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस



मोदींचे काम केवळ अदानी-अंबानींच्या फायद्यासाठी पान ८

Email : vrittamanas1@gmail. com | मुंबई/ पालघर | मुंबई, गुरुवार, ५ सप्टेंबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - ७७ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

## प्रासंगिक

### गोवा हायवे पूर्ण होण्यास 2027 उजाडेल

**गणेशोत्सव** जवळ आला की मुंबई-गोवा महामार्गाचे फटाके फुटू लागतात. सत्तेतील आणि विरोधकातील राज्यकर्ते गेली दहा वर्षे अगदी न चुकता हे फटाके फोडत आहेत आणि कोकणातील जनता मंत्रमुग्ध होताना दिसत आहेत. गणेशोत्सव संपला की राज्यकर्ते विसरतात आणि कोकणी जनताही विसरून जाते. पुन्हा पुढच्या वर्षी मुंबई गोवा महामार्गाच्या नाटकाच्या नव्या अंकाला सुरुवात होते. यंदाही या महामार्गच्या नाटकाची सुरुवात माजी आमदार, माजी मंत्री असलेले रामदास कदम आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी केली. रवींद्र चव्हाण यांच्या राजीनामा घ्यावा इथून सुरु झालेले नाटक रामदास कदम यांचे थोबाड फोडीन इथे येऊन थांबले. या नाटकाचा आनंद रत्नागिरीच्या जनतेने मनसोक्त घेतला. या महामार्गाच्या दुसरा अंकाचा पडदा 26 ऑगस्ट रोजी उघडला गेला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मुख्य भूमिका असलेल्या दुसऱ्या अंकाची सुरुवात पनवेल च्या पळस्पे पासून झाली आणि सांगता समारोह रत्नागिरी येथे झाला. यात सहकलाकार म्हणून रवींद्र चव्हाण होते. नाटकाचा हा दुसरा अंक पाहण्यासाठी भाजपा शिवसेनेसह कोकणातील श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या नाटकात मुख्यमंत्री शिंदे यांनी अधिकाऱ्यांना केलेला फोनचा सिन चांगलाच गाजला. "ज्यांनी कामात चुकारपणा केला त्यांच्यावर गुन्हा दाखल करा" असा मुख्यमंत्री शिंदे यांचा डॉयलॉग या सिनमध्ये आहे. हा डायलॉग ऐकून श्रोत्यांनी जोरदार टाळ्या मारल्या. पण मालवण येथील राजकोट किल्यातील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडल्याचे समजताच महामार्गाचे रंगात आलेले नाटक सोडून मुख्यमंत्री शिंदे पळून गेले! माफ करा! पळून नाही तर निघून गेले. कारण महामार्गाचे काम लांजा तालुक्यातील 'वाकेड'पर्यंत रखडलेले आहे. पण एकनाथ शिंदे रत्नागिरी येथूनच माघारी फिरले. पान 8 वर

- सुरेंद्र मुळीक

# विधानसभा निवडणुक नोव्हेंबरमध्ये

प्रतिनिधी
मुंबई



जम्मू-काश्मीर आणि हरियाणाच्या विधानसभा निवडणुकांसोबतच महाराष्ट्राची निवडणुकही होणार होती. परंतु, निवडणूक आयोगाने राज्यातील निवडणुका पुढे ढकलल्या आहेत. मात्र सध्या या निवडणुकांबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठा खुलासा केला आहे. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका या नोव्हेंबर महिन्यात होणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

मुख्यमंत्री मुंबईतील चांदिवलीत बोलत असताना म्हणाले की, पुढच्या दोन महिन्यात राज्यात विधानसभा निवडणुका पार पडणार आहेत. त्या निवडणुकीत तुम्हाला आमच्या आमदाराला निवडून आणावे लागणार असल्याचेही ते म्हणाले. सध्या चांदिवलीमधून दिलीप लांडे हे आमदार आहेत. यावेळी शिंदेंनी लांडे यांना लोकांनी मोठ्या मताधिक्याने निवडून आणावे, असे आवाहनदेखील केले आहे.

जम्मू-काश्मीर हरियाणासोबत महाराष्ट्रातही विधानसभा निवडणूक जाहीर होण्याची अपेक्षा होती. मात्र आयोगाच्या कार्यक्रमात याचा समावेश नव्हता. त्यामुळे आता निवडणूक दिवाळीनंतरच म्हणजे नोव्हेंबरच्या मध्यात जाहीर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राज्यात गणेशोत्सव, पितृपक्ष, नवरात्र, दिवाळी यासारखे सण आहेत. सुरक्षा बलाचाही मुद्दा आहे. याचा विचार करून फक्त 2 राज्यांच्या निवडणुका जाहीर झाल्याचे आयोगाने सांगितले. 2019 मध्ये 20 ऑक्टोबरला मतदान झाले होते, या वेळी तीन आठवडे ते एक महिना उशिरा निवडणूक होऊ शकते. महाराष्ट्र विधानसभेची मुदत 26 नोव्हेंबरपर्यंत आहे. मुख्यमंत्री शिंदे यांच्या आजच्या वक्तव्यामुळे विधानसभा निवडणूक नोव्हेंबरमध्येच होणार याला पुष्टी मिळाली आहे.

# एसटी कर्मचाऱ्यांचा संप अखेर मागे



### मूळ पगारात 6500 रुपयांची वाढ

प्रतिनिधी
मुंबई

राज्यभर वेतनवाढीसाठी सुरु असलेला एसटी कर्मचाऱ्यांचा संप अखेर बुधवारी रात्री मागे घेण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत यावर तोडगा निघाला. एसटी कर्मचाऱ्यांसोबत मुख्यमंत्र्यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक घेतली. या बैठकीला एसटी कामगार संयुक्त कृती समितीचे शिष्टमंडळ उपस्थित होते. त्यासोबतच भाजप आमदार गोपीचंद पडळकर, आमदार सदाभाऊ खोत, गुणरत्न सदावर्ते देखील बैठकीला उपस्थित होते.या दरम्यान कर्मचाऱ्यांच्या मुळवेतनात 6 हजार 500 रुपयांची वेतनवाढ करण्यात आली आहे.

गणेश उत्सवाच्या तोंडावरच एसटी कर्मचाऱ्यांनी संपाची घोषणा केल्यामुळे गावी जाणाऱ्या भक्तांना मोठे संकट निर्माण झाले होते. गणेश उत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या सर्व प्रवाशांना एसटीने संप मागे घेतल्यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.

# NDRF चे निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणार

### शिंदे-फडणवीसांची ग्वाही



प्रतिनिधी
उदगीर

जिल्ह्यात 2 सप्टेंबर रोजी 32 महसूल मंडळात अतिवृष्टी झाली आहे. या अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचले. यावेळी त्यांनी उदगीर तालुक्यातील हेर आणि लोहारा शिवारातील पिक नुकसानीची पाहणी केली, तसेच शेतकऱ्यांकडून नुकसानीची माहिती घेतली.

शेतकऱ्यांना एनडीआरएफचे निकष बाजूला ठेवून जास्तीत जास्त नुकसान भरपाई दिली जाईल. राज्य शासन सदैव शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून यावेळी झालेल्या नुकसानीच्या काळातही शेतकऱ्यांना पूर्ण ताकदीने मदत केली जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिले. तसेच अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे वेगाने करून शेतकऱ्यांना लवकरात नुकसान भरपाई देण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, क्रीडा मंत्री संजय बनसोडे यावेळी उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या मागे सरकार कायमच उभे राहते, तसेच यावेळीही राहील, असा विश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी शेतकऱ्यांना दिला.

# महिला सक्षमीकरणाचा महाराष्ट्र नवा आदर्श



उदगीर

राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले यांच्यासह अनेक महनीय महिलांनी महाराष्ट्रात सामाजिक प्रगतीचा पाया घातला आहे. शासनाने आता महिला आर्थिक सक्षमीकरणासाठी दमदार पावले उचलून त्यांच्या स्वावलंबन, निर्णय शक्तीत वाढ केली आहे. महाराष्ट्राने महिला सक्षमीकरणाचा नवा आदर्श देशापुढे ठेवला आहे, अशा शब्दात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसह सुरु असलेल्या आर्थिक विकासाच्या निर्णयाचे कौतुक केले.

**राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूंकडून 'मुख्यमंत्री – लाडकी बहीण योजने'तील लाभार्थ्यांना लाभाचे वाटप**

उदगीर येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या मैदानावर मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना आणि शासन आपल्या दारी योजना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी महाराष्ट्राच्या दैदिप्यमान इतिहासाचे कौतुक करत महिला सक्षमीकरणाला राज्य शासन चालना देत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन होते. तर विशेष अतिथी म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले, पान 8 वर






२ वृत्तमानस
पालघर, मुंबई
मुंबई, गुरुवार, ५ सप्टेंबर २०२४

## के.व्ही. हायस्कूलमध्ये 25 विद्यार्थिनींना मोफत सायकल वाटप

**जव्हार :** जव्हार सारख्या आदिवासी आणि दुर्गम तालुक्यात गेल्या पाच दशकांपासून विद्यादानाचे काम हे गोखले एज्युकेशन सोसायटीच्या के.व्ही.हायस्कूल व आर.वाय. ज्युनिअर कॉलेज,जव्हार यांच्या विद्यमाने सुरू आहे, यात भर म्हणून अनेक शैक्षणिक उपक्रम राबविले जात आहेत, दरम्यान या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थीनींना काही दात्यांच्या मदतीने दि .३ सप्टेंबर २०२४ रोजी २५ सायकल मोफत वाटप करण्यात आल्या . जेश रसिकलाल शाह, मितेश रसिकलाल शाह यांच्या रावजी फाईन फ्राग्रान्सस - जिओ रोटी घर सायन,मुंबई व सान्वी सोशल वेल्फेअर ऑर्गनायझेशन, मुंबई यांच्यातर्फे या सायकली वितरीत करण्यात आल्या आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना आजच्या काळातील स्वार्थी व संवेदनाशून्य जगात जिओ रोटी घर व सान्वी सोशल वेल्फेअर ऑर्गनायझेशनचे रसिकलाल व मिहीर शहा बंधू व ईशा नाईक हे दानशूर दाते गरजवंत व गरीबांचे कैवारी - आशेचे किरण होवून जगासमोर येतात हे आशादायक चित्र म्हणावे लागेल असे विद्यालयाचे प्राचार्य अवधूत गावड यांनी सांगितले .



## थोडक्यात

### नेहरोलीचे तिहेरी हत्याकांड भाडेकरूनेच घडवले

**वाडा:** वाडा तालुक्यातील नेहरोली येथे बंद घरात तिघांचे मृतदेह आढळून आले असून या तिघांच्या रॉड या जड वजनाच्या वस्तुने वार करून हत्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले असून, भाडेकरूनेच या घरात पैशांचे घबाड असेल या उद्देशानेच या हत्या केल्याचे तपासात उघडकीस आले असून आरोपीला उत्तर प्रदेशातून अटक केली आहे. तालुक्यातील नेहरोली येथील बोंद्रे आळी या ठिकाणी राहणारे मुकुंद बेचलदास राठोड (70) हे नेहरोली येथे 25 वर्षापासून राहत आहेत. त्यांचे दोन मुलगे मुंबई येथे राहतात. आठ दिवसापासून वडिल आई व बहिणीचा संपर्क न झाल्याने त्यांचा मुलगा सुहास हा शुक्रवार (दि. 30) दुपारी नेहरोली येथे आला.घराला कुलूप बघून शेजारी चौकशी केली असता काही माहिती मिळाली नाही. शेवटी घराचे कुलूप तोडून घरात गेला असता त्याला दुर्गंधीचा वास आला. थोडा पुढे गेल्याने बाथरूमच्या दरवाज्यात वडिलांचा मृतदेह आढळला. त्यानंतर त्यांनी सरळ वाडा पोलीस स्टेशनला जाऊन या संदर्भात माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी भेट देताच घरात पत्र्याच्या पेटीमध्ये आई आणि मुलीचा मृतदेहही आढळला.ही घटना होऊन बरेच दिवस झाल्याने प्रेताला दुर्गंधी सुटली होती. मुकुंद बेचलदास राठोड हे नेहरोली येथे 25 वर्षापासून स्थायिक झाले होते. त्यांनी स्वतः जागा घेऊन एक इमारत बांधली होती. इमारतीत भाडेकरूसह स्वतः तेही एका ब्लॉकमध्ये राहायचे पत्नी आणि मुलगी यांच्या समवेत ते राहत होते.या घरात राहणारा भाडेकरू आरिफ हा उत्तर प्रदेशातील असून या घरात पैशांचे घबाड मिळेल, या उद्देशाने त्याने सर्वप्रथम मुलगी संगिता हिच्या डोक्यावर रॉडने वार करून तिला गंभीर जखमी केले. त्यानंतर कांचन हिच्या डोक्यात रॉडने वार करून दोघींनाही ठार करून त्यांना बंद पेटीत ठेवून त्यांची विल्हेवाट लावली.

### गणेश भक्तांकरिता बेस्टच्या विविध सुविधा

**मुंबई:** दरवर्षी बेस्टच्या विद्युत पुरवठा विभागाकडून सार्वजनिक गणेशोत्सवासाठी मिरवणूक मार्ग, विसर्जन स्थळे या ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिलेल्या कार्यादेशानुसार प्रकाश योजना केली जाते आणि गणेशोत्सव मंडळाना त्यांच्या वीज पुरवठा मागणी अर्जानुसार तात्पुरता वीज पुरवठा केला जातो. तसेच गणेश भक्तांसाठीची बस वाहतुक व्यवस्था बेस्टच्या वाहतुक विभागाकडून केली जाते. वर्ष २०२४ साठी बेस्ट उपक्रमाने केलेल्या व्यवस्था केली जाते या वर्षीही बेस्ट ने तशी व्यवस्था केली आहे. बेस्टच्या मार्गप्रकाश विभागाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यादेशानुसार मिरवणूक मार्गावरील व विसर्जनस्थळांवरील प्रकाश योजनेची सुरक्षततेच्या दृष्टीने आखणी केलेली आहे. बेस्ट उपक्रमातर्फे मुंबई शहरात गणेशभक्तांसाठी ७१ मिरवणूक मार्ग, २० विसर्जन स्थळे आणि ३९ कृत्रिम तलाव येथे २५९१ दिवे लावण्याची प्रकाश योजना करण्यात येणार आहे. विसर्जन स्थळांवर सुयोग्य प्रकाश व्यवस्थेकरीता एकूण ११ स्थायी विद्युत मनो-यांची उभारणी केली आहे.


**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.


# तानसा नदीवरील नवीन पूल धोकादायक; दिड कोटी खर्चून स्लॅब टाकला, मात्र काही महिन्यातच तडे

प्रतिनिधी

■ वसई

तानसा नदीवरील मेढे येथील पूल ठेंगणा असल्याने या जुन्या पुलाच्या बरोबर उजव्या हातावर पलिकडच्या गावांत जाण्यासाठी नवीन उंच पूल सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बांधण्यात आला आहे. मात्र सुरूवातीपासूनच या पुलाच्या मागे साडेसाती लागली आहे. पूल बांधून पूर्ण झालेला असताना देखीळ बरेच कालावधीपर्यंत तो वाहतुकीसाठी खुला नसल्याने नागरिकांना जुन्याच पुलाचा आधार घ्यावा लागत होता. दरम्यान, गेल्या वर्षी याच पूलाच्या दोन्ही बाजूचा भराव पुरामुळे वाहून गेला होता. त्यामुळे दिड कोटी खर्च करून येथे स्लॅब टाकण्यात आला आहे. मात्र या स्लॅबलाच तडे गेल्याने पुलाच्या क्षमतेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.





मेढे फाटा येथून मेढे, आंबोडे, कळंभोण, भिनार, वडघर या गावात जाण्यासाठी मध्ये तानसा नदी लागते. या नदीवर तत्कालीन ठाणे जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने पूल बांधण्यात आला आहे. मात्र हा पूल अतिशय ठेंगणा असल्याने पहिल्याच जोराच्या पावसातही हा पूल पाण्याखाली जातो. त्यामुळे पुलावरचे पाणी ओसरेपर्यंत नागरिकांचा मुख्य भागाशी संपर्क तुटत असे. चाकरमान्यांना तर राष्ट्रीय महामार्गावरून बेलवडी असा प्रवास करत मग घर गाठावे लागत असे. या सर्वात मेढेकरांच्या यातनांचा स्फोट झाला होता. संतप्त जनमतानंतर तानसा नदीवर नवीन मेढे पूल बांधण्यात आला असला तरी या पुलाच्या बांधकाम क्षमतेवर प्रश्न उभा राहिला आहे.

वाहून गेलेला दोन्ही बाजूच्या भरावामुळे पुलाला धोका निर्माण झालेला असताना पुलाच्या ठिकाणी दोन महिन्यांपूर्वीच दिड कोटी रुपये खर्च करून वसई तालुक्यातील आंबोडे,मेढे,वडघर,कळभोण, भिनार,आडणे या गांवाना जोडणारा तानसा नदीवरील पुलाच्या संरक्षक भिंतीवर पाण्याचा निचरा होण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून स्लॅब टाकण्यात आला होता. परंतू अवघ्या दोनच महिन्यांत संबंधित स्लॅबला भगदाड पडले आहे. त्यामुळे पुलाच्या क्षमतेवर प्रश्न उभा राहिला असून अपघाताची भिती ग्रामस्थांनी वर्तवली आहे.

# शेतात लावलेले गरवे भात झाले हलवे

## समिना वाणाचा प्रकार; शेतकरी संकटात



प्रतिनिधी

■ वसई

भातशेती करताना शेतात गरवे लावलेली भात कमी वेळातच त्या भात पिकाने कणीस दिल्याने ते हलवे असल्याने या बाबत समीना भाताच्या वाणात अनेक शेतकऱ्यांची फसगत झाली आहे. १२५ दिवसात गरबे म्हणून शेतात लावलेले हे पिक आता ७५ दिवसात तयार होणार असल्याने पावसात हे पीक काढावे लागणार आहे. या पिकामुळे मात्र शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची शक्यता आहे.

वसई तालुक्यात भात शेती मोठ्या प्रमाणात केली जाते. हळवे, निमगरवे व गरवे अशी स्वरूपात भाताची पिके घेतली जातात. हळवे भात पीक हे ७५ दिवसात तयार होते तर गरवी पीक ही १२५ दिवसात काढली जातात. ज्या शेतात कमी पाणथळ जागा असते त्या शेतात हलवे पीक घेतले जाते. जी जागा पाणथळ असते त्या शेतात गरवे पीक घेतले जाते. मात्र शेतकऱ्यांनी लावलेले समिना जातीचे भाताचे हे उशिरा येणारे भात पिक असल्याचे बियाणे उत्पादन कंपनीने शेतकऱ्यांना सांगितले. शेतकऱ्यांनी एक काडी याप्रमाणे आपल्या शेतात लागवड केली मात्र शेतकऱ्यांच्या अंदाजाप्रमाणे या पिकाने उशिरा कणीस टाकायला हवे होते. पण ते आता लवकरच भात पीक तयार होणार असल्याने शेतकऱ्यांना या पिकाची पावसातच कापणी करावी लागणार आहे. असे शेतकरी वर्गाचे म्हणणे आहे. मात्र हे बियाणे पुरवणाऱ्या कंपनी अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता त्यानी हे भात कणीस दिल्यानंतर कणसामध्ये भात करण्यासाठीं वेळ लागत असल्याने ते भात पिक १२५ दिवसातच तयार होणार आहे. मात्र लवकर झाल्यास व शेतकऱ्याचे नुकसान झाल्यास कंपनीकडून त्या शेतकऱ्यास नुकसान भरपाई मिळणार असल्याचे सांगितले आहे.

## खोचिवडे गावच्या उपसरपंच पदी बविआचे जितेंद्र तांबडे विजयी



■ वसई

खोचिवडे ग्रामपंचाययतीच्या उपसरपंच धृवाली धीरज वर्तक यांनी दीड वर्षाच्या कार्यकाळानंतर पदाचा राजीनामा दिल्याने खोचिवडे ग्रामपंचायतीतील उपसरपंच पद रिक्त होते. या रिक्त पदासाठी घेण्यात आलेल्या निवडणुकीत बहुजन विकास आघाडीचे जितेंद्र तांबडे हे विजयी झाले आहेत. त्यांनी गाव परिवर्तन पॅनलचे मनोज फाटक यांचा पराभव केला.

खोचिवडे ग्रामपंचायतीत बहुजन विकास आघाडीचे सात तर गाव परिवर्तन पॅनलचे दोन सदस्य व एक सरपंच थेट निवडून आला आहे. खोचिवडे गावच्या उपसरपंच धृवाली वर्तक यांच्या राजीनाम्यानंतर उपसरपंच पदाची जागा रिक्त होती. त्यासाठी बविआच्या जितेंद्र तांबडे व गाव परिवर्तन पॅनलच्या मनोज फाटक यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. आता ते खोचिवडे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी काम पाहणार आहेत.

उपसरपंच पदाची निवडणूक जिंकल्यानंतर नवनिर्वाचित उपसरपंच जितेंद्र माणिक तांबडे यांचे वसई पंचायत समितीचे माजी सभापती संजय म्हात्रे, माजी सरपंच नंदकुमार वैती, ठाणे जिल्हा बँकेचे अध्यक्ष निवृत्ती घुसेकर, माजी परिवहन सभापती प्रितेश पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले.





*वसई : कृपाली म्हात्रे , (दहिसर, मुंबई )या वाडवळ कन्येने वसई विरार क्रीडा महोत्सव आयोजित संपूर्ण महाराष्ट्रासाठी खुल्या सौंदर्य स्पर्धेत वय वर्ष ३६ पुढील 'एलिट मिसेस श्रावण सुंदरी २०२४' या स्पर्धेत फर्स्ट रनर्स उप (द्वितीय क्रमांक) मिळविला आहे. प्रविणाताई हितेंद्र ठाकूर यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. प्राथमिक फेरी , टॅलेन्ट फेरी पार करून फायनॅलिस्ट आणि टॉप ३ पर्यंत तिने मजल मारली. .वामन हरी पेठे पुरस्कृत ह्या स्पर्धेत तिने 'बेस्ट रॅम्प वॉल्क' हे टायटलसुद्धा मिळवले. तीन झगमगती ट्रॉफी,२०००० रुपये रोख आणि वामन हरी पेठेंकडून २४ कॅरेटचा सुवर्ण अलंकार हे तीला बक्षीस म्हणून मिळाले. तसेच फेब्रुवारी २०२४ मध्ये झालेल्या 'मिसेस मुंबई २०२४'चीही ती फर्स्ट रनर्स अप ठरली होती. व्यावसायिका, फॅशन डिजानयर ,स्टायलिस्ट t आणि युटूबर कृपाली म्हात्रे हिचे सर्वत्र मोठे कौतुक होत आहे.*

# नितेश राणेंचे उदगार संविधान, न्यायालय, पोलिस यांना आव्हान देणारे

## - माजीआमदार युसुफ अब्राहनी

प्रतिनिधी

■ मुंबई

भाजपचे आमदार नितेश राणे हे अहमदनगर येथे मुस्लिमांना मशिदीतून बाहेर काढून मारू .असे म्हणाले. पण असे बोलून राणे यांनी संविधान, न्यायालय , पोलिस यांना आव्हान दिले आहे. आम्हाला नाही. त्यांनी असे बोलून त्यांना किंवा त्यांच्या पक्षाला फायदा नव्हे तर नुकसानच होणार आहे. अशी प्रतिक्रिया माजी आमदार, इस्लाम जिमखान्याचे





अध्यक्ष युसुफ अब्राहनी यांनी व्यक्त केली. ते प्रेस क्लब मध्ये पत्रकारांशी बोलत होते.

सध्या राजकीय फायदा मिळवण्यासाठी इस्लाम आणि प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या विरोधात चुकीच्या माहितीचा संघटित प्रचार केला जात आहे. इतर धर्माचे लोक प्रसारमाध्यमांद्वारे दाखवलेल्या गोष्टींवर विश्वास ठेवतात तर सत्य काहीतरी वेगळे असते, ते शोधण्याची प्रतीक्षा करतात. या दुष्ट प्रचारामुळे सामाजिक असंतोष, अशांतता आणि टाळता येण्याजोगे संघर्ष निर्माण झाले आहेत. त्यासाठी रबी-उल-अव्वाल या इस्लामिक महिन्यात होणाऱ्या प्रेषित मुहम्मद यांच्या जन्मदिनानिमित्त ProphetForAll मोहिमेसाठी मुख्य संघासह अॅड. युसूफ अब्राणी यांच्या नेतृत्वाखाली आयोजित उदात्त उपक्रमासाठी प्रमुख मुस्लिमांच्या गटाने एकत्र येऊन 4 सप्टेंबर आणि 16 सप्टेंबर व 12 व्या रबी-उल-अव्वाल पर्यंत, पैगंबर मुहम्मद यांचा जन्मदिवस (स.) मैत्री, शांती आणि बंधुत्वाचा संदेश देणारा म्हणून महाराष्ट्रासह गुजरात, राजस्थान व इतर राज्यातही १२ दिवस साजरा करण्यात येणार असल्याचे अब्राहनी म्हणाले.

# पारोळ वीज उपकेंद्राचा गलथान कारभार; ठोकमठाक विजदेयकांमुळे गोरगरीबांना आर्थिक भुर्दंड

प्रतिनिधी

■ वसई

विरार पूर्वेतील पारोळ वीज उपकेंद्राच्या सतत गलथान कारभारामुळे ग्रामीण भागातील गोरगरीब वीज ग्राहकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. ठोकमठाक वीज बिलांमुळे या वीज उपकेंद्राचा कारभार काळवंडला असून वीज अधिकारी गोरगरीब नागरिकांच्या खिशावर अक्षरशः डल्ला मारत असल्याचा संताप व्यक्त होत आहे. पारोळ वीज उपकेंद्राच्या मोघलाईमुळे नागरिकांत संतापाचे वातावरण असून त्याचा कोणत्याही क्षणी उद्रेक होऊ शकतो.

या वीज उपकेंद्रात ठेका तत्वावर काही कर्मचारी कामावर आहेत. त्यांच्याकडुन महिन्याकाठी वीज मिटरमध्ये किती युनिट जमा झाले आहेत, त्याचा मोबाईल कॅमेऱ्यामध्ये फोटो काढुन तो वीज मंडळाकडे पुढील वीज देयके बनवण्यासाठी पाठवला जातो. मात्र या ठेका कर्मचाऱ्यांकडून कर्मदरिद्री कारभार अवलंबला जात असल्याने गोरगरीब नागरिकांना त्याचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

कधी कधी वीज पुरवठ खंडित असल्याने वीज मिटरमध्ये किती युनिट जमा झालेत ते दिसून येत नाही. तसेच वीज मिटरवरील स्क्रीन ऑफ दाखवली जाते. अशावेळी रिडिंग घेण्यासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्याकडून वीज मिटरवरील ऑफ स्क्रीनचा फोटो काढून नेला जातो. साहजिकच वीज देयकं देताना त्या देयकावर चालू रिडिग उपलब्ध नसल्याचे नोंदवले जाते व ठोकमठाक बिले दिली जातात. चालू रिडिंग उपलब्ध नसताना मागच्या चालू बिलाची पार्श्वभूमी लक्षात न घेता संबंधित वीज ग्राहकाला मोठ्या प्रमाणात किमान 50 ते 60 वीज युनिट वाढवून दिले जातात. या पर युनिटमागे मोठा भुर्दंड गोरगरीब जनतेला भोगावा लागत आहे.

ग्रामीण भागात आदिवासी समाज मोठ्या प्रमाणावर वास्तव्याला आहे. या नागरिकांच्या निरक्षरपणाचा फायदा घेत त्यांच्या खिशावर डल्ला मारण्याचे उद्योग या पारोळ वीज उपकेंद्राकडून सुरू असल्याने नागरिकांत संतापाचे वातावरण आहे. एखाद्या वेळी वीज पुरवठा खंडित होतो, तेव्हा वीज मिटरवर युनिट दर्शवणारी स्क्रीन ऑफ दाखवते, अशावेळी रिडिंग घेणाऱ्या संबंधित ठेका कर्मचाऱ्याने पुन्हा त्याच ठिकाणी जाऊन वीज रिडिंग घेणे गरजेचे आहे. मात्र तसे न करता धांदळीने कामे केली जात आहेत. त्याचा आर्थिक भुर्दंड गोरगरीब नागरिकांना भरावा लागतो. दरम्यान, पारोळ वीज उपकेंद्राची पार्श्वभूमीच वादातीत असून या उपकेंद्राकडून तक्रारदारांची टोळवाटोळवी केली जाते. अशा पार्श्वभूमीवर नागरिकांत संतापाचे वातावरण आहे. त्याचा कोणत्याही क्षणी भडका उडू शकतो.

# बॉलिवूडमधील तीन नवीन गाण्यांचे शानदार लॉंचिंग

प्रतिनिधी

■ मुंबई

सीताराम निर्मित आणि ओकेश्रवण दिग्दर्शित तीन नवीन गाण्यांच्या लॉंचसह बॉलीवूडच्या संगीत आणि ग्लॅमर मंडळींनी एका भव्य रात्रीचा आनंद लुटला. या कार्यक्रमाला बॉलिवूड स्टार अरबाज खान याच्या खास उपस्थितीसह अनेक सेलिब्रिटींनी हजेरी लावली होती.



पहिले गाणे, “बिलबोर्ड” मध्ये गिरी जी एक गायक, रॅपर आणि संगीतकार म्हणून दाखवले आहे, जे रॅप आणि पॉपचे दोलायमान मिश्रण सादर करते जे प्रत्येकाला नाचायला लावेल.

"माहिया वे" ही अजय केसवानी यांनी गायलेली आणि संजीव चतुर्वेदी यांनी संगीतबद्ध केलेली एक रोमँटिक ट्यून आहे, ज्यात पियुष तिवारी आणि रैना बसनेत यांची भूमिका आहे. केसवानी यांच्या अभिनयाने प्रेक्षकांना मनापासून मंत्रमुग्ध केले.

"दागा" हा तिसरा ट्रॅक पियुष तिवारी आणि उर्वशी अप्सरा यांच्या गायनाने बनवला आहे आणि त्यात गिरीजी आहेत. हर्षित चौहानचे गायन आणि गाण्याचे उत्कट व्हिज्युअल यांनी प्रेक्षकांना भुरळ घातली.

प्रमुख पाहुणे अरबाज खान यांनी गाण्यांमागील नवीन प्रतिभेचे कौतुक करून कार्यक्रमाची प्रतिष्ठा वाढवली. यशस्वी संगीत प्रक्षेपण सूचित करते की "बिलबोर्ड", "माहिया वे" आणि "दगा" लवकरच आवडते गाणी बनतील.

# म्युनिसिपल बँकेचा कारभार पारदर्शकच: बँक आर्थिकदृष्टयाही सक्षम

प्रतिनिधी

■ मुंबई

२ सप्टेंबर २०२४ रोजीच्या 'दैनिक वृत्तमानस'च्या आवृत्तीत 'म्युनिसिपल बँकेच्या कारभारात हवी पारदर्शकता : सभासदाची मागणी' या शिर्षकाने वृत्त प्रसिद्ध झाले होते. त्याबाबत बँक व्यवस्थापन खुलासा करते कि, आर्थिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये बँकेने एकूण व्यवहारात रु. ७,००० कोटींचा टप्पा पार केला असून बँकेचा ढोबळ एन्.पी.ए. रु.१३० कोटी इतका आहे. बँकेच्या वेळोवेळी होणाऱ्या (कंकरंट, वैधानिक आणि भारतीय रिझर्व्ह बँक) लेखा तपासणी अहवालानुसार यास मान्यता मिळाली आहे.

महाराष्ट्र अधिनियम सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ नुसार थकित कर्ज वसूली प्रकरणी कारवाई करण्यात येत आहे.सिबील संदर्भात कर्ज प्रकरणांत प्राप्त तक्रारींस अनुसरुन बँक प्रशासन स्तरावर चौकशी सुरु आहे.बँकेचे सभासद रुपेश पुरळकर, संजय जाधव, मनोज सागर यांनी बँकेच्या जी/साऊथ, जी/नॉर्थ शाखा व्यवस्थापकांना दिलेल्या मागणी अर्जाच्या अनुषंगाने त्यांना बँकेकडून खुलासा देण्यात येईल.बँकेचा एकूण कारभार पारदर्शक आहे तसेच बँक आर्थिकदृष्टया सक्षम आहे. असे स्पष्टीकरण महाव्यवस्थाप दि म्युनिसिपल बँक मुंबई यांनी केले आहे.

# सेन्सॉर बोर्डच्या प्रादेशिक अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

प्रतिनिधी

■ मुंबई

"चल हल्ला बोल" या चित्रपटाच्या दिग्दर्शक आणि निर्माते तसेच पत्रकारांना अपमानास्पद वागणूक देणाऱ्या केंद्रीय फिल्म प्रमाणन बोर्डच्या मुंबई येथील प्रादेशिक अधिकारी सैय्यद रब्बेहास्मी यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी विविध सामाजिक संघटना आणि कार्यकर्त्यांनी केली आहे.





चित्रपट दिग्दर्शक महेश बनसोडे यांच्या लोक वर्गणीतून निर्माण झालेल्या ' चल हल्ला बोल या चित्रपटावर सेन्सॉर बोर्ड ने हरकत घेतली तसेच काही दृश्ये कापण्यास सांगितली.याबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी गेलेल्या बनसोडे आणि इतरांना सैय्यद यांनी अपमानास्पद वागणूक दिल्याची कार्यकर्त्यांची तक्रार आहे.या बाबत बोलताना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुमेध जाधव म्हणाले की,आपण केवळ एकट्या बनसोडे यांच्याशीच बोलू असं म्हणत सैय्यद हे बैठकीतून उठून निघून गेले. मात्र कार्यकर्त्यांची नावे आधी देऊन तसेच वेळ ठरवून गेलेल्या कार्यकर्त्यांशी अशा प्रकारे वर्तन करणे गैर आहे. महेश बनसोडे एकटे चर्चा करण्यास गेले असता माझ्याविरुद्ध केस करा असं म्हणत सैय्यद यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याचे बनसोडे म्हणाले.

सर्व सामान्य बहुजन निर्माता दिग्दर्शक यांना अपमानास्पद वागणूक देऊन त्यांचा छळ करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई झाली नाही तर याविरोधात जोरदार अभियान चालवले जाईल असा इशारा लोकांचे दोस्त चे रवि भिलाणे यांनी दिला आहे. शिष्टमंडळात बनसोडे यांच्यासह सुमेध जाधव,रवि भिलाणे,पत्रकार संजय शिंदे,अभिनेत्री करुणा कातखडे, आदर्श पोपट सातपुते आदींचा समावेश होता.

# संविधानबाबत खोट्या माहितींचा प्रसार रोखण्यासाठी मोहीम

'संविधान जागर यात्रा 2024' चा चैत्यभूमी येथे समारोप

प्रतिनिधी

■ मुंबई

भारत संविधान लागू झाल्याच्या ७५ व्या वर्धापनदिनानिमित्त केंद्र सरकारने 'संविधान जागर यात्रा२०२४' सुरू केली आहे. केंद्र सरकार 'संविधानअमृत महोत्सव' साजरा करत आहे. लोकांना त्यांच्या संवैधानिकअधिकारांची माहिती देणे आणि लोकशाहीविरोधी खोटी माहितींचा प्रसार रोखण्यासाठी हीमोहिम आखली आहे. संविधान जागर समिती या यात्रेचे आयोजक असून ८ सप्टेंबर रोजी मुंबईच्या दादर येथील चैत्यभूमीवर या यात्रेचा समारोप होणार आहे. संविधान जागर यात्रा लोकांना भारतीय संविधान आणि त्यात समाविष्ट असलेल्या लोकशाही मूल्यांबद्दल शिक्षित करणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टीकोनाला प्रोत्साहन देणे, आणि स्वतंत्रता, समानता, भ्रातृत्व, आणि न्याय या मूल्यांना महत्व देणे हा उद्देश समितीचा आहे.

संविधान जागर यात्रेत कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे नातू राजेंद्र गायकवाड आणि वाल्मिक निकाळजे सहभागी झाले होते.आकाश अंभोरे, योजना ठोकळे, स्नेहा भालेराव आदी मान्यवर या यात्रेसाठी महाराष्ट्रभर फिरत आहेत.

या यात्रा ९ ऑगस्ट रोजी महाड येथून सुरू झालीअसून आता आता पर्यंत या यात्रेने संपूर्ण महाराष्ट्रात दौरा केला आहे. या माध्यमातून बाबासाहेब आंबेडकर यांच्या कल्पनेतील लोकशाही मूल्यांचे जतन करण्यासाठी तसेच संविधानाविरोधी वाढत्या विरोधी प्रचाराचा प्रतिकारकरण्यासाठी हि संविधान यात्रा आहे. लोकसभा निवडणुकीच्या काळात आणित्यानंतर विरोधकांनी संविधानाबाबत खोटा प्रचार करून लोकांमध्ये शंका निर्माण केलीआहे.

विशेषत: अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि अल्पसंख्याकसमुदायात भिती निर्माण झाली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी संविधानावर झालेल्या 'आघात'ला सर्वात मोठा धोका मानले आणि या मुद्द्यावरनिवडणूक मोहीम राबवली होती. काँग्रेसने केलेले आरोप कायदेशीर आधारावर टिकू शकणार नाहीत, सुप्रीम कोर्टाने 'केसवनंद भारती' निर्णयात संविधानाच्या मूलभूत रचनेलाबदलता येणार नाही असे स्पष्ट केले आहे. तरीही विरोधकांनी अनुसूचित जातींच्या लोकांमध्ये संविधान नष्ट होईल अशी भीती निर्माण केली असे समितीने म्हटले आहे.

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 77**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - ७७**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

**मुंबई ।** प्रभाग क्रमांक २०६ शिवडी काळाचौकी विभागातील ज्या नागरिकांच्या घरी "श्री गणेश मूर्तीची"* स्थापना केली जाते अशा भक्तांच्या घरी यंदाही शिवसेना माजी नगरसेवक सचिन पडवळ यांच्या वतीने "गणेश पूजन साहित्य पेटीचे वाटप" करण्यात येणार आहे.या उपक्रमाचा शुभारंभ शिवसेना नेते युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.यावेळेस शिवसेना नेते खासदार अरविंद सावंत, विधान परिषद आमदार सचिन भाऊ अहिर, माजी महापौर किशोरी पेडणेकर, विभागप्रमुख आशिष चेंबुरकर आणि शाखाप्रमुख बैजू हिंदोळे, युवा सेना उपसचिव मुकेश कोळी हे देखील उपस्थित होते.



# बृहन्मुंबई महानगरपालिकेचा 151 वा वर्धापन दिन उत्साह आणि जल्लोषात

प्रतिनिधी
■ मुंबई



बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १५१ वा स्थापना दिवस महानगरपालिका मुख्यालयात तसेच विभागीय कार्यालयांमध्ये बुधवारी ४ सप्टेंबर २०२४ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विविध कार्यालयांमध्ये स्थापना दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत विलेपार्ले परिसरातील दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात आयोजित एका कार्यक्रमास सुप्रसिद्ध संतूर वादक पद्मश्री सतीश व्यास व सुप्रसिद्ध गायिका वैशाली सामंत यांची उपस्थिती होती.

पालिका मुख्यालयातील विविध खात्यांमध्ये देखील सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने जनसंपर्क विभागामार्फत खाद्य संस्कृती विषयक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ए विभागामार्फत वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तर दक्षिण मुंबईतील ए विभागाअंतर्गत येणाऱ्या पर्यटन स्थळांच्या ठिकाणी स्वच्छतेबाबत पर्यटकांमध्ये जनजागृती आजच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने करण्यात आली. डी विभागात कचरा वर्गीकरण व पर्यावरण संतुलनाबाबत प्रबोधनात्मक फेरी काढण्यात आली. ऑगस्ट क्रांती मैदान परिसरात काढण्यात आलेल्या फेरीला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. पूर्व उपनगरांमधील एल विभागामध्ये शाळा तसेच रेल्वे स्थानक परिसरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

# कोकणात जाणाऱ्या गणेश भक्तांना टोल माफी

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

प्रतिनिधी
■ मुंबई

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना गुरुवार ५ सप्टेंबर ते गुरुवार १९ सप्टेंबर या कालावधीत पथकर (टोल) माफी देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. त्यासंबधीचा शासन निर्णय मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानंतर प्रसिद्ध करण्यात आला आहे. मुंबई – बंगळुरु राष्ट्रीय महामार्ग, मुंबई – गोवा राष्ट्रीय महामार्ग यावरील आणि इतर सार्वजनिक बांधकाम विभागांच्या रस्त्यांवरील पथकर नाक्यांवर ही सवलत लागू असणार आहे.

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना टोलमाफीसह अन्य सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी १४ ऑगस्ट रोजी झालेल्या



गणेशोत्सव पूर्वतयारी आढावा बैठकीत सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले होते, त्यानुसार काल सार्वजनिक बांधकाम विभागाने पथकर सवलतीचा शासन निर्णय जारी केला आहे.

या टोलमाफी सवलतीसाठी 'गणेशोत्सव २०२४, कोकण दर्शन' अशा आशयाचे स्टीकर्स स्वरुपाचे पथकर माफी पास, त्यावर वाहन क्रमांक, चालकाचे नाव असा मजकूर लिहून ते स्टीकर्स आवश्यक त्या संख्येनुसार परिवहन विभाग, वाहतूक पोलीस/पोलीस, संबंधित प्रादेशिक परिवहन विभाग (आर.टी.ओ.) यांनी समन्वय साधून पोलीस ठाणे, वाहतूक पोलीस चौक्या व आर.टी.ओ. कार्यालयांमध्ये उपलब्ध करुन द्यावेत, असे आदेश देण्यात आले आहेत. हाच पास परतीच्या प्रवासाकरीता देखील ग्राह्य धरण्यात येईल.

***एस टी बसेसनाही सवलत***

*गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसनाही टोल माफी लागू असणार आहे. गणेशोत्सवासाठी ज्या जिल्ह्यातून बसेस येथील त्या ठिकाणच्या पोलीस किंवा आरटीओ यांच्याकडून हे पास एसटी महामंडळाला उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. पोलीस व परिवहन विभागाने गणेशोत्सवाच्या काळात पास सुविधा आणि त्यांच्या उपलब्धतेबाबतची माहिती नागरिकांना द्याव्यात अशा सूचना सुद्धा देण्यात आल्या आहेत.*


## बृहन्मुंबई महानगरपालिका

**(जल अभियंता विभाग)**
**ई-निविदा सूचना**

बृहन्मुंबई महानगरपालिकाचे आयुक्त खाली तपशिलामध्ये देण्यात आलेल्या कामासाठी ह्याच क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या संस्थाकडून शतमान पद्धतीमध्ये तीन लिफाफा पद्धतीमध्ये ऑन लाईन निविदा मागविण्यात येत आहेत

| | |
|---|---|
| निविदा आयडी | २०२४_एमसीजीएम_१०७७६८३ |
| संस्थेचे नाव | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| विषय | एईडब्ल्यूडब्ल्यू(एम) प ऊ / उत्तर विभाग अंतर्गत आणि ए ई डब्ल्यू डब्ल्यू (सी) प उ विभागासाठी वर्कशॉप सेक्शनकरीता आवश्यक विविध साहित्याचा पुरवठा. |
| छाननी शुल्क | रु. ३,८९४/- (रु. ३,३००/- + १८% लागू जीएसटी |
| ई-निविदेचे शुल्क (अंदाजे शुल्क) | -- |
| बोली सुरक्षा ठेव/ इरठे | रु. २२,०००/- |
| निविदा विक्री आणि सादरीकरणाचा दिनांक | ०४/०९/२०२४ रोजी ११:०० वा . पासून |
| निविदेच्या विक्रीसाठी आणि बोली सुरक्षा ठेव स्वीकृतीकरिता शेवटचा दिनांक आणि वेळ | १८/०९/२०२४ रोजी १६:०० वा. पर्यंत |
| लिफाफा ए, बी आणि सी चे सादरीकरण (ऑन लाईन) | १८/०९/२०२४ रोजी १६.०० वा. पर्यंत |
| लिफाफा ए उघडणे | २०/०९/२०२४ रोजी १५.०१ वा. नंतर |
| लिफाफा बी उघडणे | २३/०९/२०२४ रोजी १५.०५ वा. नंतर |
| लिफाफा सी उघडणे (व्यावसायिक लिफाफा) | ३०/०९/२०२४ रोजी १५.०० वा. नंतर |
| संकेतस्थळ | https://mahatenders.gov.in |
| संपर्क व्यक्ती | श्रीमती एम. एस. खोपकर (एसई) ९८७०८४९९९५<br>श्री. एन. एन. गोसावी (ए.ई.) (मो.क्र. ९९३०२६०५०५) |
| पत्रव्यवहारासाठी पत्ता | सहाय्यक अभियंता जल कार्ये (देखभाल), पश्चिम उपनगरे/ उत्तर, म्युनिसिपल मार्केट बिल्डींग, पवनधाम मंदिरासमोर, महावीर नगर, हार्मोनी टॉवर जवळ, बोरीवली (पश्चिम), मुंबई ४०००९२. |
| बोली उघडण्यासाठी ठिकाण | सहाय्यक अभियंता जल कार्ये (देखभाल), पश्चिम उपनगरे/ उत्तर, म्युनिसिपल मार्केट बिल्डींग, पवनधाम मंदिरासमोर, महावीर नगर, हार्मोनी टॉवर जवळ, बोरीवली (पश्चिम), मुंबई ४०००९२ ह्यांच्या कार्यालयामध्ये ऑन लाईन |

निविदा कागदपत्रे हस्तांतरीत करता येणार नाहीत.
बृमनपा कोणतेही कारण न देता वरील विषयाच्या संदर्भात कोणताही अर्ज किंवा स्विकारलेला कोणताही किंवा सर्व अर्ज नाकारण्याचे अधिकार राखून ठेवत आहेत.

**सही/-** कार्य अभि. (एम) एम
**सही/-** डब्ल्यू उप जल अभियंता (देखभाल)

पीआरओ/११७१/जाही/२०२४-२५
**कोणताही ताप असू शकतो हिवताप.**


## नागपूर-गोवा शक्तीपीठ मार्ग प्रकल्प गुंडाळला

प्रतिनिधी
■ मुंबई

महायुती सरकारचा ड्रीम प्रोजेक्ट असलेला नागपूर-गोवा शक्तिपीठ मार्गाला कायमचा ब्रेक लागला आहे. शक्तिपीठ मार्गासाठीची भूसंपादनाची अधिसूचना रद्द करण्याची तयारी महायुती सरकारनं सुरु केली आहे. त्यासाठीचा प्रस्ताव एमएसआरडीसीकडून तयार करण्यात आला आहे. हा प्रस्ताव लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडे स्वाक्षरीसाठी पाठवण्यात आला आहे. शक्तिपीठ मार्गाचं वर्णन दुसरा समृद्धी महामार्ग असं केलं जात होतं. पण आता हा ड्रीम प्रोजेक्ट महायुती सरकारकडून गुंडाळण्यात आला आहे.

शक्तिपीठ मार्ग राज्यातील १२ जिल्ह्यांमधून जाणार होता. तब्बल ८०२ किलोमीटरच्या लांबीच्या रस्त्यासाठी २७ हजार हेक्टर जमीन अधिग्रहित केली जाणार होती. त्याची तयारीही सुरु झाली होती. पण भूसंपादनाला शेतकऱ्यांनी कडाडून विरोध केला. पश्चिम महाराष्ट्रातून सर्वाधिक रोष पाहायला मिळाला. त्याचा फटका लोकसभा निवडणुकीत महायुतीला बसला. विशेषत: कोल्हापुरात शक्तिपीठ मार्गाबद्दल प्रचंड नाराजी होती. याच नाराजीची दखल घेत विधानसभा निवडणुकीत होणारं संभाव्य नुकसान टाळण्यासाठी शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग या १२ जिल्ह्यांतून शक्तिपीठ मार्ग जाणार होता. शक्तीपीठ महामार्ग उभारणीसाठी राज्य सरकार ८६ हजार कोटी रुपये खर्च करणार होतं. लोकांचा असलेला विरोध पाहता सरकारनं भूसंपादनाचं काम थांबवलं होतं. आता विधानसभा निवडणूक तोंडावर आलेली असताना सरकारनं भूसंपादनाची अधिसूचनाच रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

# रिपब्लिकन कार्यकर्त्यांना महायुतीने सत्तेत सहभाग आणि सन्मान द्यावा!

## रामदास आठवले यांची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

प्रधानमंत्री नरेंद्र मोदींचा विश्वास मी जिंकला आल्यामुळे केंद्रीय मंत्रिमंडळात मला स्थान मिळाले आहे.त्यामुळे देशभर रिपब्लिकन पक्ष वाढत आहे.रिपब्लिकन पक्षात दलितांसोबत सर्व जाती धर्माचे लोक मोठ्या प्रमाणात जोडले जात आहेत.ईशान्य भारतात रिपब्लिकन पक्षाची ताकद वाढली आहे.

महाराष्ट्रात संघटनात्मक बांधणी करून लोकांना जोडून पक्षाचे बळ वाढवावे लागेल त्यानंतर स्वबळाची भाषा करावी लागेल असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी केले.

षण्मुखानंद सभागृह येथे मुंबई प्रदेश रिपब्लिकन पक्षातर्फे केंद्रीय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला



होता त्यावेळी सत्काराला उत्तर देताना ना रामदास आठवले बोलत होते यावेळी विचारमंचावर भाजप प्रवक्ते आमदार प्रवीण दरेकर, रासप चे माजी मंत्री महादेव जानकर, सौ सीमाताई आठवले, अध्यक्ष स्थानी रिपाइं चे मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे, माजी मंत्री अविनाश महातेकर, रिपाइं चे महाराष्ट्र अध्यक्ष राजा सरवदे, राज्यसरचिटणीस गौतम सोनवणे, मुंबई प्रदेश कार्याध्यक्ष बाळासाहेब गरुड, सूत्रसंचालन विवेक पवार यांनी केले. सुनील बन्सी मोरे, दयाळ बहादुर, सुरेश बारशिंग, श्रीकांत भालेराव आशाताई लांडगे शीलाताई गांगुर्डे,अनिल गांगुर्डे, अभाया सोनवणे, फुलाबाई सोनवणे, उषा रामलू,सौ नैनाताई वैराट, प्रकाश जाधव, रमेश गायकवाड, संजय डोळसे, संजय पवार, अजित रणदिवे साधू कटके, सोहेल शेख , रवी गायकवाड, डी एम चव्हाण, ऋषी माळी आदी अनेक मान्यवर उपस्थित होते

माझ्यासोबत प्रामाणिक कार्यकर्त्यांची फौज आहे. वर्षोनुवर्षे त्यांना काही मिळाले नाही तरी माझ्या सोबत आहेत. राज्यात महायुती सरकार शासन आपल्या दारी आणि लाडकी बहिण योजनेचे कार्यक्रम घेते तेंव्हा रिपब्लिकन कार्यकर्त्यांना डावलले जाते.त्यांना सन्मानाने या शासकीय कार्यक्रमांना निमंत्रित केले जात नाही. रिपब्लिकन पक्ष हा महायुती चा प्रमुख घटक पक्ष आहे. त्यामुळे महायुती सरकारने रिपब्लिकन कार्यकर्त्यांना जिल्हा नियोजन समिती जिल्हा तालुका कमिटी राज्यस्तरीय महांमंडळांवर सत्तेत सहभाग द्यावा आणि सन्मान द्यावा अशी सूचना रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी केली.

यावेळी आमदार प्रवीण दरेकर यांनी ना.रामदास आठवले यांच्यावर कविता सादर करून देशात सर्वात मोठे दलितांचे आंबेडकरी जनतेचे नेते रामदास आठवले हेच एकमेव असल्याचे गौरवोद्गार काढले.त्यांचा आदर्श घेऊन रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी आपल्या भागात काम करावे म्हणजे रिपब्लिकन पक्षाची ताकद वाढेल आणि सत्तेचा वाटा उमेदवारी मागायची वेळ येणार नाहीतर मित्रपक्ष स्वतःहून रिपब्लिकन कार्यकर्त्यांना उमेदवारी देण्यास तयार होईल असे मत आमदार प्रवीण दरेकर यांनी व्यक्त केले.


## एसपीव्ही ग्लोबल ट्रेडिंग लिमिटेड

सीआयएन: एल२७१००एमएच१९८५पीएलसी०३५२६८
२८/३०, अनंत वाडी, बिनानी भवन, तळ मजला, भूलेश्वर, मुंबई ४००००२
संपर्क: + ९१ २२ ०१४००१ फॅक्स: + ९१ २२ ०१४००३
ई-मेल : spvglobaltrading@gmail.com संकेतस्थळ: www. spvglobal.in

**कंपनीच्या सभासदांची 39 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेकडे लक्ष देण्यासाठी**

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की कंपनीची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ("एजीएम") सोमवार, ३० सप्टेंबर २०२४ रोजी दु. १२.३० वा. (भाप्रवे) २८/३०, अनंत वाडी भुलेश्वर, मुंबई-४००००२ येथे कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात आयोजित केली जाईल. ३९ व्या एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या व्यवसायाचा व्यवहार करण्यासाठी आयोजित करण्यात येणार आहे. ३९ एजीएमचे ठिकाण कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय असेल.
आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या वार्षिक अहवालासह एजीएम बोलावणारी नोटीस शुक्रवार, ०६ सप्टेंबर, २०२४ रोजी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने केवळ त्या सदस्यांना पाठवली जाईल ज्यांचा ईमेल पत्ता डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स ("डीपी's") /कंपनीकडे नोंदणीकृत आहे. एमसीए परिपत्रक आणि सेबी नियमांनुसार रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट उदा बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड ("आरटीए").
फिजिकल मोडमध्ये शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांनी, ज्यांनी त्यांचे ईमेल पत्ते किंवा मोबाईल नंबर कंपनीकडे नोंदणीकृत/अपडेट केलेले नाहीत, त्यांनी https://www.evoting.nsdl.com/ वर क्लिक करून नोंदणी/ अपडेट करण्याची विनंती केली आहे आणि ज्या सदस्यांकडे आहे. डिमटेरिअलाइज्ड फॉर्ममधील शेअर्स आणि अद्याप नोंदणीकृत नाही
त्यांच्या ई-मेल पत्त्यांवर त्यांच्या डीपीकडे नोंदणी करण्याची विनंती केली जाते. एजीएम दरम्यान रिमोट ई-व्होटिंग किंवा ई-व्होटिंगद्वारे मते देण्याची तपशीलवार प्रक्रिया किंवा सूचना सर्व सदस्यांसाठी (ज्यामध्ये भौतिक स्वरूपात शेअर्स धारण केलेल्या सदस्यांचा समावेश आहे/ ज्यांचे ई-मेल पत्ते डीपी/ कंपनी/ आरटीए कडे नोंदणीकृत नाहीत) नोटीसमध्ये नमूद केले आहेत.
ही जाहिरात कंपनीच्या www.spvglobal.in या वेबसाइटवर आणि बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com वेबसाइटवर देखील उपलब्ध असेल.

**संचालक मंडळाच्या आदेशांद्वारे**
**एसपीव्ही ग्लोबल ट्रेडिंग लिमिटेड करीता**
**सही/-**
**बाळकृष्ण बिनानी**
**व्यवस्थापकीय संचालक**
**डीआयएन: ००१७५०८०**

**दिनांक: ०५ सप्टेंबर ०२४**
**ठिकाण: मुंबई**



## MAHATRANSCO — NOTICE INVITING TENDER CPD/54 -2024-25

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

The due Date and Time of submission and opening of following SRM e-tender is extended as follows:

| Tender No. & Description of Material | Estimated Amount (in Rs. Lakhs) / Tender Fee (in Rs.) | Due Date & Time (Hrs.) for Submission & Opening of Tender |
|---|---|---|
| SP/T-0708/0924 [RFX No. 7000033151] (Two Bid System) Hiring of Agency for Non-Comprehensive Annual Maintenance Contract (AMC) for computer Systems (Desktop/Laptop), Network & Network Peripherals, Printers, Scanners, Computer Peripherals at various locations under MSETCL Corporate office for period of Three [3] years alongwith providing spares & printer toner on rate contract basis for a period of Three [3] years. | 179.52 Lakhs / 5000.00 | 10.09.2024 Up to 17:00 Hrs. / 10.09.2024 at 17:30Hrs |

Contact Person: Office of the Executive Engineer (P&C)
Tel. No.022-69852711/ Cell No.8329909813
**Email: eegrp7@mahatransco.in, eepc@mahatransco.in**
For further details visit our website **http://www.srmetender.mahatransco.in**
Any further amendments will be published on the MSETCL website www.mahatransco.in. So bidders are requested to check the website.

**Sd/-**
**Executive Engineer (P&C)**



## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

**मिळकत विभाग**

**जाहीरात सन २०२४ २०२५**

| अ.क्र. | कामाचे नांव | इसारा अनामत रक्कम | महानगरपालिकेचे किमान मासिक भाडे | अर्ज स्विकारण्याची दिनांक | अर्ज स्विकारण्याची शेवटची दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | भिवंडी नि.शहर महानगरपालिकेचे प्रभाग समिती क्र. ०५ च्या कार्यक्षेत्रातील कोटरगेट मशीद समोरी मौलाना अबुल कलाम आझाद उद्यान पे अॅण्ड युज तत्वावर दहा वर्ष कालावधी करीता निगा, देखभाल, दुरुस्ती तत्वावर भाडयाने देणे कामी इच्छुक नोंदणीकृत व अनुभवी संस्थाकडुन भरण्यात यावे तसेचअर्ज सादर करताना सर्व करासहीत व खर्चासहीत भराव्यात. सोबत नोंदणी केलेले जी.एस.टी. क्रमांक व पॅनकार्ड, आधारकार्ड ची छायांकीत प्रत जोडण्यात यावे पुढील कालवधीत अर्ज मागविण्यात येत आहेत. या बाबतच्या अटी व शर्ती मिळकत विभागातुन प्राप्त करुन घ्यावा. | रु.२ लाख | मासिक भाडे रु २६, २६५/- | ०६/०९/२०२४ ते १८/०९/२०२४ | १८/०९/२०२४ |

वरील प्रक्रियेद्वारे प्राप्त झालेल्या जाहीरातद्वारे दिनांक १८/०९/२०२४ रोजी प्राप्त झालेले अर्ज ठिक दुपारी ४.०० वाजता कोणतेही अर्ज प्रशासकीय सोईप्रमाणे उघडण्यात येतील. कोणतेही अटी व शर्ती शितल करणे व वाढविणे तसेच अर्ज स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांनी राखुन ठेवले आहे. तसेच मनपा मार्फत उद्यानास जे काय भाडे आकारले जाईल त्याच्यावर १८% जी.एस.टी. आकारण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच सदरचे अर्ज मिळकत विभाग, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, नवीन प्रशासकीय इमारत, ६ वा मजला रुम नंबर ६०५ भिवंडी येथे कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस सोडून) बंद लिफाफा मध्ये स्विकारण्यात येतील.

जा.क्र. /ज.सं.वि./११७१
दिनांक : ०४/०९/२०२४

**सही/-**
**मिळकत व्यवस्थापक**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**



## वसई विरार शहर महानगरपालिका

**विभागीय कार्यालय, वसई**
ता. वसई, जि. पालघर- ४०१ २०१.
दूरध्वनी : ०२५०-२३०९०२०/२३२२२५८/२३२३३४३ २३२२०२१, रुग्णालय २३२२१२०.
फैक्स: ०२५० - २३०९८३५ ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र.व.वि.म./बांध) ११४/२०२४ — दिनांक : ०४/०९/२०२४

**सार्व. बांधकाम विभाग, प्रभाग समिती आय, वसई**

**जाहिर ई-निविदा सुचना**

वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती आय वसई अंतर्गत खालील उल्लखित कामांचे कोरे निविदा फॉर्म (https://mahatenders.gov.in) या अधिकृत संकेतस्थळावर दि. ६ /९/२०२४ पासून उपलब्ध होणार आहे. ई टेंडरिंग बाबत अधिक माहितीसाठी ई-निविदा कक्ष, वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती आय वसई येथे संपर्क साधावा.

१ प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०७ मधील वडवली : गरोडीवाडी, मेथील सी. मी. गटाराची दुरुस्ती करणे.
२ प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११३ मधील शिवनगर येथील प्रेमा बाबु पिंपळे ते गफर खान पर्यंत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे.
३ प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११४ मधील पाचुबंदर येथील चंदर बाणकोल ते मुख्य नाल्यापर्यंत सी. सी. गटार बांधणे.
४ प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११४ मधील पाचुबंदर येथील अस्मिता निवास हयांचे घर मुख्य नाल्यापर्यंत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे.
५ प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०९ मधील पापडी बोंडलई तलावा लगतच्या समाजमंदिरात शौचालय बांधणे व इतर आवश्यक कामे करणे.
६ प्रभाग समिती "आय कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११२ मधील दत्तधाम येथे साईबाबा मंदिरासमोर रस्ता कांक्रीटीकरण करणे.
७ प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०७ मधील किरवली बावखळाजवळ आर. सी. सी. पाईप क्रॉसिंग बांधणे व रेलिंग पुरविणे व बसविणे.
८ प्रभाग समिती आय" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११२ मध्ये सिध्दार्थनगर मधील आरोग्य वर्धिनी येथे शौचालय बांधणे.
९ प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०६ मधील उमेळा साकाई नगर नं १ येथील मुख्य रस्त्यावरील उघाडीवर आर.सी.सी. स्लॅब टाकणे.
१० प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११२ मधील राखेआळी येथील दगडी शाळा ते आयेशा मेन्शन येथील रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.
११ प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११२ मधील पांडुरंग अपा. समोरील रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.
१२ प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११२ मधील दर्जाआळी येथे लक्ष्मी नारायण मंदिरासमोरील रस्ता दुरुस्त करणे.

Please visit our official web-site (https://Mahatenders.gov.in)

जा.क्र : व.वि.श.म/मु.व.ज./२३९/२०२४
दिनांक : ०४/०९/२०२४

सही/-
(अर्चना दिवे) उपायुक्त परिमंडळ-५
वसई-विरार शहर महानगरपालिका
प्रभाग समिती आय



## बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम

**(बृहन्मुंबई महानगरपालिका)**
परिवहन अभियांत्रिकी विभाग

श्री. अमोल सतीश वीर, स्वच्छक, परि.क्र.३२७७१५/५५-२५, दिंडोशी आगार यांना या जाहिरातीद्वारे असे सूचित करण्यात येत आहे की, सप्रअ(आ-३) यांनी **दि.२१/६/२४** रोजी पाठविलेल्या अहवालांनुसार ते **दि.१८/०४/२४ ते दि.२०/०५/२४** या कालावधीत परवानगीशिवाय, खाती रजा शिल्लक नसतानादेखील सतत पंधरा दिवसापेक्षा जास्त दिवस, उपक्रमाला कोणत्याही माध्यमातून न कळविता कामावरुन गैरहजर राहिलेले आहेत. त्यांच्या या कृत्याचा समावेश गैरवर्तणूकीत होत असल्याने त्यांच्याविरुद्ध स्थायी आदेशानुसार खालील गैरवर्तणूकींचे आरोप ठेवण्यात आलेले आहेत.

**स्थायी आदेश क्र. २० (एफ) - परवानगीशिवाय सतत पंधरा दिवसापेक्षा जास्त दिवस कामावरुन गैरहजर रहाणे आणि स्थायी आदेश क्र. २० (के)-कोणत्याही विभागाच्या कामासाठी आणि सुव्यवस्थेसाठी केलेले नियम, विनियम (रेग्युलेशन) व आज्ञा यांचा भंग करणे. (परवानगीशिवाय न कळविता कामावरून गैरहजर रहाणे - पुनर्चक्रमुद्रांकित परिपत्रक क्रमांक:- वप्रअपअ/आअप/१९०४८/११९१/९६, दि.१९/१२/९६.)**

सदर गैरवर्तणूकीसाठी त्यांच्याविरोधात दाखल केलेले **आरोपपत्र क्र. सीएच/१३८/१३३१/२०२४, दि.२६/६/२४** रोजी ते काम करीत असलेल्या आगारात दि. ४/७/२४ रोजी दु.१२.०० वा. चौकशीस उपस्थित राहण्याकरीता पाठविले असता ते दि. १९/६/२४ पासून कामावर गैरहजर असल्याचे लेखी कळविण्यात आले. यास्तव त्यांच्या सेवाभिलेखात नोंद असलेल्या स्थानिक पत्त्यावर दि.१०/७/२४ रोजीचे पत्र 'हस्तपोच' केले असता. तसेच २/८/२४ च्या डाकनोंद पत्राद्वारे अनुक्रमे दि. १५/७/२४ व दि.२२/८/२४ रोजी स.११.०० वा. आरोपपत्र सुनावणीकरीता उपस्थित राहण्याबाबत पत्र पाठविण्यात आले होते. परंतू ते उपरोक्त दोन्ही तारखांच्या सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत.

यास्तव या जाहिरातीद्वारे त्यांना शेवटची संधी म्हणून असे कळविण्यात येत आहे की, त्यांच्याविरूध्दच्या सदर आरोपपत्राची खातेनिहाय चौकशी आता **गुरुवार, दि.१२/९/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता** कामगार अधिकारी परिवहन यांचे कार्यालय, दादर कार्यशाळा, टिळक मार्ग, दादर, मुंबई-१४ येथे होणार आहे. सदर चौकशीत तुम्हाला तुमच्याविरूध्द लावलेल्या वरील आरोपाबाबत खुलासा करण्याची संधी देण्यात येईल.

चौकशीचे कामकाज चालू असताना मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम १९४६ च्या कलम ३० अनुसार प्रतिनिधीद्वारे अथवा एम.आर.टी.यु आणि पी.यु.एल.पी. नियम १९७५ च्या नियम क्र.२० सह वाचावयाच्या, एम.आर.टी.यू आणि पी.यु.एल.पी. अधिनियम १९७१ च्या कलम २२ अनुसार ह्या उपक्रमात कार्यशील असलेल्या व श्रमिक संघ अधिनियम १९२६ साली नोंदविण्यात आलेल्या कामगार संघटनेचे तुम्ही सभासद असल्यास अशा कामगार संघटनेच्या अधिकाऱ्याद्वारे अथवा उपक्रमातील कर्मचाऱ्यामधून तुम्ही निवडलेल्या कोणत्याही कर्मचाऱ्याद्वारे स्वत:चा बचाव करण्याची परवानगी मिळेल.

सदर चौकशीस आपण अनुपस्थित राहिल्यास आपणास या चौकशीत स्वारस्य नाही, असे समजून तुमच्या अनुपस्थितीत चौकशीचे कामकाज **'एकतर्फी'** चालविले जाईल व चौकशीत घेतलेला निर्णय आपणांस बंधनकारक राहील, याची नोंद घ्यावी.

**बृ.मुं.वि.पु. आणि प. उपक्रमाक्रिता**
**स्वाक्षरी/-**
**(रामचंद्र ल. ढेबे)**
**कामगार अधिकारी (परि. अभि.)**
**सक्षम अधिकारी**

**ज.सं.अ./का.अ.प./५५/२०२४.**

शिक्षण हा मुक्ती आणि सक्षमीकरणाचा मार्ग आहे.



- सावित्रीबाई फुले

वृत्तमानस

मुंबई, गुरुवार, ५ सप्टेंबर २०२४


# काश्मीरमधील 'मोहब्बत की दुकान' कोणाचं?

काश्मीर प्रश्न भारतासाठी खूप जिव्हाळ्याचा आहे. त्याच पद्धतीने तो काश्मीरचा देखील असेल. या एकाच जिव्हाळ्याच्या समस्येवरील भारत पाकिस्तान हे दोन्ही देश एकमेकांना पाण्यात पाहतात. पाकिस्तान कडून तर सतत काश्मीर मध्ये भारताच्या विरोधात अतिरेकी हल्ले घडवून आणले जातात. काश्मीर मधील बेरोजगार आणि धर्मांध तरुणांना भडकावून त्यांचा त्यांच्याच देशाच्या विरोधात वापर करून घेतला जातो. गेले अनेक वर्षे पाकिस्तानच्या हा कुरापती सुरू आहेत. या पाकिस्तानच्या या कुरपतींना भारत चांगला प्रकारे ओळखून आहे. त्यामुळेच पाकिस्तानचे सगळे मनसुबे भारताने उधळून लावले आहेत. सैनिकी कारवाया करून अनेक अतिरेक्यांचा आत्मा देखील केला आहे. सर्जिकल स्ट्राइक करून पाकिस्तानला अद्दल घडवली आहे. ३७० कलमाचा गैरफायदा उचलून पाकिस्तानने येथील जनतेला भडकावून या राज्याला स्वतंत्र दर्जा मिळावा यासाठी लोकांच्या पाठीमागे राहून विरोध केला आहे. मात्र मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर त्यांनी येथील ३७० कलम रद्द करण्याचा धाडसी निर्णय घेऊन मोठे काम केले आहे. आता भागातील म्हणजेच जम्मू-काश्मीरमध्ये पुढच्या महिन्यात विधानसभेची निवडणूक होत आहे. पुन्हा एकदा हे राज्य राजकारणाकडे परतत आहे ही चांगली गोष्ट. वास्तविक लोकसभा निवडणुकीतही राज्यात चांगला उत्साह दिसून आला होता. मात्र, लोकसभेतील विजयी उमेदवार दिल्लीला जातात. विधानसभेची निवडणूक जिंकणारे आपल्या राज्याचे कारभारी असतात. त्यामुळे बऱ्याच काळानंतर आता विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने जम्मू-काश्मीरमध्ये रंगत निर्माण होणार आहे. तथापि, या निवडणुकांसाठी राजकीय पक्षांकडून कितीही दावे केले जात असले, तरी ते पूर्णतः सज्ज नाहीत हेही स्पष्ट दिसते आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह राज्याचा धावता दौरा केला. निवडणुका जाहीर झाल्यानंतरची त्यांची ही पहिलीच भेट. त्यात त्यांनी अत्यंत मोजका संवाद माध्यमांशी साधला. निवडणुका जाहीर झाल्यावर राजकीय पक्षांच्या नेत्यांकडे बोलण्यासारखे बरेच असते. कोणत्याही मुद्द्यावरून ते अचाट विधाने करू शकतात. तसे काल राहुल अथवा खर्गे यांनी केले नाही. काँग्रेस कार्यकर्त्यांशी राहुल यांनी जो संवाद साधला, त्याला ठळक प्रसिद्धी मिळाली. पक्षाच्या लोकांशी जसे बोलावे लागते तेच राहुल बोलले. कार्यकर्त्यांचा उत्साह कायम ठेवायचा असतो. भारत जोडो यात्रा पार्ट 1 आणि पार्ट 2 च्या वेळी जी लाइन राहुल यांनी पकडली आहे तीच त्यांनी कालही कायम ठेवली. तेव्हा 'मोहब्बत की दुकान' आदी शब्द ते वापरायचे. काल त्यात बदल करत तुम्ही ज्या भीतीत जगत आहात ती मला कायमची संपवायची आहे, असे ते म्हणाले. खर्गे काय बोलले याकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. किंबहुना ते काही लक्षवेधी बोललेच नाही. या दोघांनी नॅशनल कॉन्फरन्सच्या फारुख अब्दुल्ला आणि उमर अब्दुल्ला यांच्याशी चर्चा केली. फारूख अब्दुल्ला यांनी त्यांच्या चिरपरिचित फिल्मी स्टाइलने माध्यमांना खाद्य दिले. जम्मू-काश्मीरमध्ये काँग्रेसशी युती झाल्याची घोषणा त्यांनी करून टाकली सर्व 90 जागा आम्ही लढवणार असल्याचेही ते म्हणाले. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आमच्यासोबत आहेच, मात्र आपल्या पक्षातील सर्व नेतेही आपल्या सोबत असल्याचे त्यांना जाहीर करावे लागले. त्यामागचे कारण अर्थातच हे आहे की काश्मीरच्या संदर्भात आज कोणताही नेता ठामपणे काही बोलू शकत नाही. काश्मीरला पुन्हा राज्याचा दर्जा मिळेल अशी आम्हाला आशा असल्याचे ते स्वतःला सांगत होते की पक्षाच्या नेत्यांना की राज्यातील जनतेला हा प्रश्न खरेतर स्वतः अब्दुल्ला यांनाही पडला असेल. काँग्रेसपासून फारकत घेत आपले वेगळे दुकान थाटून बसलेल्या गुलाम नबी आझाद यांनी लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळीच याबाबत स्पष्ट विधाने केली होती. खोटे बोलू नका अशा आशयाची टिप्पणी त्यांनी काश्मीरच्या नेत्यांना उद्देशून केली होती. त्याच सुमारास अशीही माहिती समोर आली होती की, दिल्लीतील भाजपच्या नेत्यांच्या प्रतिसादाची फारूख अब्दुल्ला वाट पाहात आहेत. त्याकरता त्यांनी दिल्लीत देव पाण्यात सोडले. त्यांनी व त्यांच्या पुत्राने या वावड्या असल्याचे म्हणत त्याचा इन्कार केला, मात्र, ज्या बातम्या आल्या होत्या त्या खोट्या नव्हत्या असे कोणीही सांगू शकेल. विधानसभा निवडणुकीसाठी आता मंच सज्ज झाला आहे. त्याचवेळी हेही स्पष्ट झाले आहे की स्वबळावर सरकार स्थापन करू शकेल अशी ताकद कोणत्याच पक्षाकडे नाही. नॅशनल कॉन्फरन्सकडे ती असती तर त्यांनी इतक्या तातडीने काँग्रेसचा हात हातात घेतला नसता. जम्मू-काश्मीरमधील दसरा कथित प्रबळ पक्ष आहे मेहबुबा मुफ्ती यांचा पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी. मेहबुबा यांच्या पक्षाने बराच जनाधार गमावला आहे. तरीही कलम 370 पुन्हा बहाल करण्याचे आश्वासन हा पक्ष देतो आहे. ते कशाच्या आधारावर असे बोलत आहेत हे तेच जाणो. भारतीय जनता पार्टीच्या गोटातही दोन दिवसांपूर्वी हालचाल झाली आहे. पीडीपी आणि भाजपला एकत्र आणणाऱ्या राम माधव यांची भाजपने पुन्हा जम्मू-काश्मीरच्या राजकारणात वापसी केली आहे. माधव कदाचित तशी वेळ आलीच आणि मदतीची आवश्यकता भासली तर सोयीचे ठरू शकतात हा त्यामागचा विचार असावा. जम्मू भागात भाजपचा वरचष्मा कायम राहिला. तथापि, एकट्या जम्मूत सर्व जागा पक्षाला मिळवता येणार नाही व त्यामुळे बहुमताचा आकडाही गाठता येणार नाही. काँग्रेसचीही स्थिती फारशी वेगळी नाही. आझाद फॅक्टरचा त्यांना तोटा होणारच नाही असे नाही. आझादांसोबत गेलेली काही मंडळी पुन्हा स्वगृही परतली असली, तरी प्रत्येक नेत्याला मानणारा एक सामान्य वर्ग असतो. जम्मू भागानेही काँग्रेसला हात दिला, तर पक्ष उभारी घेऊ शकतो. तशी स्थिती आज दिसत नाही. निवडणुकीनंतर सरकार स्थापनेसाठी जुळवाजुळव करावीच लागणार आहे. आता एकत्र आलेले काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्स एकत्र राहतील याचीही शाश्वती नाही आणि मेहबुबा आणि भाजप एकत्र येणारच नाहीत याचाही दावा केला जाऊ शकत नाही. जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा दिला जाईल हा कळीचा मुद्दा ठरू शकेल याचीही हमी नाही. दरम्यानच्या काळात केंद्र सरकारने अर्थात भाजपच्या सरकारने अगोदरच खेळी केली आहे. त्यांनी नायब राज्यपालांचे अधिकार वाढवणाऱ्या दुरुस्त्या जुलै महिन्यातच करून घेतल्या आहेत. दिल्लीप्रमाणे या राज्यातही नायब राज्यपालांचा शब्द अंतिम असणार आहे. राज्यात सरकार आले तरीही केंद्राचा शब्द अंतिम असेल अशी ही तजवीज आहे. राहुल गांधी आणि खर्गे यांना याची जाणीव झाली आहेच. त्यामुळे अन्य राज्यांतील निवडणूकपूर्व उत्साह येथे त्यांनी दाखवला नाही. सज्जता कोणाची हे म्हणताना खरेच कोणाची, हाही छुपा प्रश्न डोकावल्याशिवाय राहात नाही. भाजपच्या अर्थात केंद्रातील सरकारच्या या भूमिकेमुळे काँग्रेस पक्ष येथे निवडणूक लढण्यासाठी म्हणावा तसा उत्साही नाही. केंद्र सरकार निवडणुकीच्या आड उभे राहून स्वतःचा फायदा बघत आहे. यावरून जम्मू काश्मीर मधील विधानसभेच्या निवडणुका होऊन लोकांनी निवडून दिलेले सरकार स्थापन झाले तरी त्या सरकारला हवे तसे काम करण्याची मोकळीक असणार नाही याची शक्यता आहे. मोदी लाट येथे करिश्मा करू शकली नाही तर येणाऱ्या दुसऱ्या सरकारची पुढील वाट आधीच बिकट ठेवण्याचा हा प्रयत्न आहे. त्यामुळे आगामी काही दिवसातच येथे होणाऱ्या निवडणुका आताच काँग्रेसच्या संशयाच्या जाळयात अडकल्या आहे. त्यामुळेच ज्या प्रमाणे काँग्रेस देशातील इतर राज्यांवर लक्ष देत आहेत, तेथील कार्यक्रम घेता आहे, नेते वेळ देत आहेत तसा वेळ येथील विधानसभेच्या निवडणुकीत देताना दिसत नाही. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या दोन प्रचार सभा येथे होणार आहेत. तेवढीच काय ती प्रचाराची मोठी बाजू म्हणता येईल.

# 'दलित किचन इन मराठवाडा'- एक ऐतिहासिक दस्ताऐवज...

राज कुलकर्णी
धाराशिव

'दलित किचन इन मराठवाडा' हे शाहु पाटोळे यांचे इंग्रजी भाषेतील पुस्तक सध्या खूप गाजत आहे. या पुस्तकाची मुळ मराठी आवृती ' अन्न हे अपुर्ण ब्रह्म' मी वाचलेली आहे अभ्यासलेली आहे. हे पुस्तक म्हणजे फुड अँथ्रापोलॉजी चा ऐतिहासिक दस्ताऐवज आहे. मी या पुस्तकावरील एका परीसंवादात एक वक्ता म्हणून माझे विचार यापुर्वीच मांडले आहेत. पण इंग्रजी आवृतीच्या निमित्ताने बीबीसी या वृत्तवाहीनेने देशातील तामिळ, गुजराती, पंजाबी अशा अनेक भाषात एक रिपोर्ताज प्रसिद्धी केल्यामुळे मराठवाड्यातील दलित लोकांचं वर्षानुवर्षे काय खाद्य होतं, याची माहीती देशभरातील अनेक लोकांना करून दिली आहे.




शाहु पाटोळे हे माझे स्नेही, ज्येष्ठ बंधु समान आहेत, म्हणून मी त्यांना शाहुभाऊ म्हणतो. गेल्या वीस वर्षापासून त्यांचे माझे कौटूंबिक स्नेह सबंध आहेत. त्यामुळे त्यांच्या पुस्तकाची नि त्या पुस्तकाच्या निर्मिती मागची प्रक्रिया मी जाणून आहे.

आहार हा जागतिक मानवाच्या जागतिक इतिहासात खूप महत्वाचा घटक आहे. कारण आहार मुलभूत गरजेपैकी एक असल्यामुळे यांवर नियंत्रण करणे हा मानवी संघर्षातील एक महत्वाचा घटक आहे. मानवात जसा भेदाभेद जगातील सर्व संस्कृतीत दिसतो तसाच भेद आहाराबाबतही केला जातो. कारण आहार त्याची उपलब्धता, पुरवठा, मालकी याबरोबर तो आहार नि त्याचा स्त्रोत यांवर जगातील सर्वच समाजातील वर्चस्ववादी लोकांनी नियंत्रण ठेवल्याचा इतिहास साक्षी आहे.

भारतातील चातुर्वर्ण्य व्यवस्थेने ज्या प्रमाणे जन्मावर आधारीत मानवांत भेदाभेद केला तसा तो मुलभूत गरजांच्या मालकी बाबतही केला. कारण सत्ताधिशांना सर्व प्रकारचे वर्चस्व हवे होते. म्हणून त्यांनी त्यांची सत्ता सर्व समाजातील मानवाच्या मुलभूत गरजांच्या गुलामगिरीतून बळकट केली. हे घोर अमानवी कृत्य होते पण हे वास्तव आहे. मानवाच्या मुलभूत गरजा म्हणजे अन्न ,वस्त्र नि निवारा ! भारतीय समाजातील वर्णवर्चस्ववादाने या तीन्ही गरजांच्या आधारावर गुलमगिरी लादली आणि गुलामांना या गुलामगीरीची जाणीव होऊ नये म्हणून यास प्रारब्ध, संचित अशा गत जन्माच्या काल्पनिक संकल्पनांच्या बेड्या बळकट केल्या.

चातुर्वर्ण्य व्यवस्थेने समाजात जन्मावर आधारीत भेदभाव करताना कोणत्या जातीने कोणते कपडे घालावे याची गुलामगीरी प्रबळ करताना ब्राह्मणांचे, क्षत्रियांचे वस्त्र काय असावे हे सांगीतले तसे शुद्रांची घरे कशी असावीत आणि गावाच्या कोणत्या भागात असावीत हे ही ठरवले. मुलभूत गरजापैकी वस्त्र नि निवारा यांवर नियंत्रण ठेवणारे अधिकारी अन्नावर नियंत्रण ठेवणार यात आश्चर्यकारक कांहीच नाही.

अन्न हे थेटपणे राजकीय, सांस्कृतिक, जातीय, आर्थिक गुलामगीरीचे साधन आहे. ही बाब शाहु पाटोळे यांच्या या पुस्तकाचा आत्मा आहे. या पुस्तकात अनेक रेसीपी आहेत, त्यांची माहीती आहे पण पुस्तकाच्या निर्मितीचा मुळ हेतु शाहु पाटोळे यांनी आहाराच्या माध्यामातून मांडला आहे,ज्यामुळे अन्न हे पुर्ण ब्रह्म नव्हे तर त्याला ब्रह्म तरी म्हणावे काय ? असा प्रश्न उपस्थित करते. पण लेखक अन्नाला तिरस्काराच्या नजरेने पाहत नाहीत. कारण या अन्नाने कसेही का असेना पण अनेक पिढ्यांची भुक भागवली आहे, म्हणून त्यांनी संयतपणे त्यास अपुर्ण ब्रह्म म्हटले आहे.

महाराष्ट्रीय समाज रचनेत ज्या जातींचा दलित म्हणून समावेश होतो. यात महार, मांग, ढोर नि चांभार यांचा समावेश होतो. त्यातही रामोशी, होलार यांचा समावेश गावगाड्यात होत नाही. मात्र महार ,मांग नि ढोर या तीन जातींचा सबंध मृत जनावरांशी आहे. मृत जनावाराचा अन्न म्हणून सबंध केवळ महार नि मांग याच्याशी असून ढोर समाजाचा मृत जनावराशी हा अन्न म्हणून नसून केवळ कातडे कमावणे याच्याशी आहे. समाजात अस्पृश्यतेची वागणूक प्रामुख्याने महार नि मांग याच समुदयाला मिळाली, याचे कारण मृत जनावरांचे मांस भक्षण असावे. हेच कारण असेल तर असे मांस खाण्यास प्रवृत्त करणारी व्यवस्था नि पुन्हा त्यामुळे अस्पृश्यता असा दुहेरी अन्याय या समाजावर झालेला आहे.

अस्पृष्यता सामाजीक गुलामगीरीने मांग नि महार समाजाला स्वतंत्र उत्पन्नाचे साधन दिले नव्हते. त्यामुळे त्यांना मिळेल त्या उत्पादन साधनातून अन्न शोधणे एवढेच शिल्लक ठेवले होते. त्यातून या दलित किचन ची निर्मीती जीवन जगण्याच्या दुर्दम्य ईच्छाशक्तीतून झाली आहे. म्हणून त्या ईच्छाशक्तीला जाणून घेण्यासाठी या पुस्तकाची मोठी भुमिका आहे.

पुर्वी खायलाच मिळत नसे म्हणून मृत जनावरांचे मांस खाऊन जगावे लागे. ताजे मांस खाणारे प्रतिष्ठित नि शिळे वा मृत प्राण्याचे मांस खाणारे तुच्छ! असा नियम होता. शिवाय ते शिळे असल्यामुळे त्या मासांचेही मोजकेच पदार्थ करायला नि खायला मिळत असत. कारण ताज्या मासांच्या तुलनेत लवकर नष्ट होणा-या मासांचे पदार्थ कमीच असणार. त्यावेळी कित्येकांना असेही वाटले असावे की आपल्यालाही ताजे मांस खायला मिळावे. ताज्या मांसाच्या अभिलाषेत कित्येक पिढ्या व्याकूळ होऊन गेल्या असाव्यात. आज परीस्थिती बदलली आहे. आज पैसा आला आहे, आज ताजे मांस मिळवून हवे ते खायला मिळण्याची स्थिती असताना समाजात शाकांहार प्रतिष्ठित ठरवला गेला आहे. एवढेच नव्हेतर मासांहारावर नियंत्रण ठेवण्याचा प्रकार पुन्हा सत्ताधारी शासकीय यंत्रणांच्या नि सांस्कृतिक वर्चस्ववातून करत आहेत.

कोणत्या जातीचं काय अन्न आहे, यावरून ती जात प्रतिष्ठित वा अप्रतिष्ठित ठरवली गेली आहे. मुंबईत अनेक उच्च जाती पोर्क खातात पण मराठवाड्यात पोर्क खाणारी जात समाजव्यवस्थेत खालच्या स्तरावर आहे म्हणून पोर्क निषिद्ध आहे.

आहार हे सांस्कृतिक नि सामाजिक गुलामगिरी लादतं हे वास्तव आहे. कोणी काय खावं, काय खाऊ नये, हा ज्याचा त्याचा अधिकार आहे. निसर्गाने दिलेल्या नि घटनेने सरंक्षित केलेल्या जीवन जगण्याच्या स्वांतंत्र्याधिकारात आहार ही आहे. याचा अर्थ समजून घेण्यासाठी मदत करणारे हे पुस्तक आहे.

अन्नाचं राजकारण हे सातत्याने होत आलेलं आहे. देशातील जनतेला दुष्काळात सरकारने दिलेली सुकडी असो, अमेरिकन गव्हू वा इलूमिलू असो किंवा जीवनावश्यक वस्तु कायदा किंवा फुड सेक्युरीटी बील ही सर्व फुड पॉलिटीक्सची उदाहरणे आहेत. अगदी एक रूपयात झुनका भाकर वा शिवभोजन किंवा अम्मा कँटिन हे आधुनिक शासनही करतं. जुन्या काळात स्थानिक स्तरावर जे कांही शासन चाले ते वर्णव्यवस्थेवर अवलंबून होते. त्यातून दलितांचे अन्न याचे राजकारण आणि त्यावरील अंकुश हा महत्वाचा विषय होता. हाच या पुस्तकाचा आत्मा आहे.

चार्ली चँपलीन च्या मॉडर्न टाईम्स या 1936 च्या चित्रपटात, कामगारांच्या जेवणाचा वेळ कमी होऊन त्यांच्याकडून अधिक काम करता यावे, यासाठी Feeding Machine च्या प्रयोजनाचा एक प्रसंग आहे. त्यातील मानवी भुक नि ती भागविण्याचा हेतू आणि त्यातील तांत्रिकता चपखलपणे दर्शवली आहे.

शाहु पाटोळे यांचे पुस्तक हीच तांत्रिकता सांगते. दलितांना अन्न द्यायची इच्छा नव्हती आणि त्यांच्याकडून सेवा करून घेण्यासाठी त्यांना जीवंतही ठेवायचे होते, म्हणून जे आपल्या उपयोगाचे नाही तेच त्यांचे अन्न असावे ,या राजकारणाचा तो भाग होता. शिवाय ते हे अन्न खातात म्हणून समाजात अप्रतिष्ठित करण्याचेही हे राजकारण होते.

शाहु पाटोळे यांनी जे लिहीलंय ते केवळ माझा मित्र राहुल बनसोडे यानेही मांडले होते. दुर्दैवाने तो आज आपल्यात नाही. फुड पॉलिटीक्स आणि फुड अँथ्रापोलॉजी हा आमचा तिघांचा आवडता विषय होता आणि आता माझा नि शाहु भाऊचा आहे आणि भविष्यात ही असणार.

अन्नाच्या सामाजीक,राजकीय, आर्थिक नि सांस्कृतिक राजकारणाची उकल करणारं आणि एक जाणकारांना नवीन दृष्टी देणारं हे पुस्तक सध्या बेस्ट सेलर होत आहे. आतापर्यंत केवळ त्याचा इंग्रजीत अनुवाद झालाय, आता हे पुस्तक भारतातीलच नव्हेतर जगातील सर्व भाषात यावे ,अशा शुभेच्छा मी शाहु भाऊंना देतो.

# ...गुरु देवो महेश्वरा!

आज ५ सप्टेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा आज जन्मदिवस. त्यांच्याच स्मरणार्थ आजचा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. १९६२ मध्ये राधाकृष्णन यांनी राष्ट्रपती पदाची शपथ घेतली तेव्हा त्यांनी त्यांचा जन्मदिवस हा शिक्षकांचा गौरव दिवस म्हणून साजरा करण्याची इच्छा प्रकट केली होती. देशातील शिक्षकांचा गौरव हाच आपला गौरव असल्याची त्यांनी सांगितले होते. तेव्हापासून सुरू झालेली ही परंपरा अजूनही सुरूच असून भविष्यातही सुरूच राहील.

आपल्या संस्कृतीत शिक्षकाला म्हणजे गुरूला मानाचे स्थान आहे. प्रत्येक व्यक्तीच्या जडणघडणीत गुरूंची म्हणजे शिक्षकांची भूमिका खूप महत्वाची असते. शिक्षक हा केवळ मार्गदर्शक नसतो तर तो जीवनाला दिशा दाखवणारा दिशादर्शक असतो. भारतीय शिक्षण परंपरेत गुरू शिष्यांचा संबंध अत्यंत पवित्र मानला आहे. प्राचीन काळी गुरुकुल पध्दत होती. विद्यार्जन करण्यासाठी विद्यार्थी घरदार सोडून गुरूच्या घरी राहण्यास येत असे. गुरू हा त्या शिष्यांच्या मातापित्यांची जागा घेत असे. शिष्याला केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे तर शिष्याला चारित्र्यसंपन्न करणे हे आपले कर्तव्य आहे या विचारप्रेरणेतून गुरू विद्यादान करत असे. शिष्याच्या जीवनात गुरुला सर्वोच्च स्थान असत आणि गुरूच्या जीवनातही शिष्याला सर्वोच्च प्राधान्य असे. याप्रमाणे त्याकाळी गुरू शिष्य संबंध पवित्र बंधनाने युक्त होते. आज काळ बदलला असला तरी शिक्षकांचे महत्व कमी झाले नाही. आजच्या विज्ञान युगातही पूर्वीप्रमाणेच शिक्षकांची आवश्यकता भासते. मनुष्याच्या जीवनातून शिक्षक वजा होऊच शकत नाही. जर शिक्षकच नसेल तर मनुष्याच्या जीवनाची दिशा भरकटू शकते. मनुष्याचे जीवन भरकटलेल्या नौकेसारखे होईल म्हणूनच शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त केली जाते. केवळ आपल्याच देशात नव्हे तर ऑस्ट्रेलिया, कॅनडा, ब्राझील, जर्मनी, जपान, इंडोनेशिया, मलेशिया, चिली या देशातही शिक्षक दिन साजरा केला जातो मात्र तिथे हा दिवस ५ ऑक्टोबरला साजरा केला जातो. आपल्या देशात हा दिवस ५ सप्टेंबरला साजरा केला जातो. कारण याच दिवशी १८८८ साली भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म तामिळनाडूतील तिरुथानी या गावी एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. अतिशय हुशार व कुशाग्र बुद्धीचे असल्याने त्यांनी शिक्षण क्षेत्रात स्वतःचे वेगळे वलय निर्माण केले. आंध्र विद्यापीठ आणि बनारस विश्व विद्यापीठाचे कुलगुरुपद त्यांनी भूषवले. १९३१ ते १९३९ या काळात ते संयुक्त राष्ट्रसंघात भारताचे प्रतिनिधी होते. १९४९ ते १९५२ पर्यंत ते रशियामधील भारताचे राजदूत होते. १९५२ साली ते भारताचे पहिले उपराष्ट्रपती बनले. या पदावर दहा वर्ष राहिल्यानंतर १९६२ साली ते भारताचे दुसरे राष्ट्रपती बनले. १९५४ साली त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविण्यात आले. शुद्ध चारित्र्य, प्रकांड पांडित्य, अपार सहिष्णुता आणि प्रभावी वक्तृत्व यामुळे डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी जगभर विलक्षण लोकप्रियता मिळवली म्हणूनच नोबेल पुरस्कारासाठी त्यांना तब्बल २७ वेळा नामांकन मिळाले. शिक्षक ते राष्ट्रपती ही त्यांची वाटचाल त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष आहे. त्यांच्या याच कर्तृत्वाचा सन्मान म्हणून सरकारने १९६२ पासून त्यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करायला सुरवात केली. आजच्या या शिक्षक दिनी देशभरातील शिक्षक बंधू भगिनींना शिक्षक दिनाच्या मनापासून शुभेच्छा!

- श्याम ठाणेदार,
पुणे

## पत्र मानस

### विद्यार्थ्यांच्या आत्महत्या .... एक चिंतेची बाब...

नॅशनल क्राईम ब्युरो ने एक डेटा जारी केला आहे. त्या अहवालानुसार मागील वर्षभरात विद्यार्थी आत्महत्यांचे प्रमाण दोन टक्क्यांनी वाढले आहे. मागील दोन दशकामध्ये विद्यार्थी आत्महत्येचे प्रमाण ४ टक्क्यांनी वाढले आहे. हे प्रमाण आत्महत्या संदर्भातील राष्ट्रीय स्तराच्या दुप्पट आहे. लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षाही आत्महत्येचा दर जास्त आहे. विद्यार्थी आत्महत्येच्या बाबतीत महाराष्ट्र तामिळनाडू व मध्य प्रदेश ही राज्ये आघाडीवर आहेत. देशातील एकूण विद्यार्थी आत्महत्येच्या एक तृतीयांश आत्महत्या या तीन राज्यात होतात . राजस्थान मध्ये स्पर्धात्मक परीक्षांची तयारी चालू असते . तेथेही आत्महत्या मोठ्या प्रमाणावर होतात . विद्यार्थी आत्महत्या का करतात ? हल्ली जीवघेणी स्पर्धा निर्माण झालेली आहे . या स्पर्धेत मी मागे पडतो हे एक प्रमुख कारण आहे. याशिवाय जीवनातील वैफल्यता, जीवनात आलेले अपेक्षाभंग, प्रेमप्रकरणे, इत्यादी गोष्टी आहेत. या सर्व बाबतीत समुपदेशन हवे. जेव्हा एखादा विद्यार्थी निराश होतो तेव्हाच त्याचे समुपदेशन करणे जरुरीचे आहे. सरकारने विद्यार्थी आत्महत्या का करतात ? याच्या कारणांचा शोध घेऊन त्या प्रमाणे त्यावर कृती करणे आवश्यक आहे .

**- शांताराम वाघ पुणे**

### 'अपराजिता' कायदा तात्काळ आणावा

मुख्यमंत्री ममता बँनर्जी यांच्या कलकत्ता मधील सरकारी हॉस्पिटलात एका महिला डॉक्टरच्या बलात्कार आणि हत्या प्रकरणातील आरोपीला फाशीची शिक्षा मिळायला हवी म्हणून तेथील सरकारने विशेष अधिवेशन बोलावून 'अपराजिता वुमन अँड चाइल्ड विधेयक' मंजूर करुन घेतले आहे. प.बंगाल राज्य सरकारने दुरूस्ती विधेयक म्हणजेच याआधीचा अस्तित्वात असलेल्या कायद्यातील तपास कालावधी साठ दिवस ऐवजी अवघ्या एकवीस दिवसाचा केला असून आरोपीला दहा दिवसांच्या आत फाशीची शिक्षा देण्याची तरतूद केलेली आहे. देशातील काही राज्यात महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढलेले आहे त्यासाठी महिलावरील अत्याचाराचे कुठलही राजकारण किंवा भांडवल न करता 'अपराजिता' सारखे कठोर कायदे लवकरात लवकर कसे अस्तित्वात येतील हेच राज्याने आणि केंद्र सरकारने पाहिले पाहिजे असे वाटत आहे.

**- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला**

### चाकरमनी गणेशोत्सव टोल फ्री च्या प्रतीक्षेत !

लाडक्या गणरायाच्या आगमनाला अवघे काही दिवस शिल्लक राहिले असताना कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना अद्याप महाराष्ट्र मुख्यमंत्री साहेब यांनी घोषणा करून सुद्धा टोलमाफी मिळालेली आदेश कार्यान्वीत करण्यात आलेला नाही. त्यामुळे ही टोलमाफी कधी मिळणार ? याकडे गणेशभक्तांचे लक्ष लागले आहे. त्यात नव्याने सुरु असलेला अटल सेतू मार्ग सुद्धा समाविष्ट करण्यात येणार की नाही या बाबत सुद्धा शासना कडून स्पष्टओक्ती करण्यात आलेली नाही. टोल फ्री करता स्वतंत्र मार्गीका ठेऊन तिकडचे फास्ट स्टॅग स्कॅनर सुद्धा पूर्णतः बंद ठेवणे गरजेचे आहे कारण गाडी क्र. हा आधार बँक लिंक असल्यामुळे स्कॅन झाल्या वर टोल रक्कम संबंधित वाहन मालक यांच्या खात्यातून संगणक प्रणाली द्वारे वजा केली जाणार , आणि गणेशोत्सव टोल माफी एक औपचारिकता ठरणार. दरवर्षी गणेशोत्सवासाठी असतो आणि मुंबईतील नोकरदार चाकरमनी लाखों च्या संख्येने कोकणात गावी जात असतात. त्यांना त्यांच्या वाहनांसाठी हजारो रुपयांचा टोल द्यावा लागतो. कोकणात गणेशोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा होत असल्याने गावी जाणाऱ्या नोकरदार चाकर मनी यांची संख्याही मोठी असते. खासगी ट्रॅव्हल कंपन्याही टोल अधिक असल्याचे सांगत भरमसाट भाडे आकारुन प्रवाश्यांची लूटमार करतात. गणेशोत्सवासाठी संपूर्ण कुटुंबच गावी जात असल्याने हे भरमसाट भाडे किंवा प्रचंड टोल भरणे अनेकदा प्रवाशांच्या आवाक्याबाहेर असते. कोकण रेल्वेने गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गाड्यांची संख्या वाढवूनही तिकीट मिळत नसल्याने मुंबईकरांना खासगी किंवा भाड्याचे वाहन घेऊन गावी गणेशोत्सवासाठी जाण्याशिवाय पर्याय नसतो.वाढत्या महागाईत वाहनांना लागणाऱ्या टोलची रक्कमही काही हजारांत जाते.

मुख्यमंत्र्यांनी घोषणा करून सुमारे १५ दिवस झाले तरी त्यासंदर्भातील आदेश स्थानिक वाहतूक पोलिसांना किंवा संबंधित टोल कंपन्या यांना मिळालेले नाहीत. त्यामुळे स्थानिक वाहतूक / स्थानिक पोलिसांकडे टोलमाफीचे पास घेण्यासाठी जाणाऱ्या गणेशभक्तांना टोलमाफी संदर्भातील आदेश वाहतूक विभागाला प्राप्त झाले नसल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे गणेशभक्तांचा मोठया प्रमाणात हिरमोड होत आहे. माननीय मुख्यमंत्री यांच्या आदेशाची अंबलबजावणी तात्काळ करावी , ही समस्त चाकर मन्यांच्या वतीने राज्य शासनाला नम्र विनंती .

**- नितीन कदम दादर मुंबई**

## शेकापतर्फे पदाधिकारी मेळाव्यात पद नियुक्ती सोहळा

**पनवेल :** राज्यातील सामजिक स्वास्थ बिघडले असून ही परिस्थिती बदलण्यासाठी समाजाला चळवळीची गरज आहे. शेकापने सदैव अन्याय आणि अत्याचारा विरोधात संघर्ष करून जनतेला न्याय दिला असल्याचे प्रतिपादन माजी आमदार बाळाराम पाटील यांनी केले. शेकापतर्फे पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात 3 सप्टेंबर रोजी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्याचे आयोजन केले होते. यावेळी ज्येष्ठ नेते, माजी नगराध्यक्ष जे एम म्हात्रे. पनवेल कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती नारायण घरत, पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती काशिनाथ पाटील, पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, तालुका चिटणीस राजेश केणी, पनवेल महानगरपालिका जिल्हा चिटणीस गणेश कडू, माजी जिप सदस्य विलास फडके, महिला आघाडीच्या अनुराधा ठोकळ, प्रीती जॉर्ज-म्हात्रे, सुरेखा मोहोकर, सारिका भगत यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते या मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# आता तुमच्यातील मुसलमान जागा झाला का?

## आव्हाड यांचा मुश्रीफ यांना टोला

प्रतिनिधी
■ ठाणे

कोल्हापूरातील कागल मतदार संघातून समरजीत घाडगे यांना तिकीट देण्याचा निर्णय शरद पवार यांनी घेतला आहे. यामुळे अजितदादांच्या राष्ट्रवादीत गेलेले हसन मुश्रीफ नाराज झाले आहेत. आपण मुस्लीम असल्याने आपल्या विरोधात शरद पवारांना राजकारण केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. यास जितेंद्र आव्हाड यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.



महाराष्ट्राला मला सांगावसं वाटतं की कागल मतदार संघात एकेकाळी शरद पवार यांच्या अत्यंत निकटवर्तीय सदाशिव मंडलिक हे निवडून येत होते. त्यानंतर विरोध असताना 98% समाज मराठा,धनगर,माळी आणि इतर समाज असताना मुस्लिम समाजाचा उमेदवार हसन मुश्रीफ यांच्या नावाने दिला आणि शरद पवार यांनी त्यांना चार-पाच वेळा निवडून आणलं, तेव्हा हे कधी बोलले नाहीत की मी शरद पवारांच्या पुण्याईने निवडून आलो म्हणून असे जितेंद्र आव्हाड यांनी यावेळी सांगितले. ते पुढे म्हणाले की तुम्ही आता शरद पवारांची साथ सोडली त्यामुळे शरद पवार आता तिथे उमेदवार देणारच ना ?

ज्या माणसाने तुम्हाला एका बहुसंख्यांक मतदार संघातून तुम्हाला निवडून आणलं, तेव्हा तुम्हाला काही वाटलं नाही?, शरद पवारांचा त्यात मोठेपणा नव्हता? ज्या पद्धतीने शरद पवारांवरती टीकाटिप्पणी होत होती, तेव्हा तुमचं बोलण्याचं धाडस झालं नाही. त्यावेळी जर तुम्ही शरद पवारांच्या बाजूने बोलला असतात तर एक वेळ तुमच्याबद्दल त्यांच्या हृदयातलं प्रेम वाढलं असतं, हे सगळं घडत असताना तुम्ही मात्र शरद पवार साहेबांना एकटं सोडून गेलात. तुम्ही विचार करा आणि महाराष्ट्र देखील विचार करेल की बहुसंख्यांक समाज तिथे असताना तुमच्यासारख्या एका मुस्लिम उमेदवाराला पवार साहेब तिकडून निवडून आणायचे तेही मोठ्या फरकाने हे तुम्ही कसं काय विसरलात ? असाही सवालही आव्हाड यांनी यावेळी केला आहे.

तुम्ही जर पवार साहेबांचा घातच केला आहे तर, ते तरी तुमचा विचार कशाला करतील ते त्यांची राजकीय खेळी खेळणारच ना ? तुम्ही अल्पसंख्यांक आहात म्हणून तुमच्या मागे लागणं.. यात काहीच अर्थ नाही. तो मतदार संघ अल्पसंख्यांक आणि बहुसंख्यांकवर नाही तो मतदारसंघ शरद पवारांना मानणारा आहे आणि शरद पवार सांगतील तो उमेदवार निवडून आणणारा आहे. तुम्हाला एवढंच जर प्रेम होतं तर परवा ट्रेनमध्ये एका म्हाताऱ्या मुसलमानाला मारण्यात आलं तेव्हा तुम्ही का नाही बोललात ? असेही जितेंद्र आव्हाड यावेळी म्हणाले.

देशभरात मुसलमानांना मारत आहेत, गोळ्या घालत आहेत त्यावर तुम्ही का बरं बोलत नाहीत ? तुमच्याच युतीतले आमदार मुसलमानांना मशिदीत घुसून गोळ्या घालेन, असं म्हणतात तेव्हा तुम्ही साधा निषेधाचा शब्द सुद्धा काढलेला नाही, ना तुमच्या नेतृत्वाने काढला आहे. आता अचानक तुम्हाला आठवण झाली की तुम्ही मुसलमान आहे आणि म्हणून तुम्हाला विरोध होतोय, म्हणून शरद पवार तुमच्या मागे लागलेत. शरद पवार जात-पात ,प्रांत यापुढे जाऊन राजकारण करतात.

## मीरा-भाईंदरमध्ये महावीर भवनाचे वास्तूपूजन मात्र पालिका महावीर भवन बांधणार नाही



प्रतिनिधी
■ भाईंदर

मिरा भाईंदर शहरात महावीर भवन हा मुद्दा चांगलाच चर्चेत आला आहे. पालिका प्रशासनाकडून महावीर भवन उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र अचानक पालिका प्रशासनाने महावीर भवन उभारण्याचा निर्णय रद्द केला आहे. परंतु बुधवारी या वास्तूची जैन आचार्यांच्या उपस्थितीत पूजा करून कामास सुरुवात झाली. त्यामुळे जैन समाजामध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

मिरारोडमधील सर्वे क्रमांक २४५ आणि ५८० या जागेवरील नागरी सुविधा भूखंडावरील जागेवर 'महावीर भवन' उभारण्याचा निर्णय महापालिकेने घेतला होता. २२ एप्रिल २०२३ रोजी या भवनाचे भूमीपूजन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडले. सुरुवातीला नगररचना विभागाने नकाशे मंजूर करून १८६८.०३ चौ. मी (तळ अधिक ३ मजले) इतक्या बांधकामास मंजूरी देखील दिली आहे. परंतु १ ऑगस्ट २०२४ रोजी शासन निर्णयानुसार हे काम रद्द करून हा निधी अन्य ठिकाणी वळवण्यात आला. तसंच सदर ठिकाणी विकास हक्क प्रमाणपत्र मोबदल्यात उभी राहणारी इमारत ही सर्व धर्मीयांसाठी खुली राहणार असल्याचं पालिकेनं स्पष्ट केलं होतं. त्यामुळे नेमके महावीर भवन उभे राहणार की नाही? असा प्रश्न जैन समाजातील नागरिकांमध्ये निर्माण झाला होता. तर काहींनी याविरोधात संताप देखील व्यक्त केला होता.

दुसरीकडे बुधवारी मिरा भाईंदरच्या आमदार गीता जैन यांच्यासह आचार्य भगवंत महाराजसाहेब तसंच इतर जैन नागरिकांच्या उपस्थितीत पूजाविधी करत पार पडले. पालिका प्रशासनाने महावीर भवन रद्द केल्याचा निर्णय घेतल्यानंतर आमदारांनी हा कार्यक्रम घेतला. त्यामुळे सर्वत्र संभ्रम पसरला आहे. पालिकेच्या अधिकाऱ्यांना यासंदर्भात विचारलं असता त्यांनी महावीर भवन बांधण्यात येणार नसल्यावर शिक्का मोर्तब केलं. या ठिकाणीबहुउद्देशीय इमारत उभारली जाणार असल्याचं प्रशासनानं स्पष्ट केलं. सदर ठिकाणी १० मजली बहुउद्देशीय इमारत बांधली जाणार असून, सर्व धर्मीय व समाजासाठी खुली असणार आहे. या इमारतीला कोणत्याही प्रकारे महावीर भवन असे नाव देण्याचा प्रशासकीय स्तरावर निर्णय झालेला नाही. - दीपक खांबित, शहर अभियंता,मिरा भाईंदर महानगरपालिका

अचानक आमदार गीता जैन यांनी महावीर भवनाचा कार्यक्रम केल्यानंतर माजी आमदार मेहता यांनी या प्रकरणात उडी घेतली आहे. जर महावीर भवन उभे राहात असल्यास ती जागा विकासकाकडून नव्हे तर जैन समाजातील नागरिकांच्या आर्थिक सहकार्यातून उभारावी, अशी मागणी मेहता यांनी केली आहे.

## म ह त्वा चे

### 7 ऑक्टोबरला नवी मुंबई पालिका लोकशाही दिन

**नवी मुंबई :** महाराष्ट्र शासन निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार माहे ऑक्टोबर 2024 महिन्याचा लोकशाही दिन 7 ऑक्टोबर 2024 रोजी होणार असून अर्जदारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज दोन प्रतींमध्ये दि. 23 सप्टेंबर 2024 पर्यंत मा. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे नावे 'लोकशाही दिनाकरीता अर्ज' असे दर्शनी भागी ठळकपणे नमूद करुन पूरक कागदपत्रांसह सादर करावयाचा आहे. सदर अर्जात नमूद तक्रार / निवेदन हे वैयक्तिक स्वरुपाचे असावे. अर्ज एकाच विभागाशी संबंधित एकाच विषयाबाबत असावा. अर्जदाराने संबंधित विषयाबाबत या आधी विभाग कार्यालय, विभागप्रमुख स्तरावर निवेदन सादर केलेले असावे.

### आमदार नितेश राणे यांच्याविरोधात गुन्हा दाखल

**ठाणे :** मुस्लिम धर्मियांबाबत आक्षेपार्ह विधान केल्याप्रकरणी माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचे पुत्र आमदार नितेश राणे यांच्याविरोधात भोईवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भिवंडी येथील एका २० वर्षीय मुलाने दिलेल्या तक्रारीच्या आधारे हा गुन्हा दाखल झाला आहे. हा गुन्हा अहमदनगर येथील तोफखाना पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वीच आमदार नितेश राणे यांनी मुस्लिम धर्मियांबाबत वादग्रस्त विधान केले होते. या विधानावरून नितेश राणे यांच्याविरोधात आता गुन्हे दाखल होण्यास सुरूवात झाली आहे. भिवंडी येथील एका तरुणाने नितेश राणे यांच्याविरोधात भोईवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. मुस्लिम धर्मियांबाबतीत बदनामीकारक घोषणा देऊन राणे यांनी धार्मिक भावना दुखावल्याचे तक्रारीत म्हटले आहे. नितेश राणे यांनी हे वक्तव्य अहमदनगर येथे केल्याने तेथील तोफखाना पोलीस ठाण्यात हा गुन्हा वर्ग करण्यात आला आहे.

## केश कर्तनालयाचा नियमबाह्य ताबा घेणाऱ्या गाळे मालकाविरुध्द गुन्हा

प्रतिनिधी
■ डोंबिवली

डोंबिवलीतील घरडा सर्कल येथील सोनल बिझनेस पार्कमधील एका महिलेकडून चालविल्या जात असलेल्या केश कर्तनालयाचा नियमबाह्य ताबा घेणाऱ्या, या केश कर्तनालयाच्या गाळ्याची बनावट कागदपत्रे तयार करून महिलेची फसवणूक करून तिला गाळा रिकामा करण्यासाठी धमकावणाऱ्या गाळे मालका विरुध्द केश कर्तनालय चालक महिलेच्या तक्रारीवरून रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुनिता नरेश चिरंनगट्टील (४५, रा. रिजन्सी इस्टेट, दावडी, डोंबिवली, मूळ रा. मनीसिटी, जि. त्रिचूर, केरळ) असे तक्रारदार महिलेचे नाव आहे. वर्गिस डॅनिअल, थंगच्ची डॅनिअल, शालू डॅनिअल अशी गुन्हा दाखल गाळे मालकांची नावे आहेत.

पोलिसांनी सांगितले, तक्रारदार सुनिता चिरंनगट्टील या डोंबिवलीत राहण्यास होत्या. त्या घरडा सर्कल येथील सोनल बिझनेस पार्कमध्ये वर्गिस डॅनिअल आणि कुटुंबीयांच्या नावे असलेल्या दोन व्यापारी गाळ्यांमध्ये केशकर्तनालय, चेहरा सौंदर्यीकरण सजावट केंद्र चालवित होत्या. सात वर्षाच्या भाड्याने नोंदणीकृत करार करून ५ लाख ४० हजार मालकाकडे ठेव रक्कम आणि दहमहा ९० हजार भाड्याने हे गाळे सुनिता यांनी वापरास घेतले होते. सात वर्षाचा हा भाडेपट्टा होता. या गाळ्याचे सुनिता गाळे मालक वर्गिस यांना नियमित भाडे देत होत्या.

## पेणमधील 70 बचतगटांकडून गणेशमूर्तींची 2 कोटी 89 लाखांची उलाढाल

प्रतिनिधी
■ पेण

यंदाचा गणेशोत्सव पेण तालुक्यातील महिला बचतगटांसाठी आर्थिक प्राप्तीचा ठरला आहे. कारण पेण तालुक्यातील 70 बचतगटांतील महिलांनी तब्बल 35 हजार गणेशमूर्ती बनवण्याचे शिवधनुष्य पेलले आहे. यातून थोडथोडकी नव्हे तर 2 कोटी 89 लाख 50 हजार रुपयांची उलाढाल झाली आहे. यामुळे महिला बचतगट भविष्यात गणेशमूर्ती व्यवसायाला पुरेपूर गवसणी घालण्यासाठी सज्ज झाले आहेत.

पेण तालुक्यातील 70 महिला बचतगटातील महिलांनी 'उमेद अभियान' अंतर्गत गणपतीमूर्ती व्यवसायात पाऊल ठेवले आहे. पहिल्याच पावलात कोट्यवधींची उलाढाल करून 'हम किसी से कम नही' हे या महिलांनी दाखवून दिले आहे. रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भारत बास्टेवाड तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक



प्रियदर्शिनी मोरे यांनी बचतगटातील महिलांना व्यवसायाच्या दृष्टीने मार्गदर्शन केल्याने गणपतीमूर्ती व्यवसायात नाराशक्तीच्या सामर्थ्यांची झलक सर्वांनी दिसली.

ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत पेण तालुक्यात जिल्हा परिषद दादर गटामध्ये प्रहार महिला प्रभाग संघाची स्थापना करण्यात आली. त्यात 17 ग्राम संघांचा समावेश आहे. या ग्रामसंघात 441 महिला बचतगट जोडलेले असून, त्यापैकी 70 बचतगटातील महिला गणपती व्यवसायात सहभागी झाल्या आहेत. त्यांनी बनवलेल्या 35 हजार गणेशमूर्तींपैकी दीड हजार मूर्तींना परदेशी भाविकांनी पसंती दिली आहे. महिलांना आर्थिक शक्ती देण्यासाठी उमेद अभियानामार्फत महिला बचतगटांना फिरता निधी तसेच ग्राम संघांना समुदाय गुंतवणूक निधी आणि बँकांमार्फत आर्थिक मदत करण्यात आली. एकूणच महिला बचतगटांची उमेद वाढवल्याने महिला आर्थिक सक्षम व्हायला मदत झाली आहे.

छत्रपती संभाजीनगरमधील बचतगटांमधील महिलांनी काही दिवसांपूर्वी दौरा करून पेणमधील महिला बचतगटांचा गणेशमूर्ती व्यवसायाचा अभ्यास केला.

## गोवा महामार्गावर चार्जिंग स्टेशन सुरु

प्रतिनिधी
■ पेण

रायगड जिल्ह्यातील सर्वात मोठे २.२५ एमव्हीए क्षमतेचे इलेक्ट्रीक व्हेईकल चार्जिंग स्टेशन नुकतेच कार्यान्वित करण्यात आले. पेण येथील मुंबई ते गोवा महामार्गावर जेएसडब्ल्यू कंपनीच्या गेटजवळ या चार्जिंग स्टेशनची उभारणी अल्पावधीत करण्यात आली. एकावेळी १० बसेसच्या चार्जिंगची सुविधा याठिकाणी उपलब्ध आहे.

जेएसडब्ल्यु कंपनीने मुंबई-गोवा महामार्गावर कंपनीच्या गेटजवळ २.२५ एमव्हीए क्षमतेचे चार्जींग सेंटर उभारणी करण्याचा प्रस्ताव महावितरणच्या पेण मंडळ कार्यालयाकडे सादर केला



होता. वायु प्रदुषणात होणारी घट लक्षात घेऊन भांडुप परिमंडळाचे मुख्य अभियंता सुनिल काकडे, पेण मंडळाचे अधीक्षक अभियंता राजाराम माने यांच्या मार्गदर्शनात अल्प कालावधीत सदर प्रकल्पाला वीजजोडणी देण्याचे काम महावितरणकडून करण्यात आले. या चार्जींग स्टेशनमध्ये एकाच वेळी दहा इलेक्ट्रिक बसेसना चार्जींग करण्याची क्षमता आहे. तर दिवसभरात एकूण ६१ इलेक्ट्रिक बसेसच्या चार्जिंग याठिकाणी होणार आहे.

पेण मंडळाचे प्रभारी कार्यकारी अभियंता (प्रशासन) रवीकिरण पाटील, पेण चाचणी विभागाचे अतिरीक्त कार्यकारी अभियंता निलम गांगोडे, पेण उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता सिध्दार्थ खोब्रागडे तसेच महावितरणच्या इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अविरत कामातून अल्पावधीत या चार्जिंग स्टेशनला वीजजोडणी दिली. जेएसडब्ल्यु कंपनी प्रशासनाने महावितरणच्या या कामाचे कौतूक करून आभार व्यक्त केले आहेत.

## पालिकेत मालमत्ता करधारकांकरता अभय योजना लागू

### मालमत्तांवरील कर भरण्याचे पालिका आयुक्त अजय वैद्य यांचे आवाहन

प्रतिनिधी
■ भिवंडी

भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील अस्तित्वात असलेल्या मिळकतीवरील मालमत्ता कराची वसुली करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या तरतुदीनुसार अनुसूचित ड चे प्रकरण नियम मधील 51 नुसार मालमत्ताधारकांना शास्तीमध्ये सूट म्हणजेच व्याजात सूट देण्याकरता अभय योजना 2024-2025 टप्पा क्रमांक एक लागू करण्यात येत आहे.




योजनेचा कालावधी 5 सप्टेंबर 2024 ते 20 सप्टेंबर 2024 पर्यंत कर भरणाऱ्या करदात्या शास्तीमध्ये म्हणजे व्याजामध्ये 100% माफी देण्यात येईल. तरी महापालिका हद्दीतील सर्व करदाते नागरिकांना सुचित करण्यात येते की, अभय योजना 2024 -25 टप्पा क्रमांक एक या सवलतीच्या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा व आपल्या मालमत्तेवरील कर तात्काळ भरून पुढील होणारे कायदेशीर कारवाई टाळून महापालिकेस सहकार्य करावे, सदर कर भरणा हा महानगरपालिकेच्या https://propertytax.bhiwandicorportation.in या वेबसाईटवर देखील आपण भरू शकता, अधिक माहितीकरता स्थानिक प्रभाग समिती कार्यालयात संपर्क साधावा, जे करदाते विहित विहित मुदतीत कराची रक्कम भरणार नाहीत त्यांच्यावर नियमानुसार पुढील कारवाई करण्यात येईल. आपल्या मालमत्ताचा कर भरा व पालिकेस सहकार्य करा असे आवाहन पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी केले आहे

## गणेशोत्सवासाठी रायगडमध्ये 10 सुविधा केंद्र

प्रतिनिधी
■ अलिबाग

कोकणात जाणाऱ्या गणेश भाविकांच्या सुविधेसाठी रायगड जिल्ह्यात 10 सुविधा केंद्र बुधवारपासून (4 सप्टेंबर) सुरू करण्यात आली आहेत. कोकणवासीसांचा गणपती उत्सवासाठी प्रवास सोपा आणि सुखकर व्हावा यासाठी सुविधा केंद्र उभारण्यात आले आहेत. यांची जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी मंगळवारी (3 सप्टेंबर) रोजी पाहणी करून सुविधांचा आढावा घेतला. शनिवारपासून (7 सप्टेंबर) गणेशोत्सवाला सुरुवात होत असून त्यासाठी गावी जाण्यासाठी



महामुंबईतील कोकणवासीयांचा कोकणाकडे प्रवास सुरू झाला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई-गोवा महामार्गाची 26 ऑगस्ट रोजी पाहणी केली होती. त्यावेळी भाविकांसाठी सुविधा उपलब्ध करण्याच्या सूचना सार्वजनिक बांधकाम खात्याला केल्या होत्या. त्याप्रमाणे खारपाडा, खारपाले, वाकण, कोलाड, इंदापूर, माणगाव, लोणारे, महाड शहर, महाड टोलफाटा आणि पोलादपूर महामार्गावर सुविधा केंद्र उपलब्ध करण्यात आले आहे. सुविधा केंद्रात पोलीस मदत केंद्र, टोईंग व्हॅन, क्रेन, वाहन दुरुस्ती कक्ष, आपत्कालीन वाहन दुरुस्ती तसेच टायरमध्ये हवा भरण्याची सुविधा उपलब्ध केली आहे.



*भाईंदर : सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या, सहकार भारती संस्थे मार्फत मिरा भाईंदर मध्ये गृह निर्माण व सहकारी संस्थांसाठी "* मोफत मार्गदर्शन केंद्राचे* " उद्घाटन १ सप्टेंबर २०२४ ला समाजसेवी श्री दीनदयाल पांड्ये यांच्या हस्ते झाले. जिल्ह्याचे अध्यक्ष , निलेश गोसावी यांनी या बाबत माहिती दिली. या केंद्रासाठी मंगेश पवार, भूषण पैठणकर, किशोर थिटे, जयदेव वाडकर, दिपक जोशी यांनी प्रमुख भूमिका बजावली .*

## 'सुखोई'च्या नव्या धावपट्टीवर चाचण्या

### डिसेंबरमध्ये नवी मुंबई विमानतळावरून पहिले उड्डाण

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील धावपट्टीच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले असून धावपट्टीबरोबरच विमानतळाची रडार यंत्रणा आणि इतर सुरक्षेच्या यंत्रणांच्या तपासणीचे काम अंतिम टप्प्यात असून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून डिसेंबर महिन्यात हवाई दलाच्या सुखोई विमानाचे पहिल्यांदा उड्डाण होणार असल्याची आनंदवार्ता सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी सिडकोच्या कर्मचाऱ्यांना दिली. सिडको कर्मचारी व अधिकाऱ्यांचा



वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम वाशी येथील सिडको एक्झिबिशन सेंटरमध्ये झाला, त्यावेळी सिंघल बोलत होते. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ ११६० हेक्टर जमिनीवर उभारले जात आहे. भूसंपादन व इतर तांत्रिक कारणांमुळे नवी मुंबईच्या विमानतळावरून प्रत्यक्ष उड्डाण होणार की नाही याबाबत साशंकता होती.

## प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

अवजारे व साधने यांचा वापर करुन तसेच हातांनी काम करणाऱ्या पारंपारिक कारागीर आणि हस्तकलेतील लोकांना ओळख प्राप्त करुन देण्यासाठी आणि त्यांना सर्वांगीण आधार देऊन त्यांचा विकास करण्यासाठी भारत सरकारने 'प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान' योजना सुरु केली आहे. हस्तकलेतील उत्पादनांची गुणवत्ता, व्याप्ती आणि पोहोच सुधारणे आणि त्यांच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना बाजारपेठ मिळवून देऊन त्यांचे मूल्य साखळीसोबत एकत्रीकरण करणे हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

यामध्ये लाभार्थ्यांना प्रधानमंत्री विश्वकर्मा प्रमाणपत्र आणि ओळखपत्र दिले जाणार आहे तसेच टूलकिट प्रोत्साहन, कौशल्य विकास प्रशिक्षण भत्ता, सवलतीचे आणि तारण-मुक्त कर्ज, डिजिटल व्यवहारांसाठी प्रोत्साहन, विपणन सहाय्य आदी लाभ मिळणार आहे.

या योजनेमध्ये सुतार, सोनार, चांभार, लोहार, गवंडी, मुर्तीकार, धोबी, शिंपी, कुंभार, हार-तुरे तयार करणारे कारागीर, नाभीक, विणकर, चटई-झाडू बनविणारे कारागीर, दोऱ्या वळणारे कारागीर, होडया बांधणारे कारागीर, मासेमारीचे जाळे बनविणारे कारागीर, कुलुप तयार करणारे कारागीर, पारंपारिक खेळणी बनविणारे कारागीर आदी कारागीरांना या योजनेचा लाभ मिळवता येणार आहे. लाभार्थी नोंदणी करिता बायोमेट्रिक प्रमाणीकृत आधार कार्ड आधारित प्रधानमंत्री विश्वकर्मा पोर्टलद्वारे https://pmvishwakarma.gov.in नोंदणी करावयाचे आहे तसेच सामान्य सेवा केंद्रांद्वारेही (CSCs) नोंदणी करता येईल. नोंदणीसाठी कारागीराचा मोबाईल क्रमांक हा आधारकार्डशी लिंक असावा तसेच कुटुंबातील सदस्यांचे आधारकार्ड असावे व बँक पासबुक आणि रेशनकार्ड आदी कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे कर्ज घेतले असल्यास त्याची माहितीही सादर करणे गरजेचे आहे.

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**वृक्ष प्राधिकरण**

**-जाहिर सूचना-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (२४ जून २०२१ पर्यंत सुधारीत) कलम ८(३) (क) मधील तरतुदीनुसार परिमंडळ-४ मधील के / पश्चिम विभागातील 05 प्रस्ताव, प्रस्ताव व पी पी / दक्षिण विभागातील ०६/ उत्तर विभागातील ०१ प्रस्ताव असे एकूण १२ प्रस्ताव मा. म. न. पा. आयुक्त, अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण / बी एम सी वृक्ष प्राधिकरण समिती यांच्या मंजूरीकरीता प्राप्त झाले आहेत.

उपरोक्त प्रस्तावांमधील झाडे कापणे / पुनर्रोपित करणेबाबतचा तपशील हा म.न.पा.च्या www.mcgm.gov.in या संकेतस्थळावर बृहन्मुंबई महानगरपालिकेविषयी > विभाग आणि खाते > खातेनिहाय माहिती पुस्तिका > उद्याने व वृक्ष प्राधिकरण > कागदपत्रे > Notice 7 days- TA-WS -ZIV- 71 या लिंकवर उपलब्ध आहे.

उपरोक्त प्रस्तावांविषयी आक्षेप वा सूचना असल्यास सदर जाहीरात प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात विहीत नमून्यात (Prescribed Format) उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी यांच्या कार्यालयात त्या सादर कराव्यात. आपण आपल्या आक्षेप / सुचना विहीत नमुन्यात (Prescribed Format) dysg.ta@mcgm.gov.in ह्या ई- मेलवरही नोंदवू शकता.

तसेच विहीत मुदतीत सादर न झालेल्या आक्षेपांचा / सुचनांचा विचार करता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. लेखी / ई-मेलद्वारे सुचना / आक्षेप पाठवूनही आपणास आवश्यक असल्यास सदर सुचना / आक्षेपांच्या लेखी / ईमेलच्या प्रतीसह आपण व्यक्तीशः सुनावणीकरीता उपस्थित राहू शकता. सदर सुचना / आक्षेपाबाबतची सुनावणी दि. १२/०९/२०२४ रोजी उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी यांच्या कार्यालयात दु. ४.३० ते ५.०० वाजेदरम्यान ठेवण्यात आली आहे.

**उद्यान अधिक्षक यांचे कार्यालय,**
पेंग्विन ईमारत, 2 रा माळा
वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग,
भायखळा (पूर्व), मुंबई - ४०००२७
दुरध्वनी क्र. 022-23742162
E.mail dysg.ta@mcgm.gov.in

पीआरओ/११५९/जाही/२०२४-२५

**गप्पी मासे पाळा, मलेरिया टाळा.**

**सही/-
उद्यान अधीक्षक
व वृक्ष अधिकारी**

# गणेशोत्सव मंडळांना महावितरणकडून घरगुती दराने वीज

**नागपूर :** गणेशोत्सव मंडळांना महावितरणकडून जोडणीसाठी घरगुती वीजदर आकारण्यात येणार आहे. सार्वजनिक गणेश मंडळांना तात्पुरत्या स्वरूपातील वीज जोडणीसाठी नोंदणी प्रमाणपत्र, स्थानिक स्वराज्य संस्थेची मंडप परवानगी, पोलिस स्थानक परवाना, विद्युत निरीक्षक यांचे वीजसंच सुरक्षित असल्याचे प्रमाणपत्र, वीज मागणी अर्ज, वीजसंच मांडणी चाचणी अहवाल आणि राष्ट्रीयकृत बँक खाते पासबुक छायांकित प्रत इ. कागदपत्रे आवश्यक असल्याचे महावितरणने कळवले आहे. गणेशोत्सव काळात कोणत्याही प्रकारचा वीज अपघात होऊ नये यासाठी मंडप, रोषणाई आणि देखाव्यांची उभारणी करताना लघुदाब - उच्चदाब विद्युत वाहिन्या, वितरण रोहित्रे इ. यंत्रणेपासून सुरक्षित अंतर राखावे, मंडपातील वीजसंच मांडणी करताना विद्युत सुरक्षा नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, मंडपातील वीजसंच मांडणी मान्यताप्राप्त विद्युत ठेकेदारांकडून घ्यावी, गणेश मंडळांनी विद्युत सुरक्षा उपाययोजनांमध्ये तडजोड करू नये, आपत्कालीन स्थिती करिता कार्यक्षेत्रातील महावितरणच्या शाखा अभियंत्यांचे मोबाईल क्रमांक नोंदवून ठेवावेत असे महावितरणने कळवले आहे.



## म ह त्त्वा चे

### स्टंटबाजी करताना तरुण गेला वाहून

**वाशीम :** सर्वत्र पाऊस पडल्याने नदी नाल्यांना पूर आलेला आहे. या पुराच्या पाण्यात अनेकजण स्टंटबाजी करत असतात. परंतु हि स्टंटबाजी जीवावर बेतत असते. असाच प्रकार वॉशिंच्या शेलूबाजार येथे समोर आला असून नदीत उडी घेणारा हा तरुण पुराच्या पाण्यात वाहून गेला होता. ४८ तासांनंतर या तरुणाचा मृतदेह सापडून आला आहे. सागर अरुण प्रधान (वय ३०) असे या तरुणाचे नाव आहे. वाशीम जिल्ह्यातील अनेक भागात मुसळधार पाऊस झाला होता. यामुळे शेलुबाजार येथील अडाण नदी दुथडी भरून वाहत आहे. या नदीवर असलेल्या पुलावरून वाहणाऱ्या पाण्यात अती उत्साहात स्टंटबाजी करत सागर प्रधान या युवकाने उडी मारली. दरम्यान नदीच्या पाण्याचा वेग प्रचंड असल्यामुळे त्याला बाहेर निघता आले नाही आणि या प्रवाहात तो वाहून गेला होता. तेव्हापासून तो बेपत्ता होता. सदर प्रकार परिसरात माहित झाल्यानंतर येथे गर्दी जमली. मंगरूळपीर तहसीलचे तहसीलदार, नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, तसेच पोलीस विभागाचे अधिकारी घटनास्थळावर दाखल झाले होते. यानंतर तरुणाचा शोध घेण्यास सुरवात करण्यात आली होती.

### फेक अकाऊंटच्या संशयातून कोयत्याने वार

**पुणे :** पुण्यात दोन दिवसांपुर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांची हत्या करण्यात आली होती. त्यानंतर सासवड रस्त्यावर हडपसर भागामध्ये अगदी शुल्लक कारणामुळे म्हणजे हॉटस्पॉट न दिल्याने एका व्यक्तीची निर्घृण हत्या करण्यात आली होती. त्या पाठोपाठ काल (मंगळवारी) रात्रीच्या सुमारास गुलटेकडी परिसरात जुन्या वादातून एका तरुणाची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना ताजी असतानाच पुण्यातून आज आणखी एका तरुणावर फेक अकाऊंटच्या संशयातून कोयत्याने हल्ला केल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे. पुणे शहर परिसरात रोज खुन, हत्या, बलात्काराच्या घटना उघडकीस येत असतानाच पुण्यातील सिंहगड रस्त्यावर सकाळी कोयत्याने तरुणावर हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे.

### पोलीस असल्याची बतावणी करत विद्यार्थ्यांचे अपहरण

**पुणे :** पोलीस असल्याची बतावणी करीत दोन कोटी रुपयांच्या खंडणीसाठी दोन विद्यार्थ्यांचे अपहरण करणाऱ्या टोळीतील दोघा आरोपींना गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकाने अटक केली. योगेश विश्वास सावंत आणि ज्ञानेश्वर विलास घाडगे (वय २६, रा. मगरवस्ती खंडाळी, ता. माळशिरस, जि. सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी २१ वर्षीय विद्यार्थ्याने हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी व त्यांचा मित्र हे दोघेजण दुचाकीवरून चालले होते. यावेळी दोन कारमधून आलेल्या आरोपींनी दोघांना जबरदस्तीने कारमध्ये बसवून अपहरण केले. तसेच, आरोपींनी पोलीस असल्याचे ओळखपत्र दाखवत दोन कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी केली.

# आम्ही मविआ म्हणूनच आगामी निवडणुकीला सामोरे जाणार - नाना पटोले

**प्रतिनिधी**
■ पुणे

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी बुधवारी महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा विधानसभा निवडणुकीनंतरच ठरवला जाईल असे स्पष्ट केले. आता काँग्रेसनेही त्यांच्या भूमिकेचे जोरदार समर्थन करत यासंबंधीच्या उद्धव ठाकरे यांच्या मागणीला वाटाण्याच्या अक्षता दिल्या आहेत. शरद पवार बोललेत ते योग्यच आहे. आम्ही महाविकास आघाडी म्हणूनच आगामी विधानसभा निवडणुकीला सामोरे जाऊ, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे.



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीच्या मेळाव्यात काँग्रेस व शरद पवार गटाला मुख्यमंत्रीपदाचा चेहरा ठरवून निवडणुकीला सामोरे जाण्याचे आवाहन केले होते. मविआने विधानसभा निवडणुकीपूर्वी आपला मुख्यमंत्रीपदाचा चेहरा ठरवावा. हवे तर काँग्रेस व शरद पवार गटाने मुख्यमंत्रीपदाचा आपला उमेदवार घोषित करावा. आम्ही त्याला पाठिंबा देऊ, असे ते म्हणाले होते. पण शरद पवार यांनी बुधवारी कोल्हापुरात पत्रकारांशी संवाद साधताना त्यांची ही मागणी धुडकावून लावली होती.

महाविकास आघाडीच्या मुख्यमंत्रीपदाच्या चेहऱ्यावर विचार करण्याचे तूर्त कोणतेही कारण नाही. आज कशाचा काही पत्ता नाही. बहुमत मिळेल असे वातावरण आहे यात शंका नाही. पण त्यानंतरही त्याची आत्ताच मांडणी करण्याची गरज नाही. नेतृत्व कुणी करायचे हा निर्णय निवडणूक झाल्यानंतर संख्याबळानुसार घेता येईल. लोकांच्या पाठिंब्यानंतर एक स्थिर सरकार देणे महत्त्वाचे आहे. स्थिर सरकार देणे, हे आमचे प्रथम उद्दिष्ट्य आहे, असे शरद पवार यांनी म्हटले आहे. शरद पवारांच्या या भूमिकेनंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही त्याचे जोरदार समर्थन केले. शरद पवार काहीही चुकीचे बोलले नाहीत.

# लाडकी बहीण योजनेच्या पैशांचा मोह नडला

## 30 अर्ज भरल्याप्रकरणी पती- पत्नी ताब्यात

**प्रतिनिधी**
■ सातारा

सातारा जिल्ह्यातील एका व्यक्तीने लाडकी बहीण योजनेचा लाभ घेत तब्बल एकच बँक खाते नंबर देऊन ३० अर्ज भरले होते. या प्रकरणाचा तपास करत पोलिसांनी आतापर्यंत दोन व्यक्तींना अटक केलेली आहे. अटक केलेले व्यक्ती पती- पत्नी असून या गुन्ह्याबाबत पोलीस आता त्यांची चौकशी करत आहेत. वडुज पोलीस स्टेशनला याबाबत गुन्हा दाखल केला आहे.

राज्य सरकारने महिलांसाठी लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. दर महिन्याला १५०० रुपये महिलांच्या खात्यात जमा होणार आहेत. दरम्यान जुलै व ऑगस्ट अशा दोन महिन्यांचे ३ हजार रुपये अनेक महिलांच्या खात्यात जमा झाले आहेत. मात्र या योजनेचा लाभ घेण्यासाठी वडूज येथील एका व्यक्तीने ३० अर्ज भरून एकच बँक खाते क्रमांक देऊन फसवणूक केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात सदर व्यक्तीला आणि त्याच्या पत्नीला ताब्यात घेण्यात आले आहे. या दोघांनी लाडकी बहीण योजनेमध्ये ३० फॉर्म भरले असून या सर्व फॉर्मला एकच अकाउंट नंबर होता. तसेच आधार कार्ड वेगवेगळे वापरले होते. त्याबाबत फोटोग्राफमध्ये सुद्धा त्यांनी बदल केलेला होता.

सदर प्रकार लक्षात आल्यानंतर याप्रकरणी जिल्हा प्रशासनाने त्रिसदस्य समितीची स्थापन केली होती. त्या समितीने संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून अहवाल प्रशासनाला दिला. त्याप्रमाणे शासनाकडून २ सप्टेंबरला फिर्याद दिली असून त्या फिर्यादीप्रमाणे पती- पत्नीला ताब्यात घेऊन कस्टडीत ठेवून चौकशी सुरू आहे. तसेच त्यामध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का? याचा तपास सुरू आहे. पैशाच्या हव्यासापोटी हा गुन्हा त्या व्यक्तीने केलेला असल्याचे प्रथमदर्शनी समजून येत आहे. या गुन्ह्यात काही नातेवाईक आणि अनोळखी महिलांचे कागदपत्र वापरल्याचे दिसून येत आहे.

# मनसेच्या तालुकाध्यक्षावर हल्ला; हल्लेखोरांवर गुन्हा दाखल

**प्रतिनिधी**
■ रत्नागिरी

रत्नागिरी तालुका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष रुपेश जाधव यांच्यावर मंगळवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास शहरातील गोडबोले स्टॉपनजिक हल्ला करण्यात आला आहे. त्यांना जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष रुपेश जाधव यांच्यावर झालेला हा हल्ला पक्षांतर्गत वादातून झाला असावा अशी चर्चा सदया रत्नागिरीत सुरु आहे. या हल्ल्यात पक्षातीलच एका नेत्याचा हात असल्याचा आरोप रुपेश जाधव यांनी केला आहे. दरम्यान या प्रकाराने रत्नागिरी शहरात खळबळ उडाली आहे. मनसे तालुकाध्यक्ष रुपेश जाधव हे मंगळवारी आपल्या गोडबोले स्टॉप येथील कार्यालयात बसले होते. रात्री नऊ वाजता कार्यालय बंद करुन ते बाहेर पडले.

यावेळी मागून येणाऱ्या चार ते पाच जणांनी त्यांच्यावर लाठ्या काठ्या घेऊन हल्ला केला. यावेळी रुपेश जाधव यांना या लोकांकडून बेदम मारहाण करण्यात आली. मारहाण केल्यानंतर हल्लेखोर पळून गेले. जखमी अवस्थेत रुपेश जाधव यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

यावेळी त्यांची प्राथमिक तपासणी करण्यात आली. पक्षातील एका वरिष्ठ नेत्याच्या सांगण्यावरुन हा हल्ला केला गेला असल्याचा आरोप जखमी रुपेश जाधव यांनी केल्याने एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी रत्नागिरी पोलीस ठाण्यात खबर देण्यात आली असून हल्लेखोरांवर गुन्हा दाखल करण्याचे काम रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला.

# रामगिरी व राणेंवर कारवाई करा अन्यथा मुंबईत मोर्चा

## इम्तियाज जलील यांचा सरकारला अल्टिमेटम

**प्रतिनिधी**
■ संभाजीनगर

रामगिरी महाराज आपण स्वत:ची काळजी घ्या,सरकारला विनंती आहे की त्यांना Z सुरक्षा द्या. त्यांनी आपल्या लोकांपासून सुरक्षित आहे, हे लोक तुमच्या मागे पडू शकतात. आम्ही काही करणार नाही. धमकी नाही फक्त अलर्ट करत आहे असा इशारा एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी खासदार इम्तियाज जलील यांनी सरकारला दिलाय. छत्रपती संभाजीनगरमध्ये घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पाच दिवसांनंतर मुंबईकडे कूच करणार आहे, मुस्लिम समाजाने गाड्यांची सोय करून ठेवा, लवकरच तारीख सांगु. असा अल्टिमेटमच त्यांनी सरकारला दिलाय. धर्मांध व्यक्तव्यावर करणाऱ्या नितेश राणेंवर





कारवाई करा. महाविकास आघाडीला आम्ही प्रस्ताव दिला होता आता खूप वेळ झाल्यानं आम्ही निर्णय घेतोय असं सूचक वक्तव्यही त्यांनी केलंय.

राज्यात रामगिरी महाराज यांनी मुस्लिमांच्या भावना दुखावणे विधान केल्यानंतर मोठा वादंग माजला होता. यावर इम्तियाज जलील यांनी केलेल्या वक्तव्यामुळे खळबळ माजली आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांसह सरकारवर जोरदार टीका केली.

वादग्रस्त वक्तव्य केल्याचा आरोप असलेल्या रामगिरी महाराज यांच्यावर गुन्हे दाखल होऊन देखील कारवाई होत नसल्याने एमआयएमचे नेते इम्तियाज जलाल यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. महाराष्ट्र सरकारला आम्ही पाच दिवसांचा वेळ देतो, रामगिरी महाराज यांच्यावर कारवाई करा अन्यथा मी आतापर्यंतची सर्वात मोठी रॅली घेऊन मुंबईला येणार असल्याचा इशारा जलील यांनी दिला आहे.

# तिवसा येथे महिला स्पेशल बैलपोळा

## शेतकरी महिलांनी सजवून आणल्या बैलजोड्या



**प्रतिनिधी**
■ अमरावती

शेतकऱ्यांचा सर्वात मोठा सण सलग दोन दिवस साजरा करण्यात आल्यावर आज तिसऱ्या दिवशी अमरावती जिल्ह्यात तिवसा येथे खास शेतकरी महिलांसाठी पोळ्याचा उत्सव आमदार यशोमती ठाकूर यांच्या नेतृत्वात आयोजित करण्यात आला. या महिला स्पेशल पोळा उत्सवात स्वतः पारंपरिक वेशभूषेत नटून थटून आलेल्या महिलांनी आपल्या घरची सजवलेली बैलजोडी देखील आणली.

बैलजोडींवर सामाजिक आणि राजकीय संदेश - सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांसमोर असणाऱ्या अडचणी या संदर्भातील शेतकऱ्यांच्या वेदनांची माहिती बैलांच्या अंगावर टाकण्यात आलेल्या झुलींवर अंकित करण्यात आली. शासनानं शेतकऱ्यांना मदत करावी या संदर्भात देखील निवेदन स्वरूपातील माहिती अनेक बैलांवरील झुलींवर वाचायला मिळाली. महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या याकडे देखील महिलांच्या या बैलपोळ्यामध्ये लक्ष वेधण्यात आलं. महिलांचा बैलपोळा हा अमरावती जिल्ह्यातील पहिलाच उपक्रम आहे. गत पाच वर्षांपासून महिलांचा पोळा आयोजित करण्याचे नियोजन आमदार यशोमती ठाकूर यांनी केलं.

# व्हेल माशाच्या उलटीची तस्करी प्रकरणी वन विभागाची कारवाई; चौघांना घेतले ताब्यात

**प्रतिनिधी**
■ चिपळूण

चिपळूण तालुक्यातील मुंबई गोवा महामार्गालगत असलेल्या वालोपे येथील एच. पी पेट्रोल पंप याठिकाणी व्हेल माशाची उलटीची तस्करी करणाऱ्या चारजणांना चिपळूण वनविभागाने सापळा रचून पकडले. या कारवाईत दोन वाहनांसह संशयित आरोपींना वनविभागाने ताब्यात घेतले. या चौघांवर वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ अन्वये गुन्हा दाखल करुन कारवाई केली आहे.

व्हेल माशाची उलटीची तस्करी प्रकरणी प्रकाश तुकाराम इवलेकर (वय वर्षे ६०, रा वेळवी ता. दापोली), दिलीप पांडुरंग पाटील ( वय वर्षे ५०, रा वेळवी ता. दापोली), प्रविण प्रभाकर जाधव (वय वर्ष ४७ रा. मंडणगड), अनिल रामचंद्र महाडीक (वय वर्ष ४७ रा. अडखळ, मंडणगड) अशा ताब्यात घेतलेल्या चार जणांची नावे आहेत. संशयित आरोपींकडून व्हेल माशाची २.८९२ किलो ग्राम उलटी व शाईन गाडी (क्रमांक एमएच ०८/९-३४६९) तसेच अँक्टिव्हा गाडी (क्रमांक एमएच-०८ बीबी १०८४) जप्त करण्यात आली आहे. ताब्यात घेतलेल्या सर्व आरोपींच्या विरुध्द वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ अन्वये वनरक्षक कोळकेवाडी यांच्याकडील प्र.गु.रि. ०२/२०२४, दि.०३/०९/२०२४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# मालवण येथे 9 एकर जमिनीवर शिवपुतळा, शिवसृष्टी निर्माण करण्याचा प्रस्ताव - मंत्री केसरकर

**प्रतिनिधी**
■ सावंतवाडी

मालवण येथे समुद्रकिनारालगत शासकीय ९ एकर जमीन आहे. त्या जमिनीवर महाराजांना साजेसे स्मारक, शिवसृष्टी उभारून छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमाराची चित्रसृष्टी तयार करता येईल. यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे प्रस्ताव सादर केला जाईल असे शालेय शिक्षण व मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

सावंतवाडी तहसीलदार कार्यालयात आयोजित बैठकीनंतर शिक्षण मंत्री दीपक केसरकर पत्रकारांशी बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी किशोर तावडे उपस्थित होते. ते म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांचा राजकोट किल्ल्यावरील पुतळा कोसळला ही अतिशय दुःखद घटना आहे, झालेला प्रसंग अत्यंत दुर्दैवी आहे. वाईटातून चांगले व्हावे असे मी म्हटले होते. मात्र त्यावर राजकीय नेते व राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष, माजी मंत्री जयंत पाटील यांनी टीका केली. ते आले आणि गेले. मात्र स्मारक आम्हीच करणार आहोत, त्यासाठी पुढाकार घेतला आहे.

केसरकर पुढे म्हणाले, मालवण येथे ९ एकर जमीन शोधली आहे. त्या ठिकाणी महाराजांचे स्मारक, शिवसृष्टी, जेटी बांधता येईल. याठिकाणी जेटी उभारून छत्रपती शिवाजी महाराजांचा सिंधुदुर्ग किल्ला, शिवसृष्टी दाखवता येईल. छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारला जाईल. याबाबत आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा केली आहे.

# अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा घेतला आढावा



**प्रतिनिधी**
■ संभाजीनगर

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे आज मराठवाड्याच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात ते या विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड व हिंगोली या 5 जिल्ह्यांना भेटी देऊन अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेणार आहे.

आदित्य ठाकरे यांनी आपल्या दौऱ्याच्या पहिल्या भेटीत पाचोड येथील नुकसानीचा आढावा घेतला. यावेळी बोलताना त्यांनी सरकारला शेतकऱ्यांना तातडीने मदत करण्याचे आवाहन केले. तसेच महाराष्ट्रद्वेष्ट्यांना पळवून लावण्याचा संकल्पही व्यक्त केला. महाविकास आघाडीमध्ये कुठेही मित्रपक्षांविरोधात लढाई नाही. आमची लढाई महाराष्ट्राचा स्वाभिमान व हितासाठी आहे. महाराष्ट्र द्वेष्ट्यांना पळवून लावणे हेच आमचे एकमेव ध्येय आहे, असे ते म्हणाले. शेतकऱ्यांना मदत करताना राजकारण करू नये. माझा पाहणी दौरा जाहीर झाला त्यानंतर आता सरकर सक्रिय झाल्याची टीका ठाकरे यांनी केली. तसेच राष्ट्रपती देखील मराठवाड्यात आहेत, त्यांनी गंभीर पुर परिस्थितीची नोंद घेऊन सूचना कराव्यात अशी मागणी देखील आदित्य ठाकरे यांनी यावेळी केली. मागच्या वेळी कृषीमंत्री असलेले यावेळी पालकमंत्री आहेत, ते त्यावेळी देखील फिरकले नाहीत. आता कृषीमंत्री कोणीतरी दुसरे आहे, नाव देखील माहिती नाही राज्याला, असा हल्लाबोल आदित्य ठाकरे यांनी सरकारवर केला. आदित्य ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, मीठागराची 256 एकर जागा ही अदानी यांना दिली जात आहे. हे लोक मुंबई विकायला निघाले आहेत. महाराष्ट्रात काय सुरू आहे हे सर्व जण बघत आहेत. मुख्यमंत्रीपदासाठी कुणी लढत नाहीये, आम्हाला भाजपला हद्दपार करायचे आहे. तर कृषीमंत्री कोण त्यांचे नावही महाराष्ट्राला माहित नाही, असा टोलाही त्यांनी लगावला आहे. आदित्य ठाकरे म्हणाले की, आम्हाला राज्यात सरकार मुख्यमंत्रीपदासाठी बनवायचे नाही. तर भाजपला सत्तेतून पायउतार करण्यासाठी आम्हाला राज्यात सरकार बनवायचे आहे.

# सावंतवाडी आगारातील 80 टक्के कर्मचारी संपात सहभागी

**प्रतिनिधी**
■ सावंतवाडी

एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत राज्य सरकारकडे पाठपुरावा करून ही त्याची कोणतीही दखल न घेण्यात आल्याने काल, मंगळवारपासून सुरू असलेला संप आज बुधवारी दुसऱ्या दिवशी कायम होता. सावंतवाडी एसटी आगारातील तब्बल ८० टक्के कर्मचारी संपात सहभागी झाल्याने तुरळक एसटी सेवा सुरू होती. लांबच्या प्रवाशांना या संपाचा मोठा फटका बसला.

अधिकाऱ्यांनी विनवणी करूनही चालक वाहक सेवेत रुजू झाले नसल्याने प्रवासी ही चांगलेच खोळंबले होते. सावंतवाडी एसटी आगार ठप्प झाले होते. सिंधुदुर्ग जिल्ह्यात संपाचा सर्वात मोठा फटका हा सावंतवाडीला बसला असून जिल्ह्यातील इतर तालुक्यात तुरळक एसटी सेवा सुरू होत्या. काही कर्मचारी सेवेत रुजू असल्याने तालुक्यातील काही गावांमध्ये एसटी सेवा सुरू ठेवल्या. पण लांब पल्ल्याच्या गाड्यांना ब्रेक लागल्याने प्रवासी बस स्थानकात अडकून पडले होते.

उशिरापर्यंत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विनवणी केली पण कर्मचाऱ्यांनी सेवेत रुजू होण्यास नकार दिला. सावंतवाडी एसटी आगाराचे प्रमुख निलेश गावित यांनी दिलेल्या माहितीनुसार मुंबईकडे नेहमी १८ बसेस जातात पण सध्या १६ बसेस पूर्ण पणे बंद आहेत. शाळेच्या मुलांना ने आण करण्यासाठी काही कर्मचारी सेवेत आहेत.

एसटी सेवा ठप्प झाल्याने याचा बाजारपेठेवर मोठा परिणाम झाला. गणेश चतुर्थीच्या तोंडावर संप पुकारल्याने बाजारपेठेत नागरिकांची लगबग कमी झाली. याचा फटका व्यापाऱ्यांना बसत आहे.

# प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यानिमित्त मध्यभागात वाहतूक बदल

**प्रतिनिधी**
■ पुणे

प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यानिमित्त मध्यभागात वाहतूक बदल करण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी रस्ता वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार आहे. प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यानिमित्त मंडळांकडून मिरवणुका काढण्यात येतात. छत्रपती शिवाजी रस्त्यावरील शनिवारवाडा परिसरात 'श्रीं'ची मूर्ती खरेदीसाठी भाविकांची गर्दी होत असल्याने डेंगळे पूल ते शिवाजी पूल, कसबा पेठ, जिजामाता चौक, सारसबाग परिसरातील सावरकर पुतळा चौक ते समाधान भेळ सेंटर (सिंहगड रस्ता) परिसरात वाहतूक बदल करण्यात येणार आहेत, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी दिली.

छत्रपती शिवाजी रस्त्यावरील गाडगीळ पुतळा चौक ते गोटीराम भैय्या चौक परिसरात वाहतुकीस बंद राहणार आहे. वाहनचालकांनी गाडगीळ पुतळा चौकातून डावीकडे वळून कुंभारवेस चौक, शाहीर अमर शेख चौकमार्गे इच्छितस्थळी जावे. संचेती चौकाकडून छत्रपती शिवाजी रस्त्याने स्वारगेटकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी स. गो. बर्वे चौकातून, जंगली महाराज रस्ता, खंडुजीबाबा चौक, टिळक रस्त्याने इच्छितस्थळी जावे.

# चाकूचा धाक दाखवून महिलेवर अत्याचार

■ लातूर

राज्यात महिला अत्याचाराच्या घटना थांबण्याच्या नावच घेईना. राज्यात दर दिवसाला महिला अत्याचाराच्या घटना घडू लागल्या आहेत. महिला अत्याचाराच्या घटना सातत्याने घडू लागल्याने महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीस आला आहे. वाढत्या महिला अत्याचारांच्या घटनांमुळे महिला सुरक्षेविषयी चिंता व्यक्त करण्यात येत आहे. याचदरम्यान, महाराष्ट्रातील लातूरमधून महिला अत्याचाराची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. लातूरमध्ये चाकूचा धाक दाखवून महिलेवर अत्याचार केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. लातूरच्या कासार-शिरसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली आहे. लातूरच्या निलंगामध्ये खळबळ उडाली आहे. लातूरच्या निलंगा तालुक्यातील कासार-शिरसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका ३४ वर्षीय महिलेवर अत्याचार झाल्याची खळबळजनक घटना घडली आहे.

# आरएसएसने कितीही प्रयत्न केले तरी राज्यात सत्ता परिवर्तन होणारच!

**प्रतिनिधी**
■ नागपूर

राज्यातील जनता भाजपला कंटाळली आहे. महाराष्ट्रातील राजकरण एकमेका विरोधात नव्हते. वैयक्तिक विरोधात बोलण्याचे काम महाराष्ट्रात झाले. बहुजन समाज भाजपला कंटाळला आहे. त्यामुळे आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने कितीही प्रयत्न केले तरी राज्यात सत्ता परिवर्तन अटळ आहे. पुढील २० ते २५ वर्ष तरी राज्यात भाजपचा मुख्यमंत्री होणार नाही, असा दावा विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला.

बुधवारी नागपुरात पत्रकारांशी बोलताना वडेट्टीवार म्हणाले, आता उपमुख्यमंत्री अजित पवार आहे लाडक्या बहिणींचा भाऊ म्हणून प्रोजेक्ट होत आहेत. ही श्रेय वादाची लढाई आहे. निवडणुकीच्या तोंडावर आहेत. यांना बहिणीचे



प्रेम ओळखून आहे. हा दुष्ट भाऊ आहे. हा रक्षण करू शकत नाही. दोन चार महिन्यात पैसे देऊन मत मिळतील या भ्रमात राहु नये, असा टोला त्यांनी लगावला. आरटीओमधील बदल्यांवर वडेट्टीवार म्हणाले, सगळ्या बदल्या राजकीय पैशाच्या भरवश्यावर होत आहेत. बोली लावली जात आहे. अधिकाऱ्यांना धमक्या दिल्या जात आहेत. सत्ताधारी आमदार पोलिसांची गाडी साफ करून घेतो तर पोलिसांची मानसिकता काय शिल्लक राहिली असेल. लवकर सत्तेत या नाहीतर हे लोक महाराष्ट्र खड्ड्यात घालतील असे अनेक अधिकारी आम्हाला खाजगीत सांगत आहेत, असा दावा त्यांनी केला. उद्धव ठाकरे यांची ताकद रावसाहेब दानवे यांना कळली. स्वतःच्या स्वार्थासाठी दुसऱ्याचे पक्ष फोडायचे. त्यात दुसऱ्यांदा साथ द्यायची. दुसऱ्यांची पाळी आली की त्यांचा पक्ष फोडायचा चिन्ह पळवायचे हे पाप जे करत आहे. त्याचे कर्म भोगावे लागतील, असा चिमटाही त्यांनी घेतला.

एसटीच्या संपकारी कर्मचाऱ्यांना नियमित करण्याचा शब्द दिला होता. सदावर्तेंच्या माध्यमातून सामावून घेऊ म्हणाले होते. पण ते झाले नाही. काँग्रेसने त्यांना पाठिंबा दिलेला आहे. पडळकर जर एसटी कामगारांच्या आंदोलनाला पाठिंबा देत असेल तर त्यांची भूमिका बदललेली आहे. त्यांच्या वाट्याचा वाटेकरी दुसरा झाल्याने ते परेशान झाले आहेत. पडळकर सध्या सरकारच्या विरोधी भूमिका मांडताना दिसून येत आहेत. सगळं आलबेल आहे असं म्हणता येत नाही, असा टोलाही त्यांनी लगावला.

## मिवीने सादर केले सुपरपॉड्स ओपेरा

**मुंबई :** सुपरपॉड्स ओपेरा सीरीज एक अद्वितीय आवाजाचा अनुभव प्रदान करण्यासाठी डिझाइन केलेली आहे, ज्यामध्ये हाय-रेज वायरलेस ऑडिओ क्षमतांचा समावेश आहे, ज्यामुळे संगीतातील सूक्ष्म तपशील कॅप्चर होतात, एलडीएसी ब्लूटूथ कोडेकद्वारे गुणवत्तेशी तडजोड न करता साधर्म्याने प्रसारित केले जाते. प्रमुख वैशिष्ट्यांमध्ये स्पॅटियल ऑडिओ आणि 3D साउंडस्टेज समाविष्ट आहेत, जे अद्वितीय ऐकण्याच्या अनुभवाला योगदान देतात, 60 तासांपर्यंतची बॅटरी लाईफ, मिवी ऑडिओ ॲपद्वारे अनुकूलन पर्याय, ब्लूटूथ v5.4 द्वारे स्थिर कनेक्टिव्हिटी, आणि मल्टी-डिव्हाइस कनेक्टिव्हिटी जी सहज मल्टीटास्किंगला सक्षम करते. ओपेरा सीरीज आता फ्लिपकार्ट, मिवीच्या अधिकृत वेबसाइटवर, आणि निवडक ऑफलाइन रिटेलर्सकडे विक्रीसाठी उपलब्ध आहे.



## श्रीकांत चषक मोफत कॅरम स्पर्धा

प्रतिनिधी
■ मुंबई

श्रीकांत स्पोर्ट्स क्लब-कांदिवली व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे शालेय-कॉलेजमधील १८ वर्षाखालील मुलांची विनाशुल्क कॅरम स्पर्धा १४ सप्टेंबर रोजी कांदिवली-पूर्व येथे आयोजित करण्यात आली आहे. विजेत्या-उपविजेत्यांना एकूण ८ आकर्षक चषक व स्ट्रायकर पुरस्कार दिले जाणार आहेत. श्रीकांत स्पोर्ट्स क्लबने गणेशोत्सव साजरा करतांना यंदा प्रथमच जिल्हा स्तरावर शालेय कॅरम स्पर्धेचा मोफत उपक्रम साकारला आहे.

शालेय-महाविद्यालयीन प्रमुख कॅरम स्पर्धे अगोदर स्पर्धात्मक सराव मिळण्यासाठी मुंबई व पालघरमधील ज्युनियर खेळाडूंच्या आग्रहास्तव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीच्या मार्गदर्शनाखाली श्रीकांत स्पोर्ट्स क्लबचे पदाधिकारी प्रणव निकुंब, प्रकाश चेल्लारी, सिद्धेश पवार, स्वप्निल पाटील, मिलिंद गावकर आदी मंडळी कॅरम स्पर्धा दर्जेदार होण्यासाठी विशेष कार्यरत आहेत. स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या संबंधीत खेळाडूंनी प्रवेश अर्जासाठी अथवा अधिक माहितीसाठी संयोजक लीलाधर चव्हाण अथवा क्रीडापटू चंद्रकांत करंगुटकर [९९८७८ ३१६२२] यांच्याकडे ६ सप्टेंबरपर्यंत संपर्क साधावा..

### मराठमोळ्या सचिन खिलारीचा पॅरिसमध्ये महापराक्रम

## 40 वर्षांनी गोळाफेकमध्ये भारताला मिळवून दिले पदक

वृत्तसंस्था
■ पॅरिस

आटपाडी ,सांगलीचा सुपुत्र सचिन सर्जेराव खिलारीने पॅरालिम्पिक २०२४ गोळाफेकमध्ये रौप्यपदक जिंकत सुमारे ४० वर्षांनंतर भारताचा गोळाफेकीतील पदकाचा दुष्काळ संपवला. सचिनने आपल्या पराक्रमी कामगिरीने देशावासियांचीच नव्हे तर महाराष्ट्राच्या नागरिकांची मान अभिमानाने उंचावली आहे.



पॅरिस पॅरालिम्पिकच्या ७व्या दिवशी भारताच्या सचिन खिलारीने पुरुषांच्या गोळाफेक F46 प्रकारात रौप्य पदक जिंकले आहे. या रौप्य पदकासह, सचिन ४० वर्षांत पॅरालिम्पिकमध्ये गोळाफेक प्रकारात पदक जिंकणारा पहिला भारतीय पुरुष खेळाडू ठरला आहे. यापूर्वी १९८४ मध्ये भारताने पुरुषांच्या गोळाफेकमध्ये पहिले पदक जिंकले होते. याच स्पर्धेत असलेले इतर भारतीय खेळाडू रोहित कुमार १४.१० च्या थ्रोसह नवव्या आणि मोहम्मद यासरने १४.२१ च्या थ्रोसह आठवे स्थान पटकावले.

सचिनच्या या पदकासह भारताच्या पदकांची संख्या २१ झाली आहे. सचिनने १६.३२ मीटर्सच्या आशियाई विक्रमी थ्रोसह दुसरे स्थान पटकावले. कॅनडाच्या ग्रेग स्टीवर्टने सुवर्णपदक जिंकले. क्रोएशियाच्या बाकोविक लुकाने १६.२७ मी फेकसह वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी करत कांस्यपदक जिंकले.

सचिन सर्जेराव खिलारी हा मूळचा आटपाडी सांगली जिल्ह्यातील आहे. सचिनने यापूर्वी वर्ल्ड पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२४ मध्ये आशियाई विक्रमासह सुवर्णपदक जिंकले होते. ३४ वर्षीय सचिनने दुसऱ्या प्रयत्नात आपली सर्वोत्तम कामगिरी केली आणि १६.३० मीटरचा स्वतःचा आशियाई विक्रम मोडला. जपानमध्ये मे २०२४ मध्ये झालेल्या जागतिक पॅरा-ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक जिंकून त्याने हा विक्रम केला. खिलारीचे रौप्यपदक हे सध्या सुरू असलेल्या पॅरा गेम्समध्ये पॅरा-ॲथलेटिक्समध्ये जिंकलेले ११वे पदक आहे. गेल्या वर्षी चीनमध्ये झालेल्या आशियाई पॅरा गेम्समध्येही सचिनने सुवर्णपदक पटकावले होते. F46 श्रेणी अशा खेळाडूंसाठी आहे ज्यांच्या हातात कमकुवतपणा आहे, स्नायू कमकुवत आहेत किंवा त्यांच्या हातांची हालचाल कमी आहे. या प्रकारात खेळाडू उभे राहून स्पर्धा करतात

## 'किड्स स्पोर्ट्स कार्निवल' बोरीवलीत उत्साहात संपन्न



प्रतिनिधी
■ मुंबई

प्रज्ञा वर्धिनी फाउंडेशन आणि मॅक्सज्ञान स्पोर्ट्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या "किड्स स्पोर्ट्स कार्निवल" या आगळयावेगळया आंतरशालेय उपक्रमाला विद्यार्थी व पालकांचा छान प्रतिसाद मिळाला. सुविद्या स्पोर्ट्स अकॅडमी गोराई, बोरीवली (पश्चिम) या ठिकाणी या कार्निवलचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी माजी खासदार गोपाळ शेट्टी आणि वीरमाता अनुराधाताई गोरे यांनी उपस्थित राहून 15 शाळांमधून साडेआठशे पालक आणि मुलं यांना 'खेळाचे महत्व' याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. अनुराधाताई गोरे आणि गोपाळ शेट्टी यांनी या वेळी आयोजकांचे, सर्व मुले, पालकांचे कौतुक करून 'खेळ आपल्याला शिस्तबद्धता आणि योग्य संयम शिकवतात' असे सांगितले. येणाऱ्या काळामध्ये मुंबई उपनगरात "स्पोर्ट्स हब" बनविण्याचे आपले उद्दिष्ट असल्याचे मत देखील गोपाळ शेट्टी यांनी सर्वांसमोर मांडले.

यावेळेस प्रज्ञावर्धिनी फाउंडेशनच्या मॅनेजिंग ट्रस्टी ॲडव्होकेट रूपाली ठाकूर, ट्रस्टी सौ. वैशाली भिडे बर्वे, ट्रस्टी महादेव गोविंद रानडे, सुविद्या प्रसारक संघाचे माजी अध्यक्ष डॉ. वसंत खटाव, अथेना ग्लोबल लॉजिस्टिकसचे . विल्फ्रेड मेनेझेस, एमसीएचे क्रिकेट प्रशिक्षक नागेश ठाकूर, सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्टचे माजी सेक्रेटरी जनरल. नरेंद्र बगाडे हे मान्यवर देखील उपस्थित होते.

## बोपन्ना-सुत्जियादी जोडीचा यूएस ओपनच्या उपांत्य फेरीत पराभव

**न्यूयॉर्क :** भारताचा रोहन बोपण्णा आणि इंडोनेशियाचा अल्दिला सुत्जियादी ही जोडी यूएस ओपनच्या मिश्र दुहेरीच्या उपांत्य फेरीत पराभूत झाली आहे. 8व्या मानांकित जोडीला अमेरिकेच्या टेलर टाऊनसेंड आणि डोनाल्ड यंग यांनी 6-3, 6-4 ने पराभूत केले. यूयॉर्कमध्ये सुरू असलेल्या वर्षातील शेवटच्या ग्रँडस्लॅमच्या महिला एकेरीत अमेरिकेची टेनिस स्टार एम्मा नवारोने स्पेनच्या पॉला बेडोसाचा 6-2, 7-5 असा सरळ सेटमध्ये पराभव करून आपल्या पहिल्या ग्रँड स्लॅम उपांत्य फेरीत प्रवेश केला. गुरुवारी तिची दुसऱ्या मानांकित अरिना सबालेन्काशी लढत होईल. बेलारशियन स्टार सबालेंकाने चीनच्या 7व्या मानांकित झेंग कियानवेनचा 6-1, 6-2 असा पराभव केला.

## गणेशोत्सवाच्या काळात परीक्षा न घेण्याची जनता दलाची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

गणेशोत्सवाच्या काळात अनेक पालक आपल्या मुलाबाळांसह गावाकडे जात असतात, त्यामुळे या काळात विशेषतः शालेय विद्यार्थ्यांच्या परीक्षा न घेण्याची मागणी जनता दल (से) महाराष्ट्र पक्षाने शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्याकडे केली आहे.

यावर्षी गणपतीचे आगमन ७ सप्टेंबर रोजी होत असून अनंत चतुर्दशी (विसर्जन ) १७ सप्टेंबर रोजी आहे. कॉन्व्हेन्ट शाळा वगळता बहुतेक शाळांना पहिले पाच दिवस म्हणजे ११ तारखेपर्यंत सुट्टी आहे. तसेच १५ (रविवार), १६ (ईद) व १७ तारखेला अनंत चतुर्दशी निमित्त सुटी आहे. सीबीएसई शाळांमध्ये तर शनिवार १४ सप्टेंबर रोजीही सुटी आहे. त्यामुळे अनेक पालकांनी सलग सुट्टया गृहित धरून बाहेरगावी जाण्याचे नियोजन केले आहे. मात्र, काही शाळांमध्ये नियमावर बोट ठेवून, १२ व १३ तारखेला एक वा दोन विषयांची परीक्षा होणार आहे.

विरार, बोळींज येथील मुलजीभाई मेहता इंटरनॅशनल स्कूल या शाळेत १३ तारखेला एका विषयाची परीक्षा असून नंतर १४, १५, १६ व १७ सप्टेंबर असे सलग चार दिवस शाळेला सुट्टी आहे. त्यामुळे केवळ एकच पेपर १३ सप्टेंबर रोजी होणार आहे.

यामुळे गणपतीच्या काळात बाहेरगावी जाणाऱ्या पालकांची व त्यांच्या पाल्यांची अडचण होणार आहे. बाहेरगावी जाणारे पालक आपल्या येण्या-जाण्याच्या रेल्वे व बसच्या तिकिटाचे आगाऊ बुकिंग करून ठेवतात. त्यातच गणेशोत्सवाच्या काळात सर्वच गाड्यांना गर्दी असल्यामुळे ऐनवेळी पालकांना तिकिटे मिळणार नाहीत. त्यामुळे त्यांची अडचण होणार आहे.

या पार्श्वभूमीवर गणेशोत्सवानंतरच परीक्षांचे नियोजन करण्याच्या सूचना विरार येथील मुलजीभाई मेहता इंटरनॅशनल स्कूलसह सर्व शाळांना द्याव्यात, अशी विनंती जनता दल सेक्युलर पक्षाचे प्रवक्ते प्रभाकर नारकर यांनी शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्याकडे केली आहे.

## राहुल द्रविड राजस्थान रॉयल्सचा मुख्य प्रशिक्षक



**जयपूर :** टीम इंडियाचा माजी मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड आता आयपीएल फ्रँचायझी राजस्थान रॉयल्सचा मुख्य प्रशिक्षक बनला आहे. ESPNCricinfo च्या मते, त्याने फ्रेंचायझीसोबत करार केला आहे. हा करार किती दिवसांचा आहे आणि द्रविडला त्यासाठी किती रक्कम मिळणार आहे, याचा खुलासा अद्याप झालेला नाही.

## कुर्ला एल विभागात दूषित पाणी पुरवठा, भाजपचा पालिका कार्यालयावर हंडा मोर्चा

प्रतिनिधी
■ मुंबई

बुधवारी सकाळी वॉर्ड क्र 164. 165. 166. 167.168 या वार्डांमध्ये वारंवार होणारी पाणी टंचाई आणि दूषित पाणी समस्येचे निवारण करण्याकरिता भारतीय जनता पार्टी, कलिना विधानसभा तर्फे डॉ. नितेश राजहंस सिंह (महामंत्री - भाजपा उत्तर मध्य जिल्हा) आणि माजी नगरसेवक हरिष भांदिर्गे (निवडणूक प्रमुख - भाजपा चांदिवली विधानसभा ) यांच्या नेतृत्वाखाली बृहन्मुंबई महानगरपालिका 'एल' विभाग सहाय्यक आयुक्त यांच्या कुर्ला (प.) येथील कार्यालयावर संतप्त महिला व नागरिकांचा भव्य हंडा मोर्चा काढण्यात आला होता.



मोर्चाच्या वतीने शिष्टमंडळातर्फे एल विभाग महानगरपालिका अधिकारी यांना लेखी निवेदन देण्यात आले तेव्हा मनपा अधिकाऱ्यांनी आम्ही एल विभागातील पाण्याची समस्या लवकरात लवकर निवारण करु आणि नागरिकांना दिलासा देण्याचा पूर्ण प्रयत्न करू. असे लेखी आश्वासन दिले. या मोर्चात स्थानिक नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सोबत भाजप पदाधिकारी रवींद्र आपटे, नरपत राजपुरोहित, संदीप गुप्ता, रवी यादव, प्रणव सावंत, राजू गुप्ता, वॉर्ड क्र. 166 चे अध्यक्ष दिपू सिंह, 164 चे .राधेशाम यादव , 167 चे भाग्येश चौधरी, भाजप महिला पदाधिकारी, प्रतिभा पिंपळकर, प्राजक्ता मोहीते, रीना, हर्षदा गायकवाड व इतर पदाधिकारी सहभागी झाले होते.

## कोकणातील गावच्या घरात स्थापना करणाऱ्या मुंबईकरांसाठी गणपतीची आगळीवेगळी स्पर्धा

प्रतिनिधी
■ मुंबई

अटल सेवा केंद्र - अभिजित सामंत, कोकण विकास आघाडी मुंबई , व भाजप वॉर्ड 84 च्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या आपल्या कोकणातील घरात श्रीगणेशाची स्थापना करणाऱ्या मुंबईकर भाविकांसाठी एक आगळीवेगळी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. आपल्या कोकणातील घरात स्थापना केलेल्या गणपती बाप्पाचे 3 Photos आणि 2 Reels बनवा, गणेशोत्सवाचे वर्णन 150 शब्दात करा (जसे की किती वर्ष हा गणेशोत्सव साजरा होतोय, कोण कोण आणि कुठून कुठून ह्या गणेशोत्सवात सहभागी होतात, काही कार्यक्रम होत असल्यास, काही विशेष उपक्रम असल्यास त्याबाबतीत माहिती ई)आमच्या सोबत Tag करा आणि भरघोस बक्षिसे जिंका



स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी पूर्व नोंदणी आवश्यक आहे., आपण मुंबईचे रहिवाशी असणे आवश्यक आहे. घरगुती गणपतीची स्थापना आपल्या कोंकणातील गावच्या घरी केलेली असावी., गणपती बाप्पाच्या देखाव्यात, घरगुती कार्यक्रमात आपल्या संस्कृतीचे / परंपरेचे दर्शन असावे.

बाप्पाचे आगमन आणि सेवा यांसाठी घेतलेले श्रम आणि कल्पकता रिल्स , फोटोत सर्वांना दाखवावी. इच्छुकांनी नोंदणी करण्यासाठी खाली दिलेल्या Link वर क्लिक करून Google Form भरणे आवश्यक आहे.

https://shorturl.at/JSHVL

लिंक वर फॉर्म मिळत नसल्यास वा काही अधिक माहिती साठी 8169727502, 9136872103 ह्या नंबर वर missed call करावा वा whatsap मेसेज करावा .असे आवाहन माजी नगरसेवक अभिजित सामंत आणि सुहास आडीवरेकर, अध्यक्ष कोकण विकास आघाडी ,मुंबई. यांनी केले आहे.

## डबघाईला आलेल्या बेस्ट उपक्रमात सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना गलेलठ्ठ वेतन देऊन पुन्हा घेतले जाते सेवेत

### सेना युनियनने केला विरोध, सर्व आगारात दिला निषेध आंदोलन करण्याचा इशारा

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महानगरपालिकेचे एक अंग असलेला बेस्ट उपक्रम ७६ वर्षानंतर आता शेवटची घटका मोजत आहे. बेस्ट स्व मालकीच्या बसेस घेऊ शकत नाही. म्हणून भाडेतत्त्वावरील बसेस उपक्रमात चालवत आहेत. अशी परिस्थिती असताना सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचारी अधिकाऱ्यांना मोठा पगार देऊन पुन्हा कामावर ठेवले जाते तर काही अधिकारी भाडेतत्त्वावर बस पुरविणाऱ्या कंत्राटदाराकडे नोकरीला लागतात. व ज्या चुकीच्या मार्गाने बेस्टचा कारभार चालल्यामुळे उपक्रम डबघाईला आला. त्याच प्रवृत्तींना पुन्हा सेवेत घेतले जात आहे. मग ते बेस्ट उपक्रमात असो की, कंत्राटदाराकडे असो. बेस्ट उभारी घेईल तरी कधी? बेस्ट ला अच्छे दिन येणार तरी कधी, असा प्रश्न पडल्यावाचून राहत नाही.

बेस्ट मधील बेस्ट कामगार सेना या कामगार संघटनेचे अध्यक्ष सुहास सामंत यांनी बेस्ट महाव्यवस्थापक यांना पत्र देऊन बेस्ट मधील निवृत्त झालेल्या अधिकारी कर्मचारी वर्गास पुन्हा कंत्राटी पद्धतीने बेस्ट सेवेत घेऊ नका. इतर अधिकाऱ्यांना प्रमोशन मिळत नाही. प्रतीक्षा यादीत अनेक कामगारांची मुले नोकरी कधी मिळेल याची वाट पाहत आहेत. पण त्यांना न घेता 1/ 9/24 रोजी बेस्ट मधून सेवानिवृत्त झालेले व ज्यांच्यावर उच्च न्यायालयात त्यांच्या प्रमोशन बद्दल दावा दाखल असलेल्या एका अधिकाऱ्याला कंत्राटी कामगार म्हणून रू.98000 हजार पगार देऊन सेवेत पुन्हा घेतले आहे. याला सामंत यांनी विरोध केला आहे. पुढील ७ दिवसात सदर आदेश मागे घेण्यात आला नाही तर बेस्ट कामगार सेनेतर्फे बेस्टच्या सर्व आगारात जाहीर निषेध करून आंदोलन करण्यात येईल,आणि तेव्हाही ऐकले नाहीतर कामबंद आंदोलन करण्यात येईल असा इशारा महाव्यवस्थापकांना दिला आहे.



बेस्ट उपक्रमात गेल्या तीन वर्षापासून बेस्ट मधून सेवानिवृत्त झालेले विविध विभागातील अधिकारी कर्मचारी वर्गास बेस्ट उपक्रमात पुन्हा कंत्राटी पद्धतीने सामावून घेतले जात आहे. याबाबत बेस्ट कामगार सेनेतर्फे ५ जुलै रोजी पत्र देऊन महाव्यवस्थापकांच्या दालनात बेस्टच्या सर्व वरिष्ठ अधिकारी वर्गासोबात बैठक घेण्यात आली होती,त्यावेळी लेखा विभागाचे कर्मचारी अमोल मोराजकर ह्यांना फक्त तीन महिनेच नवीन आत्याधूनिक संगणक प्रणाली वर काम करण्यासाठी ठेवण्यात आले होते आणि तीन महिन्यानंतर त्यांना परत कामावर घेणार नाही आणि यापुढे बेस्ट मध्ये कोणत्याही सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी वर्गास बेस्ट उपक्रमात कंत्राटी पद्धतीने पुन्हा सेवेत घेणार नाही असे आश्वासन महाव्यवस्थापकांनी त्यांना दिले होते.

असे असताना आपण बेस्ट मधून .३१/०८/२४ रोजी सेवानिवृत्त झालेले परमार ह्यांना आपण मोठा गलेलठ्ठ पगार रू.९८०००/- एवढा देऊन पुन्हा सेवेत कंत्राटी पद्धतीने घेऊन बेस्टच्या सेवेत सद्या कार्यरत असणाऱ्या अधिकारी कर्मचारी वर्गावर अविश्वास दाखवला आहे. परमार यांनी सेवानिवृत्त होण्याच्या फक्त २० दिवस अगोदर बेस्टचे सर्व नियम डावलून स्वतःचे प्रमोशन करून घेतले आहे त्यामुळे त्यांना सेवानिवृत्ती नंतर जवळपास २० लाखाचा फायदा झाला आहे,त्यांच्या या प्रमोशन बद्दल बेस्ट चे माजी अधिकारी व जागृत बेस्ट कामगार संघटनेचे अध्यक्ष सुहास नलावडे उच्च न्यायालयात गेले असून त्यांची केस चालू आहे.

तरीही आपण त्यांना पुन्हा बेस्टच्या सेवेत रुजू केले आहे,यामागे कोणाचे फायदे आहेत आणि कोण दबाव आणून काम करून घेत आहे याचा शोध आम्ही लवणराच, तूर्तास आपण बेस्टच्या सेवेत निवृत्त झालेल्या अधिकारी कर्मचारी वर्गास पुन्हा कंत्राटी पद्धतीने बेस्टच्या सेवेत आणून बेस्टची प्रतिमा मलिन करण्याचे काम करत आहात,त्यामळे आमचा या गोष्टीला विरोध असल्याचे सुहास सामंत यांनी पत्रात म्हटले आहे.

## 'राईट टू शेल्टर' संघटनेचे मुलुंडमध्ये जनसंपर्क कार्यालय



प्रतिनिधी
■ मुंबई

मुलुंड मधील नागरिकांच्या समस्याचे निवारण करण्यासाठी, त्याना आपल्या घरांचा अधिकार मिळवून देण्यासाठी, कायदेशीर सल्ल्याचे मोफत मार्गदर्शन करण्यासाठी मुलुंड पूर्व येथील बी.एम्.सी. मार्केट जवळ, राईट टू शेल्टर या संघटनेद्वारे जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन करण्यात आले.

संघटनेचे पदाधिकारी सुधीर थळे, यांच्या पुढाकार्याने व दिनेश कोळी, रामदास पराड, विजय कोठारे, माधुरी कदन, योगेश राठोड, यांच्या सहकार्याने या जनसंपर्क कार्यालयाची स्थापना करण्यात आली असून त्याचे उदघाटन संघटनेचे अध्यक्ष ॲडव्होकेट संतोष सांजकर यांच्या हस्ते करण्यात आले. या सोहळयास संघटनेचे पदाधिकारी धनंजय पवार, अश्रुबा बंसोड़े, मक्सूदभाई शेख, अविनाष निकम, कुमार पाटिल, संतोष गायकवाड़, सुनील सुपे, अजित घागराम,. भारत वाघमारे, . पोपटराव कांबळे, रामजीभाई कोळी, हे उपस्थित होते.

## माजी नगरसेविका गीता यादव यांच्या पुण्यतिथीनिमित्त मोफत आरोग्य

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महापालिकेचे कर्तव्यदक्ष आणि लोकप्रिय काँग्रेस नगरसेवक असलेले कै. गीता यादव यांच्या चौथ्या पुण्यतिथीनिमित्त वर्सोवा वेल्फेअर असोसिएशन हायस्कूल, 7 बंगला अंधेरी पश्चिम येथे भव्य मोफत वैद्यकीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, दिवंगत माजी नगरसेविका गीता यादव यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात उपस्थितांनी श्रद्धांजली वाहिली. या आरोग्य शिबिरामध्ये हजारो गोरगरीब नागरिकांनी सहभाग घेऊन स्वतःची तपासणी केली. 25 डॉक्टरांच्या पथकाने दिवसभर मधुमेह, रक्तदाब, हृदय, किडनी अशा विविध आजारांची तपासणी करून लोकांना आरोग्याचा सल्ला दिला. मोफत चष्मा शिबिरात लोकांच्या डोळयांची तपासणी करून त्यांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. हजारो लोकांना मोफत रेशनचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खासदार वर्षा गायकवाड, मुंबई युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अखिलेश यादव, माजी आमदार अशोक भाऊ जाधव, माजी आमदार बलदेव खोसा, उत्तर पश्चिम मुंबई जिल्हाध्यक्ष क्लाईव्ह डायस उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजक वर्सोवा युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष संतोष व्ही यादव, मनोज व्ही यादव आणि विनय व्ही यादव यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले आणि सर्व लोकांचे आभार मानले.



## महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक धोरण-2016 अंतर्गत अनुदान वितरणात विलंबामुळे उद्योगवाढ आणि रोजगारनिर्मितीवर परिणाम

■ मुंबई

महाराष्ट्रातील इलेक्ट्रॉनिक्स निर्मिती करणाऱ्या कंपन्यांना महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक धोरण-2016 अंतर्गत अनुदान मिळविण्यात मोठा विलंब सहन करावा लागत आहे. या विलंबाचे कारण तांत्रिक समितीच्या बैठका वेळेवर न होणे आहे. नोव्हेंबर 2023 मध्ये शेवटची बैठक झाली होती, आणि त्यानंतर अजून कोणतीही बैठक आयोजित करण्यात आलेली नाही, ज्यामुळे अनेक अर्ज प्रलंबित आहेत. या विलंबामुळे प्रकल्प मंजुरी, गुंतवणूक वाढ आणि रोजगार निर्मिती यामध्ये अडचणी येत आहेत, ज्यामुळे धोरणाचे मुख्य उद्दिष्टे पूर्ण होत नाहीत. "आमचे अर्ज नोव्हेंबर 2022 पासून प्रलंबित आहेत. आणि अद्याप अधिकाऱ्यांकडून कोणतीही प्रतिक्रिया नाही. यामुळे महाराष्ट्रातील इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात आमचे योगदान रोखले जात आहे." असे इलेक्ट्रॉनिक्स धोरण प्रोत्साहन अर्जदार गटाच्या प्रतिनिधीने सांगितले.

## सर्वसामान्य जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी निश्चित बळ मिळेल : आमदार प्रताप सरनाईक

### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आमदार सरनाईक सन्मानित

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्र विधानपरिषद शतक महोत्सवात राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे सन २०२०-२१ महाराष्ट्र विधानसभा 'उत्कृष्ट भाषण' पुरस्कार महामहिम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या शुभहस्ते आमदार प्रताप सरनाईक यांना प्रदान करण्यात आला. ही आपल्या ठाणेकरांसाठी अत्यंत आनंद आणि अभिमानाची बाब आहे. कोरोना काळात कोरोनाच्या वाढत्या रुग्णांच्या गंभीर परिस्थितीचे वास्तव आमदार प्रताप सरनाईक यांनी विधानभवनात अवगत करून दिले. या भाषणासाठी आमदार प्रताप सरनाईक यांना उत्कृष्ट भाषण पुरस्काराने सन्मानित केले.



महामहिम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्याहस्ते हा पुरस्कार स्वीकारून अत्यंत आनंद झाला. यामुळे सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सभागृहात मांडण्यासाठी निश्चितच नव्याने बळ मिळेल, असा विश्वास आमदार प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केले. यावेळी राज्यपाल मा. सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री ना. मा. श्री. एकनाथ शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री ना. मा. श्री. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. अजितदादा पवार, विधानसभा अध्यक्ष मा. श्री. राहुल नार्वेकर, महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष मा. श्री. नरहरी झिरवळ, विधान परिषदेच्या उपसभापति मा. ना. डॉ. नीलम गोऱ्हे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

## रशियाने युक्रेनवर डागली 2 बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे

51 ठार, 271 जखमी

**किव्ह:** रशियाने मंगळवारी युक्रेनच्या पोल्टावा शहरावर 2 बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांनी हल्ला केला. या हल्ल्यात ५१ जणांचा मृत्यू झाल्याचा दावा युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांनी केला आहे. तर 271 जण जखमी झाले आहेत. एक व्हिडिओ संदेश जारी करताना, झेलेन्स्की म्हणाले की रशियाने त्यांच्या एका शैक्षणिक संस्था आणि रुग्णालयांना लक्ष्य केले. या काळात इमारतीचे मोठे नुकसान झाले. इमारतीच्या ढिगाऱ्याखाली अनेक नागरिक गाडले गेले. या हल्ल्यानंतर पोल्टावामध्ये तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. युक्रेनच्या संरक्षण मंत्रालयाने सांगितले की, अलर्ट सायरनचा आवाज आणि क्षेपणास्त्र हल्ला यामध्ये फारच कमी वेळेचे अंतर होते. लोक बॉम्ब शेल्टरकडे जात असताना त्यांच्यावर हल्ला झाला. बचाव पथकाने 25 जणांना वाचवले, त्यापैकी 11 जण ढिगाऱ्याखाली दबले गेले.



# मोदींचे काम केवळ अदानी-अंबानींच्या फायद्यासाठी

## काश्मीरातून राहुल गांधींचा हल्लाबोल

वृत्तसंस्था
श्रीनगर

जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. त्यामुळे या ठिकाणी काही राजकीय पक्षांचे नेते तळ ठोकून आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सुद्धा काश्मीरात प्रचार सभा घेण्यास सुरुवात केली असून या सभांच्या माध्यमातून ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधताना पाहायला मिळत आहेत. नुकतीच राहुल गांधी यांची काश्मीरातील रामबाण येथे प्रचार सभा पार पडली.



यावेळी त्यांनी पंतप्रधान मोदी यांच्यावर हल्लाबोल केला. मोदींचे सरकार फक्त अदाणी आणि अंबानीसाठी काम करत असल्याचा आरोप केला आहे.

रामबाण येथील प्रचारसभेत काँग्रेस नेते, खासदार राहुल गांधी म्हणाले की, देशात भाजपा आणि आरएसएसचे लोक द्वेष आणि हिंसा पसरवत आहेत. त्यांचे काम द्वेष पसरवण्याचे, तर आपले काम प्रेम पसरवण्याचे आहे. ते तोडतात, तर आपण जोडतो. द्वेषाला प्रेमाने हरवता येऊ शकते. पूर्वी पंतप्रधान मोदी छाती फुगवून चालायचे. आता झुकून चालतात, असा टोला गांधींनी लगावला आहे. तर, एक राज्य संपवले गेले आणि लोकांचे अधिकार हिरावून घेतले गेले. सर्वात आधी जम्मू काश्मीरला राज्याचा दर्जा परत करावा लागेल. कारण फक्त तुमचे राज्य हिरावून घेतले गेले नाहीये, तर तुमचे अधिकार, तुमची संपत्ती आणि तुमचे सर्वकाही हिरावून घेतले जात आहे, असा दावा राहुल गांधींनी केला आहे.

तसेच, आज जम्मू काश्मीरमध्ये राजा आहे, त्याचे नाव एलजी (उपराज्यपाल) आहे. राज्याचा दर्जा बहाल करण्यासाठी आम्ही केंद्र सरकारवर दबाव टाकू. पण सरकार फक्त अदाणी आणि अंबानींच्या फायद्यासाठी काम करत आहे. जम्मू काश्मीरमध्ये देशाच्या इतर भागाच्या तुलनेत जास्त बेरोजगारी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी कधी समुद्रात जातात. कधी लोकांना अलिंगन देतात, पण कधीच बेरोजगारीच्या मुद्द्यावर बोलत नाहीत, अशी जहरी टीका गांधींनी केली आहे. आता नरेंद्र मोदी भारतीय जनतेला घाबरू लागले आहेत. कारण त्यांचा थोडाच काळ शिल्लक राहिला आहे. आम्ही नरेंद्र मोदी आणि भाजपाचे सरकार हटवू. देशात बंधूभाव असावा, सर्वांचा आदर केला जावा, सगळ्यांनी गुण्यागोविंदाने राहावे, अशी आमची इच्छा आहे, असेही रामबाण येथील सभेतून राहुल गांधींनी सांगितले.

## गोवा हायवे पूर्ण होण्यास 2027 उजाडेल

पान 1 वरुन...

यामुळे शिंदे यांनी नक्की महामार्गाची पाहणी केली की अहंकार वाढत चाललेल्या सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या कामाची पाहणी केली हे सारे गुलदस्त्यात आहे. 'सबका साथ, सबका विकास' अशी सातत्याने घोषणा देणाऱ्या भाजपाने मागील दहा वर्षात महामार्ग पूर्ण का केला नाही, असाही प्रश्न कोकणच्या जनतेत निर्माण होत आहे. काँग्रेसने कोकणचा विकास केला नाही हे मान्य आहे. म्हणून तर जनतेने भाजपाला सत्तेवर बसविले. पण मागील दहा वर्षात गोवा महामार्ग पूर्ण करण्यास भाजपालाही यश आलेले दिसत नाही. इतकेच नाही तर सावंतवाडी टर्मिनलचे कामही दहा वर्षे झाली रखडले आहे. सावंतवाडी रेल्वे टर्मिनलचा भूमिपूजन सोहळा 2014 साली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते झाला. तरीही टर्मिनलचे काम रखडले. पण आपण किती चांगले काम करीत आहोत हे दाखविण्यासाठी भाजपाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून रेल्वे स्थानकाच्या सुशोभीकरणाचा सपाटा लावला. रेल्वे स्थानकाचे सुशोभीकरण करावे अशी कोणीच मागणी केलेली नव्हतीच. रेल्वे वेळेवर आणि पुरेशा सोडाव्यात आणि मुंबई-गोवा महामार्ग पूर्ण करावा, ही कोकणी जनतेची सामान्य मागणी होती. ही मागणी पूर्ण केली नाही. पण पर्यटन विकासासाठी आलेल्या निधीचा वापर करण्यासाठी जी तत्परता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी आणि मंत्री चव्हाणांनी दाखविली तीच तत्परता मुंबई-गोवा महामार्गाबाबत कार्यकारी अभियंत्यांनी का दाखवली नाही, असा प्रश्न निर्माण होतो. गेली दहा वर्षे रखडलेला मुंबई-गोवा महामार्ग पाहता. आतापर्यंत या महामार्गासाठी नेमण्यात आलेल्या सर्वच कार्यकारी अभियंत्यांची कसून चौकशी व्हायला हवी. कारण या महामार्गाच्या कामात प्रचंड भ्रष्टाचार झाला आहे असे सर्वांचेच म्हणणे आहे. म्हणूनच या साऱ्या कार्यकारी अभियंत्यांच्या विरोधात न्यायालयाचे दरवाजे ठोठावायला हवेत. कारण या महामार्गाची कालची अवस्था पहिली तर हा महामार्ग डिसेंबर 2026 पर्यंत पूर्ण होणे शक्यच नाही. 2027 साल उजाडेल असे ठामपणे म्हणायला हवे. कारण रायगड जिल्ह्यातील इंदापूर आणि माणगाव बायपासचे काम बाकी आहे. चिपळूण येथील उड्डाणपुलाचे काम अपूर्ण आहे. लांजा येथील उड्डाणपुलाच्या कामाला अद्याप सुरुवातही झालेली नाही. हे उड्डाणपुल सहा वर्षे अर्धवट स्थितीत आहे. पिलरच्या शिगा गंजल्या आहेत. या सर्व कामांना अजून तीन वर्षे लागणारच. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आले म्हणजे सिमेंट लवकर सुकणार असे अजिबात नाही. उद्या नितीन गडकरी जरी आले तरीही सिमेंट सुकायला तितकाच कालावधी लागेल. हे पाहता एखाद्या महामार्गाचे काम कसे करु नये, याचे उत्तम उदाहरण म्हणजे मुंबई-गोवा महामार्ग. या महामार्गाबाबत जितके नितीन गडकरी जबाबदार आहेत त्यापेक्षा जास्त जबाबदार राज्यातील सत्ताधारी मंडळी आहे. यात उद्धव ठाकरे, शरद पवार आणि काँग्रेसचे नेते हे सारे आलेच.

पान १ वरुन

**महिला सक्षमीकरणाचा महाराष्ट्र नवा आदर्श**

**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्राम विकास आणि पंचायतराज, पर्यटन मंत्री तथा जिल्ह्याचे पालक मंत्री गिरीश महाजन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे आणि महिला व बाल कल्याण मंत्री आदिती तटकरे यांचीही उपस्थिती होती. उदगीर येथील विश्वशांती बुद्ध विहाराचे लोकार्पण आणि हजारोंच्या संख्येने उपस्थित महिलांशी संवाद साधायला मिळाल्याचा आनंद व्यक्त केला. राष्ट्रपती श्रीमती मुर्मू म्हणाल्या की, महाराष्ट्र शासनाने सुरु केलेल्या 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनांसह महिलांच्या अन्य योजनांची माहिती घेतली. याशिवाय राज्यात लखपती दिदी योजनेला मिळत असलेल्या प्रतिसादाचाही आढावा घेतला. या योजनांचे दृष्य परिणाम दिसत असल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला. प्रत्येक कुटुंबात उदरनिर्वाह चालविण्यासाठी महिलांची मुख्य भूमिका असते. त्यामुळे महिलांनी आता राजकीय क्षेत्रातही पुढे येत देशाचे नेतृत्व करावे, असे आवाहनही त्यांनी केले. पुरुषांनी आता महिलांच्या क्षमतेला ओळखून त्यांच्या स्वप्नांना साकार करण्यासाठी पाठबळ द्यावे. तसेच आमच्या संस्कृतीत महिलांचा सन्मान करणे पुरुषार्थ मानला जातो. प्रत्येक कुटुंबामध्ये हा सन्मान दिसून आला पाहिजे. महिलांनी सर्व आघाड्यांवर अग्रेसर राहताना स्वत:च्या आरोग्याकडे लक्ष द्यावे, असेही त्या म्हणाल्या.**

# विनेश-बजरंग दिल्लीत राहुल गांधींना भेटले

## काँग्रेसकडून उमेदवारीची ऑफर; विनेशला 3, बजरंगला 2 जागांचा पर्याय

वृत्तसंस्था
रेवाडी

हरियाणाची कुस्तीपटू विनेश फोगट आणि बजरंग पुनिया निवडणूक लढवणार असल्याच्या चर्चेदरम्यान या दोघांनी दिल्लीत राहुल गांधी यांची भेट घेतली. यावरून दोघेही निवडणूक लढवणार असल्याचे संकेत मिळत आहेत. काँग्रेसच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, काँग्रेसने दोन्ही कुस्तीपटूंना तिकीट देऊ केले आहे. विनेशला 3 तर बजरंगला 2 जागांचा पर्याय देण्यात आला आहे.

मात्र, काँग्रेसचे प्रदेश प्रभारी दीपक बाबरिया यांनी काल (मंगळवारी) 'निवडणूक लढवण्याचा निर्णय विनेश फोगट घेतील' असे सांगितले होते. याबाबतची स्थिती आज (बुधवारी) स्पष्ट होणार आहे.

या दोघांनाही विधानसभा निवडणुकीत उमेदवारी देऊन भाजपविरोधात कुस्ती



चळवळीला उभारी देण्याचा काँग्रेसचा प्रयत्न असल्याचे पक्षातील सूत्रांनी सांगितले. सध्या काँग्रेस विनेश फोगटच्या होकाराची वाट पाहत आहे. बजरंग पुनिया निवडणूक लढवण्याबाबत काँग्रेसला सकारात्मक संकेत मिळाले आहेत, मात्र प्रकरण विनेशवर अवलंबून आहे.

विनेश फोगटला ऑफर केलेल्या 3 जागांपैकी पहिल्या 2 जागा दादरी आणि बधरा चरखी दादरीच्या आहेत. ती याच जिल्ह्यातील बलाली गावची रहिवासी आहे. जर विनेश दादरीला जाण्यास सहमत असेल तर ती तिची चुलत बहीण दंगल गर्ल बबिता फोगटशी स्पर्धा करू शकते. बबिताने 2019 मध्ये भाजपच्या तिकिटावर येथून निवडणूक लढवली होती, परंतु तिचा पराभव झाला होता. यावेळीही ती तिकिटाची दावेदार आहे. विनेशला जिंदच्या जुलाना जागेचा तिसरा पर्याय देण्यात आला आहे. विनेश फोगटचे सासरचे घर येथे आहे.

बजरंग पुनियालाही 2 जागांची ऑफर देण्यात आली आहे. बजरंग सोनीपतमधून निवडणूक लढवण्यास इच्छुक आहे, परंतु काँग्रेसला येथून विद्यमान आमदार सुरेंद्र पनवार यांना तिकीट द्यायचे आहे. पनवार सध्या ईडी प्रकरणात तुरुंगात आहे. त्यांनी निवडणूक न लढविल्यास त्यांच्या मुलाला किंवा सुनेला तिकीट मिळू शकते. त्यांचे तिकीट रद्द करून काँग्रेसने अडचणीच्या काळात नेत्याला डावलल्याचे संकेत द्यायचे नाहीत.

बजरंगनेही झज्जरच्या बदली जागेसाठी स्वारस्य दाखवले आहे पण येथून काँग्रेसने विद्यमान आमदार कुलदीप वत्स यांचे तिकीट निश्चित केले आहे. वत्स हे मोठे ब्राह्मण चेहरा आहेत, त्यामुळे काँग्रेसला त्यांचे तिकीट कापून ब्राह्मण व्होटबँक अस्वस्थ करायची नाही. काँग्रेसने बजरंगला बहादूरगड आणि भिवानीचा पर्याय दिला आहे. या दोन्ही जागा जाट बहुल आहेत.

# राहुल वडील राजीव यांच्यापेक्षा जास्त समजदार, त्यांच्यात पंतप्रधान होण्याचे गुण

वृत्तसंस्था
शिकागो

राहुल गांधी हे वडील राजीव गांधींपेक्षा जास्त समजदार आहेत. बौद्धिक असण्यासोबतच ते एक उत्तम रणनीतीकार देखील आहेत. राजीव जरा जास्तच मेहनती होते. दोघांचा डीएनए एकच आहे. दोन्ही नेते आयडिया ऑफ इंडियाचे पुरस्कर्ते आहेत.

गांधी परिवाराचे निकटवर्तीय आणि इंडियन ओव्हरसीज काँग्रेसचे अध्यक्ष सॅम पित्रोदा यांनी शिकागो येथील पीटीआय या वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत या गोष्टी सांगितल्या. पित्रोदा म्हणाले की, काँग्रेसचे खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यात पंतप्रधानाचे सर्व गुण आहेत.

राहुल यांची चुकीची प्रतिमा तयार करण्यात आल्याचे पित्रोदा म्हणाले. त्यांची बदनामी करण्यासाठी कोट्यवधी डॉलर्स खर्च करण्यात आले. माध्यमांमध्ये राहुल यांची प्रतिमा नियोजनबद्ध प्रचारावर



आधारित होती. राहुल खूप शिकलेले आहेत. लोक म्हणाले की ते कधीच कॉलेजला गेले नाही. त्यांच्याबद्दल खोट्या गोष्टी बोलल्या जात होत्या.

काँग्रेस नेते म्हणाले, 'राहुल यांची खरोखरची प्रतिमा आता समोर येत आहे. त्यांच्या दोन भारत दौऱ्यांचा यात खूप फायदा झाला. याचे श्रेय मी राहुल यांना देतो. त्याविरुद्ध ते बराच काळ लढले आणि वाचले. बाकी कोणी असतं तर टिकू शकले नसते.

एखाद्या व्यक्तीवर, त्याच्या कुटुंबावर, त्याचा वारसा, पक्षाच्या चारित्र्यावर दिवसरात्र हल्ला करणे वाईट आहे. हे क्षुद्र लोक आहेत जे जाणूनबुजून खोटे बोलतात, फसवतात आणि व्यक्तीबद्दल सर्व प्रकारच्या गोष्टी बोलतात. मात्र, आता माध्यमांवर कुणाचे तरी नियंत्रण असल्याचे जनतेच्या लक्षात येऊ लागले आहे. लोकांचे नुकसान करण्यासाठी बातम्या तयार केल्या जातात. खोटे बाहेर येत आहेत.

माजी पंतप्रधान राजीव गांधी आणि राहुल गांधी यांच्यातील समानता आणि फरक या प्रश्नावर पित्रोदा म्हणाले, 'मी राजीव गांधी, पीव्ही नरसिंह राव, मनमोहन सिंग, व्हीपी सिंह, चंद्रशेखर आणि एचडी देवेगौडा यांसारख्या अनेक पंतप्रधानांसोबत काम केले आहे.

मला अनेक माजी पंतप्रधानांना जवळून पाहण्याची संधी मिळाली, पण कदाचित राहुल आणि राजीव यांच्यातील फरक हा आहे की राहुल अधिक बुद्धिवादी, विचारवंत आहेत. राजीव जरा जास्तच मेहनती होते. त्यांचा डीएनए एकच आहे. त्यांना लोकांबद्दल समान काळजी आणि भावना आहेत. ते खरच खूप साधे लोक आहेत. त्यांच्या स्वतःच्या कोणत्याही वैयक्तिक गरजा नाहीत.

काँग्रेस नेते पुढे म्हणाले,

# पूजा खेडकरचे अपंगत्व प्रमाणपत्र बनावट

## दिल्ली पोलिसांचा दावा

वृत्तसंस्था
नवी दिल्ली



दिल्ली पोलिसांनी पूजा खेडकर प्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयात नवीन स्थिती अहवाल दाखल केला असून निलंबित प्रशिक्षणार्थी IAS पूजा खेडकर हिने दोन अपंगत्व प्रमाणपत्र सादर केले होते, त्यापैकी एक बनावट असल्याचा संशय आहे.

दिल्ली पोलिसांनी या स्थिती अहवालात म्हटले आहे की आम्ही UPSC ने सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी केली आणि असे समोर आले की पूजा खेडकरने नागरी सेवा परीक्षा-2022 आणि 2023 दरम्यान दोन अपंगत्व प्रमाणपत्रे (एकाधिक अपंगत्व) सादर केली होती, जी त्यांच्यानुसार अहमदनगरच्या वैद्यकीय प्राधिकरणाने जारी केली आहेत.

अहमदनगर वैद्यकीय प्राधिकरणाकडून तपासण्यात आलेले हे दोन्ही प्रमाणपत्र पोलिसांना मिळाले. प्राधिकरणाने म्हटले- 'आमच्या सिव्हिल सर्जनच्या कार्यालयातील नोंदीनुसार, या प्राधिकरणाने अपंगत्व प्रमाणपत्र (एकाधिक अपंगत्व) क्रमांक MH2610119900342407 जारी केलेले नाही. त्यामुळे हे अपंगत्व प्रमाणपत्र बनावट असण्याची शक्यता आहे. 30 ऑगस्ट रोजी पूजाने दिल्ली उच्च न्यायालयात उत्तर दाखल केले होते की UPSC परीक्षेत आरक्षणासाठी उमेदवाराचे 40% अपंगत्व असणे आवश्यक आहे. मी 47% अपंग आहे. त्यामुळे केवळ अपंग श्रेणीतील माझे प्रयत्न यूपीएससी परीक्षेत गणले जावेत.

त्यांनी सांगितले की त्यांच्याकडे महाराष्ट्रातील हॉस्पिटलचे प्रमाणपत्र आहे, जे पुष्टी करते की त्यांना डाव्या गुडघ्यात अस्थिरता आहे. पूजाने सांगितले की तिने नागरी सेवा परीक्षेसाठी 12 प्रयत्न केले आहेत. त्यापैकी 7 प्रयत्न सर्वसाधारण प्रवर्गातून देण्यात आले आहेत.

## अरबी समुद्रात दोन तटरक्षक जवानांचे मृतदेह सापडले

**पोरबंदर ।** भारतीय तटरक्षक दलाचे (ICG) प्रगत हलके हेलिकॉप्टर (ध्रुव) सोमवार, 2 सप्टेंबर रोजी रात्री गुजरातच्या पोरबंदर किनाऱ्याजवळ अरबी समुद्रात कोसळले. यावेळी हेलिकॉप्टरमधील चार क्रू मेंबर्सपैकी एक जण बचावला, तर तीन क्रू मेंबर्स बेपत्ता झाले. मंगळवारी (3 सप्टेंबर) संध्याकाळी या बेपत्ता क्रू मेंबर्सपैकी दोघांचे मृतदेह सापडले. कमांडंट विपिन बाबू आणि पी/एनव्हीके करण सिंग अशी त्यांची नावे आहेत. चौथा क्रू मेंबर अद्याप बेपत्ता आहे. ICG ने 3 सप्टेंबर रोजी सकाळी 10:12 वाजता सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर या अपघाताची माहिती दिली होती. अधिकाऱ्यांनी सांगितले की, हेलिकॉप्टर पोरबंदर किनाऱ्यापासून 45 किमी अंतरावर असलेल्या एका मालवाहू जहाजावर बचाव मोहिमेसाठी गेले होते.

# इस्रायली ओलिसांना शवपेटीत पाठवणार

## हमासची धमकी

वृत्तसंस्था
गाझा

गाझामध्ये इस्रायली ओलिसांचे मृतदेह सापडल्यानंतर हमासने इस्रायलला इशारा दिला आहे. इस्रायली लष्कराने त्यांच्यावर दबाव टाकणे थांबवले नाही, तर ओलिसांना शवपेटीत इस्रायलकडे पाठवू, असे हमासने म्हटले आहे. हमासने धमकी दिली आणि सांगितले की त्यांनी आपल्या सैनिकांना यासाठी आधीच आदेश दिले आहेत.



अल जझिराच्या वृत्तानुसार, कासिम ब्रिगेडचे प्रवक्ते अबू उबैदा म्हणाले की, इस्रायलचे पंतप्रधान नेतन्याहू यांनी कोणत्याही कराराशिवाय लष्करी दबाव आणून ओलिसांची सुटका करण्याचा प्रयत्न केला तर आम्ही त्यांना ताबूतांमध्ये परत करू. आता निर्णय कुटुंबाच्या हातात आहे की त्यांना ओलिस जिवंत परत हवे आहेत की त्यांचे मृतदेह.

ओलिसांच्या मृत्यूला नेतान्याहू आणि त्यांचे सैन्य जबाबदार असल्याचे हमासने म्हटले आहे. हमासच्या बोगद्यात ज्या 6 ओलिसांचे मृतदेह सापडले, त्यांच्या डोक्यात मागून गोळ्या झाडण्यात आल्याचे नेतन्याहू यांनी म्हटले आहे. ओलिसांना जिवंत परत आणण्यात यश न आल्याने इस्रायलच्या पंतप्रधानांनी देशाची माफी मागितली.

ते म्हणाले, "आम्ही खूप जवळ आलो, पण अपयशी ठरलो. याची मोठी किंमत हमासला चुकवावी लागेल." हमासच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, इस्रायलच्या हवाई हल्ल्यात त्या ओलीसांचा मृत्यू झाला. त्याचवेळी अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांनी नेतन्याहू ओलिसांना सोडवण्यासाठी पुरेसे प्रयत्न करत नसल्याचे म्हटले आहे.

# पंतप्रधान मोदी सिंगापूरला पोहोचले, ढोल वाजवला

## ब्रुनेईमध्ये चीनचे नाव न घेता ते म्हणाले, भारत विस्तारवादाच्या विरोधात

वृत्तसंस्था
बंदर सेरी बेगवान

ब्रुनेईला भेट दिल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी 2 दिवसांच्या सिंगापूर दौऱ्यावर पोहोचले आहेत. येथे भारतीय समाजातील लोकांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी पीएम मोदींनी ढोलही वाजवला. लोकांनी पीएम मोदींना भगव्या रंगाचा गमछा भेट दिला. सिंगापूरमध्ये ज्या हॉटेलमध्ये ते मुक्काम करणार, त्या हॉटेलच्या बाहेरही त्यांच्या स्वागतासाठी भारतीय समाजातील लोक उपस्थित होते.

लोकांनी पीएम मोदींसोबत सेल्फीही काढले. यावेळी एका महिलेने त्यांना राखीही बांधली. सिंगापूर दौऱ्यात ते राष्ट्रपती थर्मन षणमुगरत्नम, सिंगापूरचे पंतप्रधान लॉरेन्स वोंग यांच्यासह अनेक वरिष्ठ नेत्यांची भेट घेणार आहेत. सिंगापूरमधील व्यापारी समुदायाच्या नेत्यांनाही पंतप्रधान भेटणार आहेत.



**भारत हा विस्तारवादाचा नाही, विकासाचा समर्थक**

*पॅसिफिक व्हिजनमध्ये ब्रुनेई एक महत्त्वपूर्ण भागीदार आहे. भारताने नेहमीच आसियान देशांमध्ये शांततेला प्राधान्य दिले आहे." चीनचे नाव न घेता, पीएम मोदी म्हणाले, "आम्ही आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार नेव्हिगेशन आणि ओव्हरफ्लाइटच्या स्वातंत्र्याचे समर्थन करतो. भारत हा विस्तारवादाचा नसून विकासाचा समर्थक आहे.*

याआधी बुधवारी पंतप्रधानांनी ब्रुनेईचा सुलतान बोलकिया यांच्यासोबत द्विपक्षीय बैठक घेतली. दोन्ही नेत्यांमध्ये संरक्षण, व्यापार, शिक्षण, तंत्रज्ञान आणि आरोग्य या महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली. शिष्टमंडळ स्तरावरील बैठकीनंतर भारत आणि ब्रुनेई यांच्यात सामंजस्य कराराही करण्यात आले. बंदर सेरी बेगवान आणि चेन्नई दरम्यान थेट विमानसेवा सुरू करण्याच्या निर्णयाचे त्यांनी स्वागत केले. याशिवाय दोन्ही नेत्यांनी प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवरही चर्चा केली. यावेळी त्यांनी आसियान देशांच्या विकासासाठी काम करण्याचे मान्य केले. ब्रुनेईच्या सुलतानने जगातील सर्वात मोठ्या पॅलेस 'इस्ताना नुरुल इमान' येथे पंतप्रधान मोदींच्या सन्मानार्थ स्नेहभोजनाचे आयोजन केले होते.

# किम जोंगकडून 30 अधिकाऱ्यांना मृत्यूदंड

## उत्तर कोरियातील पुराचा सामना करण्यात अपयशी ठरले; 1 हजार लोक मारले गेले

वृत्तसंस्था
प्योंगप्योंग

उत्तर कोरियाचा हुकूमशहा किम जोंग उन याने देशातील 30 अधिकाऱ्यांना फाशीची शिक्षा सुनावली आहे. दक्षिण कोरियातील मीडिया टीव्ही चोसूनच्या रिपोर्टनुसार, उत्तर कोरियातील पुराचा सामना करण्यात अपयशी ठरल्याबद्दल या अधिकाऱ्यांना शिक्षा देण्यात आली आहे.

खरं तर, मुसळधार पावसामुळे जुलैमध्ये उत्तर कोरियामध्ये भूस्खलन आणि पूर आला होता. या काळात सुमारे 1 हजार लोकांचा मृत्यू झाला होता. तर 4 हजार घरे उद्ध्वस्त झाली. मात्र, किम जोंगने हे आकडे फेटाळून लावले. त्याने स्वत:



पूरग्रस्त भागाचा दौरा केला.

ज्या अधिकाऱ्यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली ते भ्रष्टाचार आणि कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी दोषी आढळले. आपत्तीदरम्यान झालेल्या नुकसान आणि मृत्यूसाठी त्यांना जबाबदार धरण्यात आले आहे. उत्तर कोरियाचे सरकारी मीडिया केसीएनएने म्हटले आहे की, किम जोंग यांनी अधिकाऱ्यांना कठोर शिक्षेचे आदेश दिले आहेत. मात्र हे अधिकारी कोण आहेत याची माहिती समोर आलेली नाही.

हुकूमशहा किम जोंगने म्हटले आहे की, पूरग्रस्त भागातील पुनर्बांधणीसाठी 2-3 महिने लागू शकतात. त्यांनी देशातील 3 प्रांतांना विशेष आपत्ती आपत्कालीन क्षेत्र म्हणून घोषित केले आहे.

दक्षिण कोरियातील मीडिया कोरियन टाईम्सच्या वृत्तानुसार, कोरोना महामारीनंतर उत्तर कोरियामध्ये सार्वजनिक मृत्यूदंडाच्या प्रकरणांमध्ये वाढ झाली आहे. कोरोनापूर्वी, उत्तर कोरियामध्ये एका वर्षात 10 सार्वजनिक मृत्यूदंडाची प्रकरणे होती. मात्र आता दरवर्षी सुमारे 100 जणांना ही शिक्षा दिली जात आहे.